**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.विशेष महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ५४**

**सभावृत्तांत**

दिनांक – १०.०२.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विशेष महापालिका सभा बुधवार दि.१०.०२.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.जाधव साधना रामदास

१०. मा.जाधव राहुल गुलाब

११. मा.आल्हाट मंदा उत्तम

१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१३. मा.काळजे नितीन प्रताप

१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१८. मा.पवार संगीता शाम

१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२८. मा.राजू मिसाळ

२९. मा.नेटके सुमन राजेंद्र

३०. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३३. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३४. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३६. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३८. मा.अपर्णा निलेश डोके

३९. मा.अनंत सुभाष को-हाळे

४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४१. मा.जयश्री वसंत गावडे

४२. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४७. मा.वाबळे संजय मल्हारराव

४८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५०. मा.सुपे आशा रविंद्र

५१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५२. मा.मोहिनीताई विलास लांडे

५३. मा.अजित दामोदर गव्हाणे

५४. मा.गोफणे अनुराधा देविदास

५५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७. मा.श्रद्धा बाजीराव लांडे

५८. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५९. मा.लोंढे शुभांगी संतोष

६०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.गिता सुशील मंचरकर

६८. मा.टाक अरुण मदन

६९. मा.आसवाणी सविता धनराज

७०. मा.वाघेरे सुनिता राजेश

७१. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७३. मा.काळे विमल रमेश

७४. मा.पाडाळे निता विलास

७५. मा.विनोद जयवंत नढे

७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७८. मा.विमलताई सुरेश जगताप

७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८१. मा.बारणे माया संतोष

८२. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८४. मा.चौंधे आरती सुरेश

८५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८६. मा.जगताप राजेंद्र गणपत

८७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८८. मा.जगताप नवनाथ दत्तु

८९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९०. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

९१. मा.प्रशांत शितोळे

९२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

९३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९४. मा.गायकवाड संध्या सुरदास

९५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९६. मा.मोटे किरण बाळासाहेब

९७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९८. मा.संजय केशवराव काटे

९९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१००. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०१. मा.पाटील सुजित वसंत

१०२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-महापालिका आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.डॉ.देशमुख-वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त, मा.चव्हाण, मा.तुपे -सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड,मा.आष्टीकर,मा.दंडवते-सहा.आयुक्त,मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) मा.पवार-कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.निकम, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.भोसले-कार्यकारी अभियंता,मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी, मा.इंगुळकर-लेखाधिकारी (शिक्षण मंडळ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन्मा.सदस्य मा.राहूल हनुमंत भोसले यांची विरोधी पक्षनेते पदी निवड झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने मा.महापौर, मा.पक्षनेते, मा.गटनेते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच श्री.संतोष बळीराम पाटिल, श्री.सुरेश चमरु मट्टानी, श्री.अरुण भूतकर सहाय्यक पोलिस निरीक्षक, पिंपरी पोलिस स्टेशन या तीन पोलिस अधिका-यांनी कर्तव्य बजावत असताना

विशेष कामगिरी केल्याबद्दल त्यांचा दि.२६ जानेवारी रोजी सरकारच्या वतीने पदक देऊन सन्मान करण्यात आला होता. त्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने या तीन पोलिस अधिका-यांचा मा.महापौर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

-----------

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब, सियाचिन भागात हिमपातात मृत्यूमुखी पडलेले जवान व रायगड जिल्ह्यातील मुरुड येथील समुद्रकिनारी सहलीला गेलेल्या चौदा विद्यार्थ्यांचे निधन झाले असल्याने त्यांस तसेच सुशील कोईराला-नेपाळचे माजी पंतप्रधान, बलराम जाखड-लोकसभेचे माजी अध्यक्ष,निदा फाजली-गझलांचे शायर,दत्तात्रेय भिकाजी उर्फ डॉ.द.भि.कुलकर्णी-ज्येष्ठ समीक्षक,अरुणा भट-ज्येष्ठ अभिनेत्री,बबनराव सिताराम लोंढे,दामोधर बिरदवडे,दामोदर हरिभाऊ लांडे,लक्ष्मीबाई आनंदराव ढोरे-मा.गणेश आनंदराव ढोरे स्विकृत सदस्य क प्रभाग समिती यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी आणि आजची सभा बुधवार दि.१०/२/२०१६ रोजी दुपारी २.२५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नितीन लांडगे** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे बुधवार दि.१०/२/२०१६ रोजी दुपारी २.२५ पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.विशेष महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ५४

## सभावृत्तांत

## (दि.१०./२/२०१६ दुपारी २.०० वा. ची तहकूब सभा)

दिनांक – १०.०२.२०१६ वेळ – दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१०.०२.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. ची मा.विशेष महापालिका सभा बुधवार दि.१०.०२.२०१६ रोजी दुपारी २.२५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१६. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१७. मा.पवार संगीता शाम

१८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

१९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२१. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२३. मा.भारती फरांदे

२४. मा.आर.एस.कुमार

२५. मा.जावेद रमजान शेख

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.राजू मिसाळ

२८. मा.नेटके सुमन राजेंद्र

२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३३. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३५. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३७. मा.अपर्णा निलेश डोके

३८. मा.अनंत सुभाष को-हाळे

३९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४०. मा.जयश्री वसंत गावडे

४१. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४६. मा.वाबळे संजय मल्हारराव

४७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४८. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

४९. मा.सुपे आशा रविंद्र

५०. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५१. मा.मोहिनीताई विलास लांडे

५२. मा.अजित दामोदर गव्हाणे

५३. मा.गोफणे अनुराधा देविदास

५४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५५. मा.श्रद्धा बाजीराव लांडे

५६. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५७. मा.लोंढे शुभांगी संतोष

५८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

५९. मा.सावळे सिमा रविंद्र

६०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६२. मा.पालांडे सुजाता सुनिल

६३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६४. मा.गिता सुशील मंचरकर

६५. मा.टाक अरुण मदन

६६. मा.आसवाणी सविता धनराज

६७. मा.वाघेरे सुनिता राजेश

६८. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७०. मा.काळे विमल रमेश

७१. मा.पाडाळे निता विलास

७२. मा.विनोद जयवंत नढे

७३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७५. मा.विमलताई सुरेश जगताप

७६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७८. मा.बारणे माया संतोष

७९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८१. मा.चौंधे आरती सुरेश

८२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८३. मा.जगताप राजेंद्र गणपत

८४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८५. मा.जगताप नवनाथ दत्तु

८६. मा.तनपुरे सुषमा राजेंद्र

८७. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

८८. मा.प्रशांत शितोळे

८९. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९०. मा.गायकवाड संध्या सुरदास

९१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९२. मा.मोटे किरण बाळासाहेब

९३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९४. मा.संजय केशवराव काटे

९५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

९६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

९७. मा.पाटील सुजित वसंत

९८. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

९९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-महापालिका आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.डॉ.देशमुख-वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त, मा.चव्हाण, मा.तुपे -सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड,मा.आष्टीकर,मा.दंडवते-सहा.आयुक्त,मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) मा.पवार-कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.निकम, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.भोसले-कार्यकारी अभियंता,मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी, मा.इंगुळकर-लेखाधिकारी (शिक्षण मंडळ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,मा.आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्रमांक-लेखा/६/कावि/१३३४/ २०१५ दिनांक – १०/१२/२०१५

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१४२०३ दि.१५/१२/२०१५
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८०९ दि.२५/१/२०१६

शिक्षण मंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१६-२०१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे .शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रकास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे कलम १५४) २ (अन्वये दिनांक १ जानेवारी पूर्वी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सन २०१५-२०१६ च्या ४ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ८ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कमा नमूद केलेल्या आहेत. शिक्षण मंडळ सभेने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांचेशी चर्चा करुन सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.११४,२६,९०,००० -/चे व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११५,२७,२४,००० -/मान्यतेकामी सादर केले असल्याने त्यास मान्यता देणेची मा.आयुक्तांची मागणी असली तरी शिक्षण मंडळाकडील सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये शिक्षण मंडळाने तयार केलेले सुधारित र.रू .१,१५,४९,९४,००० -/व मूळ र.रू .१,३३,९८,२४,००० -/मंजूर करणेस व त्या प्रमाणे सुधारित मध्ये ७२,१३,२४,००० -/व मूळ मध्ये ९०,३३,६९,००० -/मनपा हिस्सा अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६चे सुधारित व २०१६-१७चे मूळ अंदाजपत्रक सभागृहापुढे मान्यतेसाठी ठेवले आहे. मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक र.रु.१,३३,९८,२४,०००/-इतक्या रुपयांचे आहे. यात जमा बाजू व शासनाचे अनुदान र.रु.४३,५०,००,०००/- इतके आहे. आणि मनपाचे अनुदान र.रु.९०,३३,६९,०००/- इतके आहे. काही किरकोळ जमा धरली तर एकूण जमा रकान्यामध्ये र.रु.३३,९८,२४,०००/- इतके रुपये जमा होणार आहेत. हे अंदाजपत्रक सभागृहापुढे मांडत असताना मा.आयुक्त साहेबांनी काही तरतूदी सुचविल्या आहेत व मा.स्थायी समितीने काही तरतूदी सूचविल्या आहेत. मा.आयुक्त साहेबांनी जमा बाजूत ज्या तरतूदी सूचविल्या आहेत,त्यात र.रु.१८,७१,००,०००/- ही जमेची तरतूद कमी सूचविलेली आहे. मा.स्थायी समितीने र.रु.९०,३३,००,०००/- हा मनपा हिस्सा सांगितला आहे. इतके यात र.रु.७१,७२,००,१७०/- इतके सूचविलेले आहेत. ही जमेची बाजू झाली. जसे र.रु.१८,७१,००,०००/- रुपयांनी जमा कमी दाखवली आहे, त्याच पद्धतीने खर्चात देखील र.रु.१८,७१,००,०००/- रुपयाने खर्च कमी सूचविलेला आहे. सभागृहाच्या गोटात बॉल आहे. मा.स्थायी समितीने सूचविलेल्या तरतूदी मान्य करायच्या का मा.आयुक्त साहेबांनी सूचविलेल्या

तरतूदी इथे मान्य करायच्या. मा.आयुक्त साहेबांनी याठिकाणी काटकसरीचे धोरण अवलंबलेले दिसते आहे. काही चांगल्या गोष्टींसाठी याला निश्चितपणे कात्री लावतोय. आपण कार्यालयीन खर्च र.रु.८,६७,००,०००/- ने कमी केला आहे. मा.आयुक्त साहेब, आपल्याला मनपाच्या आर्थिक स्थितीची जाणीव आहे. एलबीटी बंद झाली आहे. आपल्याला अपेक्षेप्रमाणे जे उत्पन्न मिळायला पाहिजे ते देखील मिळत नाही. म्हणून कुठेतरी सुधारीत का होईना आपल्याकडे आज पैसा कमी असल्यामुळे कार्यालयीन खर्च र.रु.८,६९,००,०००/- रुपयांनी कमी सूचविला आहे असे मला वाटते. शाळा खर्चात देखील र.रु.९,२०,००,०००/- कमी केलेले आहेत. बालवाडी खर्च रु.६४,००,०००/- ने कमी सूचविला आहे. इंग्लिश मिडीयम शाळेचा खर्च देखील र.रु.२०,००,०००/- रुपयांनी कमी सूचविला आहे. या अंदाजपत्रकावर नजर टाकली तर त्यात शिक्षकांचे वेतन व आस्थापना खर्च हा जवळजवळ र.रु.६५,००,००,०००/- आहे. एकूण अंदाजपत्रकाच्या ५० टक्के रक्कम शिक्षकांच्या वेतनावर खर्च होते आहे. महापालिकेच्या १३१ शाळा आहेत. त्यात १२ उर्दू माध्यमाच्या, ३ हिंदी माध्यमाच्या आणि २ इंग्रजी माध्यमाच्या आहेत. यांमध्ये एकूण ४०,८०० विद्यार्थी शिकत आहेत. मा.आयुक्त साहेब, तुम्ही आत्ता जी डायरी दिली आहे त्यात लेटेस्ट आकडा आहे की महापालिकेच्या शाळेत ४०,८०० विद्यार्थी शिकत आहेत. ११८२ शिक्षक आहेत. ११८२ शिक्षक या ४०,८०० विद्यार्थ्यांना शिकवित आहेत. आपण शिक्षकांना पगार सुद्धा चांगला देतो. एक-एक शिक्षक नाही म्हटले तरी चाळीस हजार, साठ हजार पगार घेतो. आपण शिक्षकांना ज्या पद्धतीने पगार देतो, त्या पद्धतीने ते काम करतात का? शाळेत वेळेवर येतात का? विद्यार्थ्यांना व्यवस्थित शिकवतात का? याकडे देखील आपल्याला लक्ष दिले पाहिजे. शिक्षकांना फारसे काम नाही असे माझे वैक्तिगत मत आहे. एमआयडीसीत कंपन्यामध्ये जे लोक ८/१० तास काम करतात, त्यांचा टाईम सेट केला जातो. त्यांचा टाईम स्टडी केला जातो. सुपरवायजर कायम त्यांच्या पाठिमागे असतात. ते प्रत्येक तासाला किती काम करतात हे पाहिले जाते. त्याप्रमाणे आपल्या शिक्षकांच्याबाबतीत कोणताही टाईमस्टडी नाही. ६ तास शाळा असते. शिक्षकांना ३६५ दिवसांत १२० सुट्टया असतात. दिवाळी आली, दसरा आला, नाताळ आला, उन्हाळ्याची सुट्टी आली. या सगळ्या १२० सुट्टया असतात म्हणजे ३६५ दिवसांपैकी ते फक्त १४५ दिवसच काम करतात. हे शिक्षक व्यवस्थित काम करतात का. ते जर व्यवस्थित काम करत असतील तर मग मराठी शाळांचा दर्जा का खालावला गेला आहे याचा देखील आपण कुठेतरी विचार केला पाहिजे. वास्तविक पाहता, ही शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आहे. त्यांनी जबाबदारीने काम केले तर निश्चितपणे मराठी शाळांची गुणवत्ता वाढेल, दर्जा वाढेल, मुलांची गळती होते ती होणार नाही. शिक्षक व डॉक्टर हा समाजातील आदर्श घटक मानला जातो. शिक्षक भावी पिढी घडवण्याचे काम करतो. त्यामुळे समाज त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहतो. डॉक्टरकडे वेगळ्या दृष्टीने पाहतो. परवा दिवशी श्री.राहूल कुमार बजाज यांनी त्यांच्या कंपनीत जी कार्यशाळा घेतली होती. त्यांच्या देवी बजाज या त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून श्री.राहूलकुमार बजाज यांनी असेच सांगितले होते की,

शिक्षक आणि डॉक्टर हे समाजातील आदर्श घटक आहेत. त्यांच्याकडून समाजाची निश्चितपणे चांगली अपेक्षा आहे. शिक्षकांनी ज्ञानदानाचे काम चांगल्या पद्धतीने करायला पाहिजे. पण प्राथमिक शाळांतील शिक्षक तसे काही करत नाहीत. जोपर्यंत शिक्षकांची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत मराठी शाळांचा दर्जा सुधारणार नाही. गुणवत्तेत कुठल्याही पद्धतीची वाढ देखील होणार नाही. हे शिक्षक जर व्यवस्थितपणे काम करत असले असते तर २०११ साली आपल्या महापालिकेच्या शाळांत एकूण ५०,००० विद्यार्थी होते. आत्ता २०१६ साली विद्यार्थी कमी होऊन ही संख्या ४०,००० पर्यंत खाली आली आहे. या ४/५ वर्षांमध्ये जवळजवळ दहा हजारांनी संख्या कमी झाली आहे. अशाच पद्धतीने गळती चालू राहिलीतर या प्राथमिक शाळा चालू ठेवायच्या का नाही हा देखील प्रश्न निर्माण होणार आहे. इंग्रजी शाळांची संख्या वाढते आहे. पालकांना इंग्रजी शाळेचे आकर्षण आहे. पण शहरात खाजगी मराठी शाळा सुद्धा आहेत. त्यांमध्ये कुठेही गळती दिसून येत नाही. अभ्यंकर यांची प्राधिकरणामध्ये ज्ञानप्रबोधिनी शाळा आहे. आमचे जाधव म्हणून आहेत त्यांची मोहननगरमध्ये एक शाळा आहे. तिथे विद्यार्थी गळती होत नाही उलट विद्यार्थी संख्या वाढत चालली आहे. मराठी शाळांत देखील जागा मिळत नाही. मग आपल्याच शाळांच्या बाबतीत असे का होते. याला शिक्षकच जबाबदार आहेत असा माझा आरोप आहे. शिक्षकांनी वेळेवर यायला पाहिजे.

मला एकदा चिंचवड स्टेशनच्या मनपा शाळेत जाण्याचा योग आला होता. मी त्या शाळेचा माजी विद्यार्थी आहे. १२.३० वा. शाळा सुरु झाल्यावर प्रार्थना होईपर्यंत अर्धा तास जातो. त्यानंतर हे सगळे शिक्षक हेडमास्तरांच्या केबीनमध्ये जातात. तिथे चहा-पाणी, गप्पाटप्पा झाल्यानंतर त्यांना वर्गावर जायला दुपारचे जवळजवळ पावणे दोन वाजतात. मधल्या सुट्टीत असाच प्रकार आहे. सुट्टी संपली. मुले खेळायला गेली, खेळून परत आली की शिक्षक कोणत्याही प्रकारे वेळेवर वर्गावर जाणार नाहीत. तर ही गळती थांबवण्यासाठी आपल्याला काहीतरी प्रयत्न करावे लागणार आहेत. नाहीतर ही अवघड परिस्थिती इथे होऊन बसणार आहे. दर्जाच्या बाबतीत बोलतोय. शिक्षकांची संख्या देखील पाहिलीतर कमी आहे. आपल्या शाळेत जवळजवळ १२८ शिक्षक आहेत. त्यामध्ये ८६ पदवीधर व ४२ डिएड.चे शिक्षक आहेत. डिएड. शिक्षकांची देखील संख्या कमी आहे. सायन्स हा विषय शिकवण्यासाठी बीएससी.बीएड. शिक्षक पाहिजेत. अनेक वर्षे आपल्या शाळेत बीएससी.बीएड. शिक्षक नाहीत. यातून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही का. पालक हा विचार करणार नाहीत का. इथे जर सायन्स विषय शिकवायला शिक्षक नसेलतर पालक त्यांच्या मुलांना शाळेत कसे काय पाठवणार. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे. गेल्या आठवड्यात कोपरखेडे, नवी मुंबई इथे शिक्षकांचे अधिवेशन होते. त्यावेळी मा.शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे साहेबांनी शिक्षक भरतीवरील बंदी उठवली. त्यामुळे आपण शिक्षक भरती करु शकतो. ज्या रिक्त जागा आहेत त्या आपण ताबडतोब भरा. या महापालिकेच्या शाळेत गोरगरीबांची,झोपडपट्टीवासीयांची,सामान्य कामगारांची मुले शिकत असतात. मध्यमवर्गीय माणूस

देखील आपली मुले मनपाच्या शाळेत घालत नाही. या मुलांना सभागृहातील एकही व्यक्ती असे म्हणणार नाही की, या मुलांना कोणत्याही प्रकारचे शालेय साहित्य मोफत देऊ नका. दरवर्षी पंधरा/सोळा कोटी या गोरगरीब मुलांना गणवेश असेल, स्वेटर असेल, बूट असेल, पीटी गणवेश असेल, पीटी शूज असेल, सॉक्स असेल, पावसाळी साधने असतील, शालेय साहित्य असेलतर या सगळ्या वस्तू विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत देतो. माझे व्यक्तिगत मत आहे की, आमच्यापैकी कोणीही असे म्हणणार नाही की या मुलांना हे देऊ नका, ते देऊ नका. पुणे महापालिका आपल्यापेक्षा जास्त देते आहे. पुणे मनपात पीटी गणवेश व शाळा गणवेश वर्षातून दोन वेळा देतात. आपण तर एकदाच देतो. कुठल्या महापालिकेत आपल्यापेक्षा कमी देत नाहीत तर उलट जास्तच देतात. आपण विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देतो, कोणत्याही बाबतीत कमी करत नाही. गणवेश, स्वेटर, बूट, वही, कंपास, फूटपट्टी सगळे देतो. एवढे देऊनसुद्धा विद्यार्थी संख्या वाढली पाहिजे अशी आपली अपेक्षा आहे. याचाच अर्थ असा आहे की, एवढे सगळे देऊनसुद्धा विद्यार्थी येत नाहीत म्हणजे दर्जा घसरलेला आहे. दर्जा कुणामुळे घसरलेला आहे तर शिक्षकांमुळे घसरलेला आहे. आपल्याला शिक्षकांकडे लक्ष द्यावे लागणार आहे. आपण बालवाड्यांसाठी रु.३,६२,००,०००/- ची तरतूद केली आहे. १९९७ साली मी निवडून आलो, त्यावेळी तत्कालिन आयुक्त प्रविणसिंग परदेशी साहेब होते. पटसंख्या वाढायला पाहिजे म्हणून ही संकल्पना त्यावेळीसुद्धा आली होती. अडीच वर्षे झाली की सर्वसामान्य मध्यमवर्गीयांच्या मुलांना नर्सरी/प्लेग्रुपमध्ये टाकतात. त्याच वर्षी शाळेत प्रवेश घेतात. ही मुले पुढे इंग्लिश मिडीयमच्या शाळेत जातात. आपला विद्यार्थी सुरुवातीपासूनच हवा आहे, तो असला पाहिजे. याचसाठी झोपडपट्टी भागात बालवाड्या का सुरु करु नयेत, म्हणून त्यावेळी सभागृहाने निर्णय घेतला होता. प्रत्येक शाळेत एक/दोन बालवाड्या करायच्या. बालवाडी शिक्षकांची नावे त्यावेळी नगरसेवकांनीच दिलीत. त्याकाळात आम्हीदेखील शिक्षकांची नावे दिली. माझ्या वॉर्डात झोपडपट्टीचा भाग आहे. तिथे दोन बालवाड्या चालू केल्या. त्यावेळी रु.७००/- मानधन देत होतो. त्या सातशे रुपयात त्या बालवाडी शिक्षिकेने झोपडपट्टीत फिरायचे. तीन/साडेतीन वर्षांची जी काही मुले मिळतील ती गोळा करुन बालवाडी सुरु करायची. यामागील उद्देश फार चांगला होता की, बालवाडीत ही जी मुले येतात, तीच आपला पहिलीचा विद्यार्थी आहे. त्यामुळे आपला विद्यार्थी इकडेतिकडे कुठे जाणार नाही. ही अतिशय चांगली संकल्पना चालू केली आहे. आज आपण बालवाडी शिक्षकांच्या मानधनासाठी रु.२,३०,००,०००/- ठेवले आहेत. एका बालवाडी शिक्षिकेला जवळजवळ दहा हजार मानधन देतो. आज बालवाड्यांची परिस्थिती काय आहे. बालवाडीत कमीत कमी ३० मुले पाहिजेत. तेवढीसुद्धा मुले बालवाडीत नसतात. दहा ते पंधरा मुले असतात. बालवाडीत येणा-या मुलांना काही वर्षांनंतर गणवेष,स्वेटर,सकस आहार हे देखील चालू केले आहे. चालू अंदाजपत्रकात रु.१,२५,००,०००/-ची तरतूद देखील करुन ठेवली आहे. पण मुलेच येत नाहीत. बालवाडी असो, शाळा असो, जेवढा पट असतो तेवढी मुले येत नाहीत. तेवढे विद्यार्थी हजर नसतात. बहुतेक शाळांमध्ये ७० टक्यांपेक्षा

कमी/जास्त उपस्थिती असते. याउलट वाल्हेकरवाडी असेल, भूमकर वस्ती असेल, जाधववाडी असेल या ग्रामिण भागात विद्यार्थी शाळेत जास्त प्रमाणात येतात. ग्रामिण भागातील शाळा सोडल्यातर इतर शाळांत विद्यार्थी फार कमी संख्येने येतात. प्रत्येक शाळेत आकडेवारी असते. वास्तविक पाहता, जेव्हा सकाळी शाळा सुरु होते, त्यावेळी शिक्षक विद्यार्थ्यांची हजेरी घेतात. कोणत्याही शाळेत विद्यार्थी आल्यानंतर लगेचच त्याची हजेरी कोणीच घेत नाही. कारण विद्यार्थी संख्याच कमी असते. दोन वेळा हजेरी घेणे बंधनकारक आहे. पण हे शिक्षक काय करतात तर दुपारची शाळा सुटते किंवा सुटण्याच्या बेतात असते तेव्हा एकदा हजेरी घेतात. हे शिक्षक सकाळी हजेरी घेत नाहीत. शाळा सूटत असताना हजेरी घेतात. मग त्यात पटसंख्या किती, हजेरीसंख्या किती ही सगळी बोगस आकडेवारी आहे. वार्षिक तपासणीसाठी जे शिक्षक येतात, त्यांचेसुद्धा आपापसांत संगनमत असते. चिंचवड स्टेशनच्या शाळेत तपासणी करायची असेलतर काळभोरनगर,भोईरनगर,आकुर्डी या शाळांतील शिक्षकांना बोलवायचे. आधी यांनीच प्रश्न द्यायचे, मुलांना देखील तेच प्रश्न द्यायचे, मग शाळेत येणार, मुलांना प्रश्न विचारणार. मग शाळा सजवली का, वर्ग सजवला का, शाळेत वेळापत्रक लावले का एवढे फक्त बघायचे. मग ते येणार, त्यांना मस्तपैकी जेवण द्यायचे, कार्यक्रम संपला. हे प्रकार सर्रास झाले आहेत. शिक्षकांवर कोणाचाच अंकुश राहिलेला नाही. शिक्षण मंडळाचा राहिलेला नाही, चेअरमनचा राहिलेला नाही, शिक्षण मंडळ सदस्यांचा राहिलेला नाही. मन मानेल तसे ते काम करतात आणि पगार घेतात. मा.आयुक्त साहेब, मी मघाशीच म्हणालो होतो की, शिक्षकांबद्दल असे बोलणे चुकीचे आहे. परंतू ही वस्तुस्थिती आहे. ज्या शिक्षकांना आपण आदर्श मानतो. महापालिका शिक्षकांना एवढे पगारापोटी पैसे देते. मग त्यांनी हे काम केले पाहिजे. ही शिक्षकांची नैतिक जबाबदारी आहे. आपण मोफत शालेय साहित्य शाळेत देतो. मी एका शाळेत गेलो होतो. आपण शाळेत जे ग्रीन ब्लॅकबोर्ड दिलेले होते ते तसेच पडून आहेत. काही-काही शाळांत हे फळेदेखील लावलेले नाहीत. चार/चार महिने झाले, ते तसेच धूळ खात पडलेले आहेत. आपण प्रत्येक शाळेत कॉम्प्यूटर दिले आहेत. मा.आयुक्त साहेब, आता कॉम्प्यूटरचे युग आले आहे. ज्याला कॉम्प्यूटर येणार नाही तो निरक्षर समजला जाईल अशा पद्धतीची संकल्पना पुढे आलेली आहे. गोरगरीब मुले, झोपडपट्टीतील, प्राथमिक शाळेतली ही आमची मुले कुठेही मागे राहू नयेत म्हणून यांनाही शाळेत कॉम्प्यूटर दिलेले आहेत. त्या कॉम्प्यूटरचाही फारसा उपयोग होत नाही. ब-याच जणांना शिक्षकांना कॉम्प्यूटर समजत नाही. ज्यांना समजतो ते गेम खेळत बसतात, गाणी ऐकत बसतात. हि वस्तुस्थिती आहे. कॉम्प्यूटर असूनही पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनसाठी प्रोजेक्टर दिलेले आहेत त्याचा देखील उपयोग होत नाही. आपण जे प्रोजेक्टर दिले आहेत, ज्या सीडीज् दिलेल्या आहेत त्यात गाणी आहेत. कवितांच्या चाली दिल्या आहेत. त्यात अभ्यासक्रम दिले आहेत. एवढे सगळे दिले असताना देखील एवढी उदासिनता का असावी हे मला कळत नाही. एवढा खर्च करुन सुद्धा जर विद्यार्थी संख्या घटत असेलतर मा.आयुक्त साहेब, आपल्याला निश्चितपणे यात लक्ष देणे गरजेचे

आहे. कारण हे शिक्षण मंडळाचे शेवटचे वर्ष आहे. राज्य सरकारने शिक्षण मंडळ बरखास्त केले आहे. त्यामुळे शिक्षण मंडळ महापालिकेतच वर्ग होणार आहे. मग त्याची कमिटी वगैरे होईल. शेवटी याची जबाबदारी आयुक्तांचीच राहणार आहे. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सर्व शाळांत मोफत साहित्य वाटप वेळेवर देणे आवश्यक आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे, जे-जे साहित्य महापालिका मोफत देते. कोणत्याही शाळेत हे साहित्य वेळेत दिले जात नाही. निविदा विषयक कामांत देखील सुसूत्रता आणणे आवश्यक आहे. शिक्षण मंडळात या साहित्य वाटपात इतका घोळ आहे. इतका घोळ आहे की, मागील वर्षी विद्यार्थ्यांना वर्षभरात बूट, सॉक्स, कपडे हे शालेय साहित्य मिळालेच नाही. जो ठेकेदार अनेक वर्षे बूट, वह्या इ. शालेय साहित्य पुरवत होता. त्याचा ब्रँडच काढून टाकला. त्याचा ब्रँड काढून टाकल्यामुळे त्याला टेंडर भरता आले नाही. ज्याने टेंडर भरले तो लोएस्ट आला, त्याला आपल्याला वर्कऑर्डर देता आली नाही. कारण हा माणूस कोर्टात गेला. कोर्टाने आदेश दिला की, दि.२८/२/२०१६ पर्यंत कोणत्याही प्रकारची वर्कऑर्डर द्यायची नाही. असा कोर्टाने आदेश दिला. त्यामुळे आपण या मुलांना काही देऊ शकलो नाही. चार/पाच कोटींची केलेली तरतूद लॅप्स झाली. मागे आपण कुमार साहेबांचे भाषण सभागृहात ऐकले होते. त्यावेळी ते म्हणाले होते की, हा माणूस कोर्टात गेला आहे. कोर्टाने आदेश दिला आहे. मुलांना ते पैसे रोख स्वरुपात दिले असते तर त्यांनी साहित्य खरेदी केली असती. विद्यार्थ्यांचे नुकसान झाले नसते. हे देखील त्यावेळी केलेले नाही. कोर्टाचा निकाल आजही लागलेला नाही. २५ तारखेपर्यंत वर्कऑर्डर द्या असे सांगितले होते. मी त्या ठेकेदाराची पण माहिती घेतली. त्या ठेकेदाराने बाटा कंपनीला फसवले आहे. त्याने बाटा कंपनीचे १७/१८ लाख बुडवले आहेत. त्यामुळे त्याचा माल येत नाही. त्या ठेकेदाराचा ब्रँड काढून टाकला आहे त्यामुळे तो कोर्टात गेला आहे. पर्यायाने इथे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे.

काही अनावश्यक तरतूदी यात दिसत असल्यातरी शाळा दुरुस्ती व देखभालीसाठी आपण रु.५० लाख खर्च केला. वास्तविक पाहता, शाळा देखभाल, दुरुस्ती हे स्थापत्य विभागाचे काम आहे. शिक्षण मंडळाचे नाही. या कामासाठी शिक्षण मंडळाकडे टेक्निकल स्टाफ नाही. निविदा कशी काढायची हे त्यांना कसे कळणार. शाळा दुरुस्तीसाठी रु.५० लाख ठेवले आहेत ते तुम्ही काढून घ्या, आमची काही हरकत नाही. शाळा रंगकामासाठी रु.१,५०,००,०००/- तरतूद केली आहे. हे काम शिक्षण मंडळ करणार का, स्थापत्य विभाग करणार. यासाठी ज्यांनी तरतूद सूचवली आहे, त्यांची खरेच किव करावीशी वाटते. शाळा रंगवण्यासाठी हे दीड कोटी खर्च करतात. शाळा कशाला रंगवतात. मनपाच्या शाळांमध्ये गोरगरीब विद्यार्थी येतात. शाळेचा दर्जाच घसरलेला आहे. मुलांना ज्ञान कसे मिळेल याकडे लक्ष द्यावे. शाळांची रंगरंगोटी केलीतरी उपयोग काय. शाळांमध्ये विद्यार्थीच येत नाहीत. शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी गळती आहे. शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे. मुलांना चांगल्या पद्धतीने ज्ञान द्या. याकडे वास्तविक पाहता, सदस्यांनी व शिक्षण मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. ही दीड कोटी तरतूद काढलीतरी आमची काही हरकत नाही.

सुरक्षा देखभालीसाठी रु.२ कोटी तरतूद ठेवली आहे. पुन्हा तोच विषय. आपल्याकडे स्वतंत्र सुरक्षा विभाग आहे. इमारतींचे रक्षण करायला सुरक्षारक्षक घेतले आहेत. सिक्युरीटी गार्ड नेमलेले आहेत. काही मानधनावर घेतले आहेत. त्यांना त्यांचे काम करु देत. तुम्ही त्यांच्या कामात कशाला हस्तक्षेप करताय. तुम्हाला जे काम नेमून दिले आहे ते काम तुम्ही केले पाहिजे. ते पण प्रामाणिकपणे केले पाहिजे. त्यासाठी दोन कोटी तरतूद ठेवली आहे. आपण ही तरतूद काढायला काहीच हरकत नाही. बजेटमध्ये नवीन काही चांगल्या तरतूदी आहेत. मा.आयुक्त साहेब, आपल्याला जगाबरोबर चालायचे आहे. जे जे नवीन तंत्रज्ञान येते आहे. इतर शाळांमध्ये काय शिकवले जाते ते देखील आपण करणे गरजेचे आहे. विद्यार्थी क्रिडा साहित्यासाठी रु.१५ लाख तरतूद केली आहे ती अतिशय चांगली आहे. शाळेत नुसताच अभ्यास करणे त्यापेक्षा खेळ असणे हे सुद्धा आरोग्याच्या दृष्टिकोणातून चांगले आहे. या तरतूदीला आमचा विरोध नाही. शाळेत वॉटर प्युरिफायरसाठी रु.३० लाख तरतूद केली आहे. हे देखील चांगले आहे. शाळेतील पाण्याच्या टाक्या कधी धुतात, कधी धूतात का नाहीत, याची सुद्धा तपासणी केली पाहिजे. मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोणातून ते धोक्याचे आहे. त्यामुळे तो स्वतःची बॉटल घेऊन येईल. वॉटर हिटर बसवण्याचा पण विषय आहे. मुलाला बाटली दिली तर तो शाळेत बाटली घेऊन आला, पाणी पिले व परत बाटली घेऊन घरी गेला. चांगली गोष्ट आहे. याला आमचा विरोध नाही. नंतर सौर उर्जा सिस्टीमसाठी रु.४२ लाख ठेवले आहेत. ठिक आहे, सौर ऊर्जा सिस्टीम असेल तर शाळेत कॉम्प्यूटर आहेत. तिथे कॉम्प्यूटर शिकवतच नाहीत. त्यांची शिकवायची मानसिकताच नाही. पण उद्या लाईट गेली आणि आयुक्त साहेबांनी शाळेत व्हिजिट दिलीतर तिथे लाईटच नाही असे म्हणायला नको. सीसीटीव्ही कॅमेरे याच्यासाठी रु.२५ लाख तरतूद ठेवली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. ही अत्यावश्यक बाब आहे. कारण आपण हे सगळीकडे बघतोय. शहरात छोट्या-छोट्या मुलींवर देखील अत्याचार होण्याचे प्रमाण वाढले आहे. आपल्या शाळा मुलींच्या आहेत. मुलांच्या पण आहेत. मुले किडनॅप होतात. म्हणून सीसीटीव्ही कॅमेरासाठी रु.२५ लाख ही जी तरतूद केली आहे ती पुरेशी नाही. त्यापेक्षा तरतूद वाढवायची असेलतर ती आपण वाढवू शकतो. ई-लर्निंग स्कूलसाठी रु.२ कोटी ५० लाख ठेवले आहेत. ई-लर्निंग स्कूल ही देखील काळाची गरज आहे. याकरिता ठेवलेली तरतूद खूप होईल असे वाटते. ई-लर्निंग स्कूलसाठी पहिले शिक्षकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. आज प्रत्येक शाळेत ई-लर्निंग स्कूल आहे. आपल्या शाळेत सुद्धा करायचे असेलतर ते करणे गरजेचे आहे. शाळा व्यवस्थित ठेवण्यासाठी विद्युत, स्थापत्य, आणि पाणीपुरवठा, या तीनही विभागांनी चांगल्या पद्धतीने लक्ष दिले, स्थापत्यचा एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर आहे त्याने ज्या-ज्या प्रभागांत शाळा असेल तिथे हप्त्यातून एकदातरी जा व बघा की काय-काय दुरुस्तीचे काम आहे का. स्थापत्य विषयक काही काम आहे का. संडास-बाथरुम व्यवस्थित आहेत का. खिडक्या तुटलेल्या आहेत का. स्थापत्यच्या लोकांनी आठवड्यातून एकदा चक्कर मारली तरी ते ते काम करु शकतात. पाणीपुरवठा व विद्युतचे देखील तसेच आहे. या

लोकांनी आठवडा/पंधरा दिवसांतून एक-एक शाळा चेक केलीतरी निश्चितपणे प्रभागांत काय अडचणी आहेत ते त्यांना समजू शकेल. राज्य शासन काय, महापालिका काय, शेवटी शासनाचे धोरण महापालिकेचे धोरण आहे. गोरगरीबांची मुले शिकली पाहिजेत. त्यांच्यासाठी कितीही पैसे खर्च होऊ द्यात, शासन मागे हटणार नाही, महापालिका देखील मागे हटणार नाही. त्यांना सॉक्स द्या, बूट द्या, कपडे द्या काही हरकत नाही, कोणीही विरोध करणार नाही. फक्त ज्या पद्धतीची खरेदी होते, खरेदीला जो विलंब होतो, ही जी कोडबाजी होते ती थांबली पाहिजे. गोरगरीबांच्या मुलांना वेळेवर सगळे साहित्य मिळाले पाहिजे. यासाठी आपण प्रयत्न करावेत असे मला वाटते.

सगळ्यात शेवटी, सर्व शिक्षा अभियान याचे या बजेटमध्ये कुठेच काही दिसत नाही. ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून शालेय पोषक आहार असेल, चाचण्या असतील, मुलांसाठी काय-काय करता येईल यासंदर्भात काहीच नाही. जर याचा खुलासा झालातर सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षण मंडळाला किती पैसे मिळतात व त्याचा खर्च कशा प्रकारे होतो हे आपल्याला कळाले पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे यात फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो आहे. मा.महापौर साहेब, कुणालाच माहित नाही की हे सर्व शिक्षा अभियान काय आहे. सर्व शिक्षा अभियान ही केंद्र सरकारची फार चांगली योजना आहे. यात प्रत्येक महापालिकेला केंद्र सरकारकडून कोट्यावधी रुपये मिळतात. त्याचे अकाऊंट बुक आहे, त्याचा खर्च कसा करतो. हे कुठेतरी बजेटमध्ये आले पाहिजे. आपल्याला शासनाचे पैसे मिळतात. शासनाचा हिस्सा रु.४३ कोटी ५० लाख मिळतात. त्यानंतर जे जमा बाजूला दाखवतो व त्या पद्धतीने खर्च करतो. महापालिकेचा रु.९० कोटी ३३ लाख हिस्सा आहे. तो जमा बाजूला दाखवतो व त्या पद्धतीने खर्च करतो. तसे सर्व शिक्षा अभियानाचे काय. त्यांचा पैसा किती येतो. यात कशा पद्धतीने खर्च करतो आहोत. एवढे सांगताना मी हे देखील सांगू इच्छितो की, मा.आयुक्त साहेब, शिक्षकांवर लक्ष ठेवा. मराठी शाळेचा दर्जा खालावत चालला आहे. मराठी भाषा वाढली पाहिजे. नुकतेच इथे ऐतिहासिक मराठी साहित्य संमेलन झाले. एवढ्या लोकांनी मराठी पुस्तके खरेदी केलीत. त्याचा देखील उच्चांक झाला. पाच कोटींची पुस्तक खरेदी झाली. यावरुन दिसते की, लोकांचे मराठी भाषेवरील प्रेम तिळमात्र कमी झालेले नाही. खाजगी शाळांमध्ये गळती होत नाही. उलट खाजगी मराठी शाळांमध्ये प्रवेश मिळत नाही आणि महापालिकेच्या शाळा ओस पडलेल्या आहेत. याकडे आपण लक्ष द्यावे एवढीच विनंती करतो आणि थांबतो.

**मा.सिमा सावळे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे आजचे हे बजेट आहे. मला वाटते की, मा.नारायण बहिरवाडे हे बोलल्यानंतर काय बोलायचे. आम्ही चर्चा करत होतो की आपण बजेटवर काय बोलायचे. तुम्ही संपूर्ण बजेट खूप छान स्पष्ट केले आहे. परंतू आपण वर्षभरात या गोरगरीब विद्यार्थ्यांना कपडे देऊ शकलो नाही, बूट दिले नाहीत. त्यामुळे एवढे मोठे बजेट सादर करताना, मागील वर्षी सादर केल्यानंतर सुद्धा

आपण एखाद्या थर्ड पर्सन माणसाकडून, एखाद्या ठेकेदाराकडून ब्लॅकमेल झालो व वर्षभर या विद्यार्थ्यांना काहीच देऊ शकलो नाही. म्हणून प्रथमतः मी इथे निषेध व्यक्त करते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्तासुद्धा आपण शिक्षण मंडळाला जवळपास रु.१२५ कोटी देणार आहोत. अजूनही कपडे, बूटांचा प्रश्न मिटलेला नाही. कॉन्ट्रॅक्टर आपल्या विरोधात हायकोर्टात जातो. मा.आयुक्त साहेब, अनेक वर्षापासून आपल्याला देखील माहिती आहे की, संबंधित कॉन्ट्रॅक्टर शिक्षण मंडळाला ब्लॅकमेल करतो आहे. आपल्याकडे तरतूद पाहिजे. असे कोणी ब्लॅकमेलिंग करत असेल, मला हे काम मिळाले पाहिजे आणि मीच हे काम करु शकतो अशी माजोरी एखाद्याच्या अंगात येत असेल तर ते जिरवायची धमक आपल्यात आहे का. त्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट केले आहे तर तो ब्लॅकलिस्टच झाला पाहिजे. कारण याठिकाणी जर एखाद्या समंजस किंवा ज्याला समज आली आहे अशा व्यक्तीवर अन्याय झाला तर ते समजू शकतो. तो हातापाया पडू शकतो. तो कोर्टात जाऊ शकतो. ही अजाण, निष्पाप बालके, गोरगरीबांची मुले यांच्यासाठी आपण हे बजेट करणार. आणि ही मुले ऊन, पाऊस अंगावर घेऊन, त्यांनी हिवाळा देखील बिनस्वेटरचा काढला आहे. आणि आपल्याला कुठेही पाझर फुटलेला नाही. मग कशासाठी हे शिक्षण मंडळाचे बजेट सादर केले. एकतर आपल्याकडे विद्यार्थी आकृष्ट झाले पाहिजेत. आणि निश्चितपणे गोरगरीबांची मुले शिकली पाहिजेत. म्हणून महाराष्ट्र शासनाने किंवा महापालिकेने जे धोरण अवलंबले आहे मुलांच्या शिक्षणासंदर्भातले ते कौतुकास्पद आहे. त्याठिकाणी आपण एका माणसाच्या हातून ब्लॅकमेल झालो ते सुद्धा नाकारता येत नाही. खरेतर आत्ता या वेळी सुद्धा आम्ही अनेक वेळा मागणी केली आहे की, त्यांच्या खात्यात पैसे जमा करा. त्यांच्या खात्यात पैसे जमा केले असतेतर टेंडर काढले नसते तरी चालणार होते. परंतू आपण निर्णयच घेतला नाही. आपल्याला हायकोर्टाने जे निर्बंध घातले होते किंवा त्याला विचारात घेऊन काम करा. पण त्याला विचारात न घेता सुद्धा काम करु शकलो असतो. बजेट असताना सुद्धा आपण धोरण अवलंबले नाही. तुमचा, माझा मुलगा जुन्या ड्रेसवरच शाळेत गेलेला आपल्याला चालला असता का. आपली ड्रेसची क्वालिटी तरी काय असते. शाळेतील कोणत्याही विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थीनीला उभे करा. ज्या मुली वरचा फ्रॉक घालतात, तो दोन्ही बाजूंनी गळत असतो. गुडघ्याच्या खाली पार अगदी एँकलपर्यंत गळत असतो. ते बघितल्यानंतर कसे वाटते. आपल्या मुलांना ड्रेस घेताना ते मापाचेच असले पाहिजेत. शोल्डर एक इंचसुद्धा इकडचे तिकडे गेले नाही पाहिजे. आपण खूप काळजी घेतो. पण दान करायचे असेलतर ते दान सुद्धा सत्पात्री दान असले पाहिजे. दारांत कोणी मागायला आले आणि आपण भिका-यासारखे वाढतो, अशा पद्धतीने आपली वागणूक आहे. आपण यांच्याकडे लक्ष देत नाही. तुमचे सॉक्स, बुट, स्वेटर सगळे वर्ष व्हायच्या आत तीन-तेरा होतात. तरी हट्ट आहे की, त्यालाच दान द्यायचे. बजेट सांगायला स्वतंत्र आहे. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की, आपण ज्या-ज्या योजना राबवितो, त्या पालकांना, विद्यार्थ्यांना कंपल्सरी करा. पैसे दिले तर त्यांनी ते घेतले पाहिजेत व शाळेत आले पाहिजे.

काहीतरी नियम करा. कडक निर्बंध घाला. जेणेकरुन ते येतीलही. मा.महापौर साहेब, खरेतर शिक्षण मंडळावर टिका करण्यासारखे खूप असते. परंतू काही गोष्टी चांगल्या सुद्धा करतात. चांगल्या गोष्टींचे सुद्धा कौतुक केले पाहिजे. आपल्याकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहेत. ज्या संस्थांना आपण चालवायला देतो त्यांचे कौतुक केले पाहिजे. चांगला उपक्रम हाती घेतला आहे. बाहेरच्या ज्या प्रायव्हेट संस्था आहेत, यांमध्ये ज्यांना मुलांना घालायला परवडत नाही. डोनेशन म्हटलेतरी डोळे पांढरे होतात. इथे किमान मुले जातात. इंग्रजी माध्यमात मुले शिकतात. आरटीईचे जे नियम आहेत ते या संस्था पूर्णपणे पाळतात. चांगल्या संस्था आल्यामुळे त्यांचेसुद्धा अभिनंदन करेन. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, खरेतर आज मी बघितले, आयुक्तांनीच वर्ग घेतला. पेपरमध्ये सुद्धा फोटो आहे. भारताचा नकाशा काढला, तो अर्धवटच काढला आहे का नकाशाच अर्धवट आहे. मला माहित नाही, तुम्ही गेलात, तुमची भावना निश्चितपणे चांगली असेल. तुम्ही आत्तापर्यंत १३४ शाळांमध्ये व्हिजिट केली आहे. आपण किती शाळांच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. मा.बहिरवाडे साहेब म्हणाले, स्थापत्यने ते काम केले पाहिजे. त्यांनी शंभर टक्के केले पाहिजे. पण सुचवणार कोण. तरतूद कुठे करायची. त्यांच्या बजेटमध्ये करायची का शिक्षण मंडळाच्या बजेटमध्ये करायची. मार्ग एकच असला पाहिजे. मॉनिटरींग संस्थेचा जो अधिकारी असेल ते एकच असला पाहिजे किंवा तो विभाग एकच असला पाहिजे. त्यामुळे या १३४ शाळांच्या व्हिजिटचा कार्यक्रम चालू आहे. पेपरमध्ये बातमी वाचली आहे. परंतू आपण गेल्यानंतर आम्हीसुद्धा त्या शाळेत गेलो. दूर्दैवाने म्हणा किंवा काही म्हणा, जी डागडूजी होती. त्या पलिकडे काम झालेले नाही. शिक्षण मंडळाने परवा दापोडीच्या शाळेत कार्यक्रम घेतला होता. तिथे बोलवले होते. किमान ५/६ शाळा तिथे एकत्र आहेत. ज्याठिकाणी कार्यक्रम चालू होता, तिथपर्यंत बाथरुमचा वास येत होता. फरशा तुटलेल्या, नळ गळतोय, बाहेरची मुले आतमध्ये येत होती. आतमध्ये कार्यक्रम चालू होता. मोठमोठी मुले होती. सिक्युरीटी यांना विचारले, काका तुम्ही हटकत का नाही. ही तर बाहेरची मुले आहेत, ही दहावीच्या वर्गातील मुले आहेत का. तर तो म्हणाला, बाई, तुम्ही दुपारी येऊन बघा. इथे मोठमोठी माणसे येऊन पत्ते खेळतात. मा.आयुक्त साहेब, आपण इथे जे सुरक्षारक्षक नेमतो, ज्या संस्थेला काम दिले आहे. त्यांच्यावर कोण मॉनिटरींग करतो. आणि किती ठिकाणी आपण व्हिजिट करतो. आणि अशा ठिकाणी अशा वातावरणात, ज्या गरीबांच्या मुली, आदिवासी मुली, मागासवर्गीय समाजातील मुली शिक्षण घेत असतील तर त्यांच्या शिक्षणाचा दर्जा काय असणार आहे. सगळी मुले खेळत आहेत. बाहेरची मुले येऊन त्यांचे शाळेच्या आवारात क्रिकेट चालू होते आणि त्याठिकाणी मग आलेल्या पाहुण्यांनी त्यांना आवरायचे का. त्यांना आवरायला तिथे कोणीच नव्हते. तुम्ही व्हिजिट केल्यानंतर त्यांनी तिथे सांगितले की, बाथरुमच्या दुरुस्तीचे काम चालू आहे. पिण्याच्या पाण्याचे नळकोंडाळे व बाथरुम यातील अंतर पन्नास फुटांच्या आतमध्ये होते. म्हणजे हात वर करुन पाणी प्यायला गेलोतर बाथरुमचा वास त्या पाण्यात येईल. इतकी अस्वच्छता, इतका वाईट दर्जा

शाळांचा ठेवणार असूतर शाळेत विद्यार्थ्यांची गळती होणारच. २०१२ मध्ये मनपाच्या शाळेत ५०,००० विद्यार्थी होते. आज ४०,००० आहेत. आपल्याकडे १०,००० विद्यार्थ्यांची गळती आहे. १० वी बोर्डाची परीक्षा पास करुन विद्यार्थी पुढे गेला असे तुमच्या भाषणात म्हणाले. चवथी, पाचवीतील विद्यार्थीसुद्धा पुढे आले असतील. परंतू त्यांची संख्या पाहिलीतर याठिकाणी माझ्याकडे चार्ट आहे की, आपण किती शाळा बंद केल्या. त्यात ताजणे येथील एकच शाळा बंद केली असे त्यांनी सांगितले. इतर शाळा आहेत. जवळपास १० शाळांमध्ये आपण समायोजन केले. समायोजनाचे कारण विचारले तर त्यांनी सांगितले, १० शाळांचे समायोजन का केले तर, विद्यार्थी संख्या जी पाहिजे होती तेवढी भरत नव्हती म्हणून समायोजन केले. इंग्लिश मिडीयम असू दे, प्रायव्हेट शाळा असू दे,त्या शाळांचे संचालक,शिक्षक,कर्मचारी आजही वेगवेगळ्या, छोट्या-छोट्या बालवाड्या इथे असतात. ते सांगतात, आमची शाळा कशी चांगली आहे. तुम्ही आमच्या शाळेला व्हिजिट द्या. ते विद्यार्थ्यांना बोलवतात, त्यांना आकर्षित करतात. ते वेगवेगळ्या योजना राबवितात. आपण अशा वेगवेगळ्या योजना का राबवित नाही. आपले विद्यार्थी संख्या वाढवण्याकडे लक्ष का नाही. आपले शिक्षक का फिरत नाहीत. जर ३६५ दिवसांपैकी ते १४५ च दिवस ते काम करत असतील आणि ३६५ दिवसांचा पगार घेत असतील, तुम्हाला कामाचा मोबदला पूर्ण मिळत असेलतर कामसुद्धा त्या लायकीचे झाले पाहिजे. तुम्ही शिक्षकांना सुद्धा ताकीद दिली पाहिजे की, तुम्ही वाड्यावस्तीवर जा. किमान ५ विद्यार्थी आणलेच पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या आई-वडीलांना समजून सांगा. त्यांना गळ घाला. विद्यार्थी शाळेकडे कसे येतील याकडे जास्तीत-जास्त लक्ष दिले पाहिजे. नाहीतर वाड्यावस्तीवर तुमच्या बालवाड्या वाढवा.जेणेकरुन तुमच्याकडे विद्यार्थी डायरेक्ट ट्रान्सफर होतील. मा.आयुक्त साहेब, तुम्ही महापालिकेचे आयुक्त आहात. काहीही कारभार करायचा असेलतर तुमच्या अधिका-यांना तुमच्यापर्यंत यावे लागते. शाळेत दोन/दोन वर्षे मुख्याध्यापक नेमत नाहीत. महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या २१ शाळांत, हिंदी माध्यमाची १ शाळा व उर्दू माध्यमाच्या एका शाळेत मुख्याध्यापक नाहीत. मग सांगा, आपले शाळेकडे किती लक्ष आहे. आपण इतक्या शाळांमध्ये मुख्याध्यापकच देऊ शकत नसू, एका मुख्याध्यापकाकडे दोन/दोन तीन/तीन शाळांचा कारभार देत असू तर, शाळेकडे कसली हजेरी, कुठला शिक्षक कधी आला, कधी गेला. शाळेत वाढदिवस कसे साजरे होतात. कारण त्या शिक्षकांना त्याठिकाणी विद्यार्थ्यांना आवरायला, शिक्षकांनाही आवरायला मुख्याध्यापकच नाहीत. त्यांची भरती केली पाहिजे. त्यांचे कामाचे वाटप केले पाहिजे. मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाच्या या बजेट संदर्भात बोलताना बजेटमध्ये सुरक्षा कर्मचा-यांकरिता जवळपास रु.१८ कोटी तरतूद मागीतली आहे. त्याचबरोबर नवीन शिक्षक भरती करण्यासाठी रु.५ कोटींची तरतूद मागीतली आहे. शिक्षक नाहीत किंवा कमी आहेत. हे आपल्यालासुद्धा शंभर टक्के मान्य असले पाहिजे. म्हणून शिक्षक-शिक्षिकांच्या पगाराचे नियोजन व्हावे म्हणून त्यांनी पैसे मागितले असतील तर आपण ते दिले पाहिजेत. सुरक्षेची जबाबदारी वेगळ्या विभागाकडे आहे. साफसफाईची जबाबदारी वेगळ्या विभागाकडे आहे. आणि

मग शिक्षण मंडळात काय बोलायला गेलोतर त्यांनी तिथे म्हणायचे, आमचे साहेब बघतील काय करायचे ते. आम्ही साफसफाईसंदर्भात अनेक वेळा बोललो आहोत. प्रत्येक वेळी बजेट पास करताना तेच बोलायचे याची आम्हाला लाज वाटते. त्यासंदर्भात बोलताना आपण मागील वर्षी सांगितले होते की, आपण आधुनिक पद्धतीची शौचालये करणार आहोत. आहे त्याची नीट निगा राखलेली नाही. नवीन बांधायचे तर सोडूनच द्या. आपण मागील वर्षी आपल्या भाषणांत सांगितले होते, शाळांमध्ये वॉटर फिल्टर बसवणार आहोत. ते सुद्धा आपण लावलेले नाहीत. हे सुद्धा आपण केलेले नाही. शाळांच्या सुरक्षेवरुन आपला प्रचंड वाद झाला आहे. प्रत्येक शाळेत दांडगाई होते, गुंडगिरी होते. विद्यार्थ्यांमध्ये मारामारी होते. मागील वर्षी एका शाळेत विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. ते प्रकरण ताजे असतानासुद्धा आपण आजही सुरक्षेवर सिरीयसली विचार करत नाही. शाळेचा सुरक्षा कर्मचारी ६५ वर्षांचा असेल तर तो काय काम करणार. एकिकडे आपण ६० वर्षे पूर्ण झाली की कर्मचा-याला घरी बसवतो. त्यांना घरी बसवा असे मी म्हणणार नाही. कारण त्याने अनेक वर्षे काम केलेले आहे. त्यांना कुठेतरी वेगळे काम द्या. नवीन सुरक्षा कर्मचारी नेमू शकता. हे संस्थेला बंधनकारक आहे. जेणेकरुन त्यांना कामाचा सिरिअसनेस वाटला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी वाटली पाहिजे. तुम्ही सगळ्या शाळांत गेलात. त्या शाळांमध्ये काय परिस्थिती आहे. तुम्ही व्हिजिट केली. हे आपण अत्यंत सिरिअसली घ्यावे अशी विनंती आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शाळा सुरु होऊन शाळा संपायला आल्या आहेत. अजूनही विद्यार्थ्यांना काही दिलेले नाही. आपल्याला कोर्टाकडे विनंती करता आली, कोर्टाला सांगता आले की, आम्ही विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा करतो, तर मला वाटत नाही कोर्ट तुम्हाला नाही म्हणेन म्हणून. तर हे सुद्धा आपण तातडीने करावे अशी विनंती आहे. मा.महापौर साहेब, मी कासारवाडीच्या शाळेत गेले होते तेव्हा पाहिले की, शाळेच्या भिंतीला पोपडे पडले आहेत, जळमटे लागली आहेत. बाहेरुन पूर्ण मातीचा उकिरडा झाला आहे, तिथे फरशी बसवा. त्याठिकाणी रंगरंगोटीवर खर्च केलाच पाहिजे, त्या विद्यार्थ्यांसाठी छोटी-छोटी चित्रे काढा. आकर्षक वाटले पाहिजे. जुन्या शहाबादी फरश्या आहेत, त्या बदलाव्यात. त्याचे बजेट वेगळे करा. त्या–त्या प्रभागात त्या बजेटचा अंतर्भाव व्हायला पाहिजे होता, तो केलेला नाही. वॉटर फिल्टरींगसाठी रु.२० लाख देणार आहोत. तसेच प्रत्येक शाळेत वॉटर फिल्टर बसवा. मी १० ते १२ वर्षांतील मुलींसाठी गेले अनेक दिवस मागणी करतेय की, शाळेमध्ये त्यांच्यासाठी सॅनिटरी नॅपकीन्स ठेवण्यात यावेत. मग ते का ठेवत नाहीत ते मला कळत नाही. गरज असताना सुद्धा तिथे दुर्लक्ष करत आहोत. अत्यंत तातडीचा, निकडीचा विषय असलातरी आपण त्याकडे दूर्लक्ष करताय. मला माहित नाही, आपल्याला यातून काय साध्य करायचे आहे. त्याठिकाणी सॅनिटरी नॅपकीन्स ठेवले पाहिजेत. शाळेत मुलींसाठी तक्रार पेटी असली पाहिजे. शाळेत तक्रारपेटीची अवस्था काय आहे. कोणीही येतो, काढतो आणि वाचतो. एखाद्या मुलीने एखाद्या मुलाबद्दल तक्रार केली आणि त्याला ती वाचायला मिळालीतर नंतर कोणीही तक्रार करणार नाही. प्रामुख्याने तक्रार पेटीकडे लक्ष द्यावे.

मा.महापौर साहेब, आम्ही सातत्याने सगळ्या शाळांमध्ये महिला कमिटी नेमण्यात यावी अशी मागणी केली होती. प्रत्येक महिन्याच्या दुस-या,चौथ्या शनिवारी मुलींचे समुपदेशन झाले पाहिजे. मुलींना बोलते करता आले पाहिजे. याकडे सुद्धा आपण लक्ष द्या. केवळ कागदी घोडे नाचवून किंवा कागदी पुस्तकातून शिक्षण घेऊन त्याचा उपयोग होणार नाही. त्यांना प्रॅक्टीकलीसुद्धा आयुष्य जगता आले पाहिजे यासाठी सुद्धा आपण प्रयत्न केले पाहिजेत. मा.महापौर साहेब, सदस्यांनी ज्या काही सूचना सांगितल्या आहेत, टिका करण्यासारखे भरपूर आहे. अनेकवर्षे टिका करुनसुद्धा सुधारणा होत नाही. ज्या काही सूचना केल्या आहेत. किमान त्यांचा तरी विचार करा. मनपा शाळेतील गोरगरीबांची मुले आहेत. त्यांचा आपल्याला कड येऊ द्या. एवढे सांगून थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.सुलभाताई ऊबाळे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी दिनांक २९ जानेवारी २०१६ या दिवशी बदलीची एक ऑर्डर आली आणि ती बदलीची ऑर्डर होती, श्रीमती आशा ऊबाळे, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे. बदलीची पदस्थापना त्या बाहेर कुठेतरी गेल्या आहेत. परंतू अभिप्राय काय आहे ते आपल्याला माहिती आहे. मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह,अभिप्राय असा आहे की, तक्रारींवरुन बदली करण्यात येत आहे. म्हणजे महाराष्ट्र शासनाने केलेल्या बदलीत तक्रारींवरुन बदली असे म्हटले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इतिहासातली ही अशी पहिलीच बदली आहे. यामुळे महापालिकेची प्रतिमा मलिन झाली आहे. मा.आयुक्त साहेब,या सर्व गोष्टींना आपण देखील कुठेतरी जबाबदार आहात. कारण गेल्या तक्रारी अनेक दिवसांपासून येत होत्या. त्या तक्रारींचे स्वरुप इतके मोठे होते की,माजी उपमुख्यमंत्री असतील,माजी आमदार असतील,स्थानिक संघटना असतील,स्थानिक शिक्षक संघटना असतील त्या सगळ्यांनी आपल्याशी लेखी पत्रव्यवहार केला होता. असा पत्रव्यवहार केलेला असतानासुद्धा त्या गोष्टीकडे आपण गांभिर्याने बघितले नाही. यासाठी खरेतर शासनाचा जी.आर आहे. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,श्री.नंदकुमार साहेब यांनी ७ मार्च २०१५ रोजी जो जी.आर. काढला आहे, त्यात क्लिअर कट म्हटले आहे की, राज्यातील सर्व आयुक्त, महानगरपालिका व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या विभागांच्या गट अ व गट ब अधिका-यांनी त्यांना सोपवलेल्या जबाबदारीत कसूर केली असल्यास, त्यांच्याविरुद्ध जलद गतीने कारवाई केल्यास प्रशासनातील अनियमितता कमी होईल. आणि क्षेत्रिय स्तरावर असलेल्या अनियमिततेबाबत आवश्यक कागदपत्रे,साक्षीदार,पुरावे हे संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असल्यामुळे या प्रकरणी त्यांच्या स्तरावर तात्काळ कारवाई होणे आवश्यक आहे. सबब संबंधित अधिका-याविरुद्ध शिस्त भंगविषयक कारवाई शासनाच्या खालील सूचनांप्रमाणे केली गेली पाहिजे,असे सन्मा.आयुक्तांना आदेश दिले गेले आहेत. मग आपल्याला जर सक्षम अहवाल याठिकाणी प्राप्त झाला होता.

मा.नारायण बहिरवाडे असतील, मा.सिमाताई सावळे असतील यांनी ज्या तक्रारी केल्या आहेत, त्यात तथ्य आहे. परंतू त्याला जबाबदार असणा-या अधिका-याच्या कार्यकाळात एकही बदली, एकही प्रमोशन किंवा बाहेरील शाळांची जी नियमितता होती ती पैसे घेतल्याशिवाय दिली गेली नाही अशा तक्रारी जेव्हा प्राप्त होत होत्या. त्यानंतरसुद्धा आपण गप्प का बसलात. आपण त्याची चौकशी का केली नाहीत. त्यामुळे याठिकाणी आपल्याकडे मागणी करतेय की, शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी श्रीमती आशा ऊबाळे यांचा महापालिकेतील दि.१२/८/२०१३ पासून दि.३१/१/२०१६ पर्यंतचा कार्यकाल त्यांच्या कार्यकक्षेतील संपूर्ण कामकाजाची चौकशी व्हायला पाहिजे. मा.आयुक्त साहेब, लेखापरिक्षणातील त्यांच्या कामकाजाचे जे ताशेरे आले आहेत. जे येणार आहेत. महापालिकेचे व शासनाचे जे लेखापरिक्षण येणार आहे, त्यात जी तफावत असणार आहे, त्याची चौकशी केली पाहिजे. आणि त्याचा अहवाल मा.महापालिका सभेत मांडला पाहिजे. अन्यथा आम्हाला पुन्हा शासनाकडे दाद मागावी लागेल. ज्यावेळी शिक्षणमंत्री आपल्याला कळवतात, शिक्षण विभागाचे उपसंचालक आपल्याला कळवतात. तरीदेखील आपण बदली करत नाहीत. शिक्षण मंडळाच्या सदस्यांनी ठराव केला होता, त्यांनी बदलीची मागणी केली होती. आणि आत्ता ज्याची चर्चा मोठ्या प्रमाणात झाली, त्या निविदेचा खेळ वर्षभर चालला आहे. हा खेळ त्या ठेकेदारापेक्षा आपली अकार्यक्षमता सिद्ध करतो. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाच्या ज्या निविदा निघतात. त्याची फाईल आपण बघीतली तर ख-या अर्थाने कळेल की याला कोण जबाबदार आहे. ही निविदा काढत असताना जी नोट चिफ ऑडीटर मॅडम यांनी लिहिलेली आहे. मा.तानाजी शिंदे यांच्याकडे त्या विभागाचा चार्ज आहे. त्यांनी सरळ-सरळ त्यात उल्लेख केला आहे की, कोणताही ब्रँड न टाकता निविदा मागविण्यात याव्यात. त्यात फक्त मॅन्युफॅक्चरर असेलतर आय.एस.आय. ही अट टाकावी. शिक्षण मंडळाने आय.एस.आय. न टाकता आय.एस.ओ. टाकले. आय.एस.ओ. कुठेही मिळते हे तुम्हाला माहित आहे. जर मला एका अधिका-याने सांगितले की, शिक्षण मंडळात पदाधिकारी असतील, किंवा तिथे व्हि.एस.सलगर नावाचा एक क्लार्क आहे. तो म्हणतो तेच शिक्षण मंडळात होते. शिक्षण अधिका-याने त्याचे ऐकले नाहीतर तो अजूनच अडचणीत येतो. असा क्लार्क तिथे बसून उपद्व्याप करत असेल तर, मा.आयुक्त साहेब, मी हे अत्यंत गांभिर्याने सांगते आहे. त्याठिकाणी जी रेनकोटची कंपनी होती, ती कंपनी, आणि वह्यांची कंपनी या सगळ्यांनी मिळून तिथे रिंग केली होती. त्यांनी स्वतःच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या रजिस्टर्ड केल्या होत्या. आणि एकमेकांना सपोर्टिंग टेंडर भरले होते. ज्याचे टेंडर होते तो राजेश नहार याचे नाव घ्यायला कशाला घाबरायचे. तो राजेश नहार शिक्षण मंडळात अनेक वर्षांपासून काम करत होता. ज्यावेळी त्याला कळाले की, त्याची कंपनी या टेंडरमधून वगळली आहे त्यावेळी त्याने बदला म्हणून तो कोर्टात गेला. मग त्याचा बदला, ह्यांचे बाकीचे करण्यासाठी तुमचे बजेट मंजूर करताय का आता. तुम्ही सांगा, काय संबंध आहे. जर तुम्ही त्यात कोणताही ब्रँड टाकला नसता, कोणतीही कंपनी टाकली नसती तर ही वेळ आज

आली नसती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुस्तकाचे टेंडर काढले आहे आणि त्यात नवनीत पब्लिकेशन जे संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे, ते नवनीत पब्लिकेशन वगळून शिक्षण मंडळाने कौसल्या पब्लिकेशन जे थातूर-मातूर रस्त्यावर ज्याची पुस्तके कुठे मिळत नाहीत ते टाकले आहे. त्याचे कारण काय ते सांगा. आज नवनीत प्रत्येकाला माहिती आहे. तुम्हाला जर ब्रँडेड वस्तू नको असतील, तुम्हाला मॅनेज होणा-या, जास्त टक्केवारी देणा-या लोकांना खरेदी करायचे असेलतर बरखास्त व्हायची वाट बघण्यापेक्षा इथेच सगळे बरखास्त करा. हि अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. एवढे सांगून, एवढा सगळा पत्रव्यवहार करुन सुद्धा, अतिरिक्त आयुक्त साहेब सुद्धा हेल्पलेस झालेत. ऑडीटर मॅडम सुद्धा हेल्पलेस झाल्या. काहीही करता येत नव्हते. त्यांची दुस-या मजल्यावर स्वायत्त संस्था आहे. दुस-या मजल्यावर तिस-या व चौथ्या मजल्यावाल्यांचे काही चालत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. आम्ही एवढे पोटतिडकीने सांगतोय, मग यांच्यापुढे आमचे कोण कशाला ऐकून घेणार. निविदा काढताना जो भ्रष्टाचार खुलेआम चालला आहे. जे कोणी जबाबदार आहे त्या सर्वांवरच कारवाई व्हायला पाहिजे. तुम्ही त्या लोकांना एखादे दुकान सांगा किंवा एखादे मंडळ सांगा जिथे ड्रेस शिवून मिळतील. शिक्षण मंडळात जे युनिफॉर्म दिले गेलेत, ते एकदम २/३ वर्षांचे खरेदी केले गेले आहेत. हे पुढे होणार आहे ते पुढे अडकणार आहे हे त्या महाशयांना कदाचित माहित असेल. त्यामुळे पुढील सर्व खरेद्या अडकल्या आणि शिक्षण मंडळात फक्त युनिफॉर्म दिले गेले. मा.आयुक्त साहेब, मी याठिकाणी आमच्या पक्षाच्या वतीने मागणी करते की, ऊबाळे मॅडम यांची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. मा.महापौर साहेब, आपल्याकडे तो अहवाल द्यावा अशी मी याठिकाणी मागणी करते. आणि याची कारवाई लवकरात लवकर व्हावी. अन्यथा आम्हाला शासनाकडे तक्रार करावी लागेल. धन्यवाद!

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, आज शिक्षण मंडळाच्या बजेटच्या विषयाच्या माध्यमातून विशेष महापालिका सभा बोलवली आहे. मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवकांच्या वतीने आपल्याला एक सूचना आहे की, सभागृहात शिक्षण मंडळाच्या बजेटवर चर्चा करत आलो आहोत. जवळपास मा.नारायण बहिरवाडे साहेबांपासून जे जे बोलले आहेत त्यांनी त्यांच्या-त्यांच्या समस्या मांडल्या आहेत. असेच म्हणावे लागेल की, तोच खेळ तोच तमाशा. फक्त तिकीटांची आकडेवारी बदलली. ज्या-ज्या वेळी सभागृहामध्ये शिक्षण मंडळाच्या बजेटच्या माध्यमातून प्रत्येक नगरसेवकाकडून पोटतिडकीने आपल्या भागातील शाळेची व्यथा सांगायचा प्रयत्न केला जातो. मा.आयुक्त साहेब, मला आपल्याला एकच प्रश्न विचारायचा आहे की, ज्या-ज्या नगरसेवकांनी आजपर्यंत तक्रारी केल्या, त्यांच्या सूचनांची अंमलबजावणी झाली का हे प्रोसिडींग पाहून सांगा. ज्यावेळी एवढे नगरसेवक सभागृहात बोलतात, त्यावेळी फक्त तुम्ही ऐकताय, आम्ही बोलतोय, सभागृह ऐकतेय. पत्रकार छापतात. यात नवीन एक सुद्धा प्रश्न सांगितला नाही किंवा त्याची अंमलबजावणी झाली आणि तो प्रश्न सभागृहात आलेला नाही असे

झालेले नाही. मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, मी वेगळ्या विषयावर बोलणार आहे. सभागृहात अनेक वेळा हा विषय झाला आहे. मी बालवाडीच्या माध्यमातून बोलणार आहे. माझी चिखली गावात एक बालवाडी आहे. १९९० मध्ये चालू केली. गेली ७ वर्षे, एक महिला आहे तिचे नाव श्रीमती बोराटे. आम्ही तिचा सत्कार केला होता. बोराटे मॅडम २००७ पासून एक बालवाडी फुकटात चालवतात. मा.महापौर साहेब, मी सभागृहात अनेक वेळा हा विषय उपस्थित केला आहे. मी अनेक वेळा हे सगळे सांगत असताना सुलभाताईंनी सांगितले, मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले, महापालिकेच्या शाळांतून विद्यार्थ्यांची गळती होत चालली आहे. आमच्या भागातील शाळेतील पट १८०० ते २००० च्या आसपास आहे. आमच्या शाळेत पट वाढत चालला आहे. चांगल्या ठिकाणी आमची शाळा आहे. एवढे असताना एवढ्या मोठ्या शाळेत एक बालवाडी आहे ती पण एक भगिनी फुकट चालविते. यापेक्षा निंदनीय बाब महापालिकेत काय आहे. मी हे सभागृहात अनेक वेळा सांगितले आहे. या बालवाडीतसुद्धा आपण काय करणार. त्या १०४ मुलांना शिकवत असतील, आणि आपण त्यांना मानधन देत नसालतर, त्यांनी कशासाठी काम करायचे. प्रत्येक वेळी आम्ही नगरसेवक हेच सांगतोय. प्रत्येक वेळी त्याच व्यथा सांगत आहेत. त्यावर आपल्याकडून अंमलबजावणी होत नसेल, पुन्हा त्याच गोष्टींची पुनरावृत्ती होत असेल तर विशेष सभा बोलवण्याचा काही उपयोग नाही. म्हणून मला आज या दोन विषयांची माहिती पाहिजे. मी जे बोलतोय याची अंमलबजावणी तुम्ही करणार आहात का. चिखली गावात जवळपास ७ वर्षे एक भगिनी विनाअनुदानीत बालवाडी चालवतेय. तिच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात. याचे आयुक्त साहेब, आपण मला उत्तर द्यावे. बालवाडी चालवायची असेलतर ते बालवाडी आपल्यासाठी चालवतात. आज बालवाडीसाठी एवढे बजेट ठेवले असताना ते जर तुम्हाला द्यायचे नसेलतर तसे सांगा. त्या बाईंनी दि.१०.७.२००९ला अर्ज केला होता. दि.१८.८.२०११ला अर्ज केला होता, दि.९.७.२०१२ला अर्ज केला होता. दि.३.११.२०१२ ला अर्ज केला होता. दि.३.११.२०१२ ला मुख्याध्यापकांनी शिफारस केली होती. दि.२१.१२.२०१२ला पुन्हा तीने अर्ज केला होता. दि.२८.८.२०१३ ला एक अर्ज केला होता. नंतर दि.८.७.२-१४ ला अर्ज केला होता. आता ती म्हणते मला हे सगळे बंद केलेतर चालेल का. एवढा कागदोपत्री पाठपुरावा करुन सुद्धा २००९ नंतर आपण किती बालवाड्यांना मंजूरी दिली आहे हा माझा प्रश्न आहे. आम्ही बाकी काय ते स्वतः देतोय. हे महापालिकेच्या माध्यमातून त्यांना काही द्यायचे नसेल, मानधन द्यायचे नसेलतर या बालवाड्या बंद करा. बाहेरच्या शाळा जशा चालल्या आहेत, तशा चालू द्या. आज आपण गोरगरीबांच्या मुलांना शिकवावे हा चांगला उद्देश्य महापालिकेसमोर असताना आपण या किरकोळ गोष्टींवर लक्ष देत नसालतर मला वाटत नाही की, शाळेत बसायचे असेलतर आपल्याकडे कोणी येणार नाही. ही परिस्थिती राहणार आहे. शाळा स्वच्छतेच्या, साफसफाईच्या माध्यमातून सांगतो, यापूर्वी प्रत्येक शाळेत तीन/चार लोक होते. जिथे चार लोक होते तिथे दोन ठेवले आहेत. जिथे दोन लोक होते तिथे एकच माणूस ठेवला आहे. असे काम कमी केले आहे. एका शाळेत ३०/३०

वर्ग असतील आणि एक भगिनी किंवा एक बांधव पूर्ण शाळा स्वच्छ करत असेल आणि जर दोन शिफ्टमध्ये शाळा चालवायची असेलतर तो किंवा ती शाळा कशी स्वच्छ करणार. हा प्रश्न सुद्धा गांभिर्याने घ्यावा लागणार आहे. माझ्या या तीन प्रश्नांची उत्तरे दिलीत तर बरे होईल.

**मा.प्रशांत शितोळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज शिक्षण मंडळाच्या या विशेष सभेसाठी याठिकाणी सगळे जण बसलेले आहेत. आपल्या शहरात शिक्षण मंडळाची अनेक वर्षे काय परिस्थिती आहे हे आम्ही तुम्ही पाहतो आहोत. गेले काही दिवसांपूर्वी शिक्षण मंडळाच्या प्रशासकाची बदली लाजिरवाण्या प्रकाराने होणे ही सुद्धा एक चुकीची गोष्ट आपल्या शिक्षण मंडळाच्या बाबतीत घडलेली आहे हे आपण सर्वांनी पाहिले आहे. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी मांडलेल्या विषयाला मी सहमत आहे. अशा प्रकारची गोष्ट व्हायला नाही पाहिजे होती. का झाली याला त्या भागात काम करणारे सर्वजण जबाबदार आहेत. हे सगळे होत असताना गेले काही वर्षांत तुम्ही आम्ही अभ्यास केला, विचार केलातर आपले शिक्षण मंडळ बूट,कपडे,वह्या, दप्तर खरेदी, रेनकोट खरेदी यातच गुरफटलेले असते प्रशासक म्हणून. १२ सदस्यांची मात्र नाहक बदनामी होत असते. १२ सदस्य चांगले काम करायचा प्रयत्न करत असतात. केवळ एक ठेकेदार महापालिकेच्या आख्ख्या शिक्षण मंडळाला इतके पिळून काढतो आणि आपण त्याला बळी पडतो. आपण कोर्टातसुद्धा त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. ही सुद्धा आपली पडती बाजू आहे. इथले काय मुद्दे आहेत याच्याशी आम्हाला देणेघेणे नाही. केवळ एका माणसाच्या नाहक त्रासामुळे, ते बरोबर आहे का चूक हे कोर्ट ठरवेल. पण आज जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांना तोंड द्यावे लागते आहे. एखाद्या ठेकेदाराला शिक्षा करत नसूतर मग मात्र आपल्या महापालिकेलादेखील हा कमीपणा आहे. अशा लोकांना सुद्धा अद्दल घडवली पाहिजे. जेणेकरुन हे नालायक ठेकेदार आहेत, ज्यांच्यामुळे आपले महापालिकेचे शिक्षण मंडळ वेठीस धरले जाते. या लोकांना गेटमधून सुद्धा एन्ट्री दिली नाही पाहिजे. सार्वजनिक वास्तू आहे पण अशा प्रकारे महापालिकेला वेठीस धरणे ते सुद्धा शंभर टक्के चुकीचे आहे. काही अडचणी असल्यातरी काही दूर करायचा प्रयत्न करत असतो. हे प्रयत्न करत असताना शिक्षण मंडळ बघितलेतर यातील प्रत्येक व्यक्तीला खरोखरच कुठेतरी सेल्फ-डेव्हलपमेंटची गरज आहे यात काही शंका नाही. आपण जशी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटची प्रोसेस करतो, मेडिटेशन करतो, तसे शिक्षण मंडळाचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. याचे कारण तुम्ही समाज घडवत असताना आपल्या हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देणार असालतर, आणि शिक्षण देणा-याची मानसिकता जर संकुचित असेलतर आपले विद्यार्थी सुद्धा त्याच पद्धतीने वाढणार. गेले काही वर्षांपूर्वी जी पटसंख्या होती, त्याचा पट विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. दोन वर्षांपूर्वी ५५,००० पटसंख्या होती. आज ५५,००० ची पटसंख्या ५०,००० झाली आहे. काही वर्षांनी आपल्याला आपल्या शिक्षण संस्था बंद कराव्या लागतील. आज आम्हाला काही शिक्षण संस्थांचे कौतुक वाटते. बजाज या संस्थेच्या शिक्षण स्किममध्ये शिक्षण

मंडळाला सामावून घेण्याचा काही सदस्यांनी प्रयत्न केला. इथे मनपाच्या गोरगरीब विद्यार्थ्यांना फायदा करुन घ्यायला खरोखरीच आपले इन्फ्रास्ट्रक्चर तसे आहे का. मी तिथला नगरसेवक आहे म्हणून मला अमुक-अमुक वाटले म्हणून मी त्या पद्धतीने डेव्हलपमेंट करायचे ठरवले असे धोरण मी अवलंबले नाही पाहिजे. तुम्ही तुमचा पॅटर्न बनवला पाहिजे. तुम्ही तुमच्या पद्धतीने स्टँडर्ड मेंटेन केला पाहिजे. तुम्ही तुमच्या पद्धतीने शाळेला योग्य ती मॅनेजमेंट सिस्टीम दिली पाहिजे. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला माहित आहे सगळ्या गोष्टी रेकॉर्डवर आहेत. काही वर्षापूर्वी आयएमएस या संस्थेला चाळीस कोटी रुपयांचे काम दिले होते. ते खर्च केले असतील तर त्याचे आऊटपुट रिझल्ट आपले शिक्षक देऊ शकलेत का. त्या पैशांचा उपयोग करुन शाळेची पटसंख्या वाढविण्यात आपले शिक्षक यशस्वी झाले का. हे सुद्धा खरेतर अभ्यास करण्यासारखी गोष्ट आहे. नुसतेच शासन पैसे देते आहे, महापालिका पैसे देते आहे. म्हणून मोकाट पैसे खर्च करणे याला काही अर्थ नाही. मा.आयुक्त साहेब, आपली औद्योगिक नगरी आहे. आपला सीएसआर किती शाळांमध्ये वापरला गेला. किती सीएसआर शाळेच्या उपक्रमांसाठी, शिक्षकांसाठी या लोकांनी दिला. सीएसआर वापरून मी केवळ साफसफाई करायची होती का. तो सीएसआर वापरता येतो का, याची जबाबदारी शिक्षकांकडे द्या. सांस्कृतिक कार्यक्रमांना सहकार्य करा म्हणून शिक्षक आमच्याकडे येत असतात. आमच्याकडे कशाला यायचे. तुम्ही सीएमआर गोळा करा. आज आपला काही परिसर रहिवास परिसर आहे. आमच्याकडे इंडस्ट्रीज नाहीत. शंभर टक्के रहिवास विभाग आहे. पण जर तुम्ही आमच्यासारख्या चांगल्या परिसरातील शाळेला एखाद्या कंपनीचे सहकार्य दिलेतर चांगल्या प्रकारचे शिक्षण शंभर टक्के देता येईल. बजाज ही आपल्या शहरातली प्रसिद्ध इंडस्ट्री आहे, जगात प्रसिद्ध आहे. या लोकांनी जर महापालिकेतील शाळेचा विकास करायचे ठरवले आहे. यात आपल्या शाळा जास्तीत जास्त कशा राहतील यावर आपला भर पाहिजे. त्यांनी नुसत्या खाजगी शाळा निवडल्या, ते उद्या रिझल्ट बघणार, तुम्ही आऊटपुट चांगले दिले नाहीतर बजाजसारखी संस्था काय कोणीच अनुदान देणार नाही, मदत करणार नाही. आज जग कुठे चालले आहे. काही-काही शाळांमध्ये लाखो रुपये फि घेतात. विद्यार्थी एअरकंडीशन्ड क्लासमध्ये बसतात. दुसरीकडे आपली महापालिका दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करते तरी त्याचा रिझल्ट काय मिळतोय. दरवर्षी प्रत्येक शाळेतील ५० विद्यार्थी कमी होत आहेत. आपल्या २१७ इमारतीं आहेत, त्यांचा खर्च, त्याचा मेंटेनन्स. आपला इंटरेस्ट कशात, कोण साफसफाई करतो, कोण ठेकेदार आहे. आपला वेळ नको तिथेच वाया जातो. त्यांना स्वतंत्र यंत्रणा द्या, जबाबदारी द्या. तुम्ही कदाचित शाळेत गेला असाल. आपल्या २१७ शाळांतील टॉयलेटमध्ये तुम्ही फ्रिली जाऊ शकता का. शंभर टक्के नाही. अशी जर मानसिकता टॉयलेटची असेल. प्रत्येक शाळेच्या सुरुवातीलाच दुर्गंधी येत असेलतर त्या विद्यार्थ्यांनी काय शिकायचे. या साध्या गोष्टी आहेत. परंतू केवळ इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणे म्हणजेच चांगले शिक्षण दिले असे होत नाही. महापालिकेच्या २०० शाळांना एकसारखे इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे. महापालिकेच्या सगळ्या शाळांना एकसारखी कलरस्कीम पाहिजे. मी माझ्या गावातील

शाळेचा अध्यक्ष आहे. म्हणून मला आवडतो तो कलर शाळेला द्या. कशासाठी शाळा चांगल्या दर्जाची करण्याचा शंभर टक्के प्रयत्न करा. बापू भालेकर यांची शाळा ही महापालिकेतली एक नंबरची शाळा आहे. आम्ही त्यांच्याकडे कायम पाहत असतो. बापूंनी त्यांच्या भागातील कंपन्यांकडे जाऊन माझ्या शाळेला हे द्या, माझ्या शाळेला ते द्या, माझ्या शाळेला कॉम्प्यूटर द्या, माझ्या शाळेला सोलर द्या. ज्या-ज्या चांगल्या गोष्टी आहेत, त्या-त्या शाळेला देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परंतू एक शिक्षण मंडळ म्हणून, प्रशासन म्हणून प्रत्येकजण जबाबदारीने प्रयत्न करत असतो. त्याचे यश मात्र आपल्याकडे नक्कीच येत नाही. काही सभासद असेही आहेत. जसे सन्मा.खासदार श्रीरंगअप्पा बारणे आहेत. त्यांनी नगरसेवक असताना सभागृहामध्ये दप्तरच फाडून दाखवले होते. फाडाफाड करायची, चिरफाड करायची यासाठी शिक्षण मंडळ नाही. त्याची चिरफाड आमच्यासारख्यांकडून होऊ नये ही खबरदारी घेण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. शिक्षण मंडळ सुप्रसिद्ध नाही. कुप्रसिद्ध शिक्षण मंडळ झाले आहे. हा शिक्का आपल्याला मिटवायचा असेल, प्रशासकावर कारवाई होउन बदली होणार असेल तर शंभर टक्के आपले कामकाज चुकते आहे. आम्ही नगरसेवक कधी जास्त लक्ष देत नाही. कारण आपली स्वतंत्र बॉडी आहे. या बॉडीचे हे शेवटचे वर्ष आहे. हे लोक पुढील वर्षी नसतील. जो काही शासन निर्णय येईल, त्याप्रमाणे शिक्षण मंडळाचा कारभार भविष्यात चालणार आहे. त्यामुळे त्यांना सुद्धा वाटते की, आमच्या कालावधीत जास्तीत-जास्त निधी खर्च करावा. जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांना चांगले प्रशिक्षण द्यावे. त्यांना टॅब द्यावेत. त्यांना ई-लर्निंग द्यावे. त्यांना हायटेक शिक्षण द्यावे. महापालिका शाळेतील विद्यार्थी मागासलेल्या परिसरात, झोपडपट्टी परिसरात राहतात. अशा परिसरातील विद्यार्थी संख्या तुलनेने जास्त आहे. इतर मध्यमवर्गीय मुलांची सुद्धा संख्या आहे. या सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना तुम्ही नवीन जमान्याप्रमाणे शिक्षण दिले पाहिजे. ज्या तरतूदी दिलेल्या आहेत, त्या काही ठिकाणी कमी-जास्त आहेत. या काय तक्रारी आहेत का. काकांनी एका लेडीजचे उदाहरण दिले आहे. बालवाडी, अंगणवाडीसाठी त्यांना भांडावे लागते. खिचडीसाठी आपण एक/दोन कोटी जास्त खर्च करतो. साहेब, त्यांना पण द्या. महापालिकेला काय करायचे आहे. नाहीतरी आमच्या बजेटमधून ६०० कोटी रुपये वाचवले आहेत. १/२ कोटी अशा प्रकारच्या डेव्हलपमेंटमध्ये लागत असतील, त्याचा फायदा या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार असेलतर शंभर टक्के या खर्चाला कात्री लावू नका. मग त्यांची भांडणे काय, अंगणवाडीला शासकिय अनुदान आहे. समाजकल्याण विभागाकडून ते होवो न होवो त्यांची नेमकी हमी नाही. पण आपल्याला स्वायत्त अधिकार आहेत. आपण आपल्या स्वायत्त अधिकारांचा वापर केला पाहिजे. त्यांना दोन/तीन हजार शंभर टक्के अतिरिक्त दिले पाहिजेत. आपल्याकडे २,००० रुपयावर टॉयलेट साफ करणारा कोर्टात जातो. मग आपण मुलांना शिक्षण द्यायचे का कोर्टात भांडत बसायचे. त्यांना मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे काय द्यायचे द्या. कशाला ते कोर्टात जातात. ज्या त्या लोकांना ज्या त्या जागांवर कॉम्प्रमाईज करायचा प्रयत्न केला, त्यांना सामावून मानसिकता चांगली ठेवून आपल्याला फायदा करता आलातर त्याचा

परिणाम उद्याच्या विद्यार्थ्यांवर चांगला होणार आहे. याची सभागृहात चर्चा होणे चुकीचे आहे. परंतू या गोष्टी प्रशासकीय पातळीवर मिटवल्या गेल्या पाहिजेत. प्रशासनाचा कंट्रोल शिक्षण मंडळावर नसेल तर ही त्यांची जबाबदारी आहे. मा.आयुक्त साहेब, आत्ताच नवीन आलेले अधिकारी त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करा. मार्किंग सिस्टीम ठेवा. एक महिन्यात एवढे, दोन महिन्यांत एवढे तसा रिझल्ट दिला नाहीतर त्यांना सुद्धा याच प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. आज आपली पटसंख्या वाढत नसेल, आपलं इन्फ्रास्ट्रक्चर एक लाख विद्यार्थी संख्या शिकवायचे असेल, तर तेवढे विद्यार्थी आपल्या शाळेत आले पाहिजेत. जर खाजगी शाळांतून इतकी मोठी संख्या आहे तर आपल्याकडे सुद्धा लाईन लागली पाहिजे. लॉटरी सिस्टीम चालू झाली पाहिजे. आपण केवळ प्रचलित पद्धतीचा वापर केला तर आपण त्यात यशस्वी होणार नाही. केवळ सगळ्या शाळा इंग्रजी माध्यमाच्या कराव्यात असे मी म्हणणार नाही. परंतू इंग्रजी माध्यमांबरोबर मराठी शाळासुद्धा तेवढ्याच चालल्या पाहिजेत. परंतू इंग्रजीला सुद्धा तेवढेच प्राधान्य दिले पाहिजे. इंग्रजी शाळांची सुद्धा संख्या वाढली पाहिजे. या शासनाचे धोरण काय ते पाहून आपली विद्यार्थी संख्या नक्कीच वाढेल. खाजगी संस्थांची मदत घेऊन आपल्याला शाळांची संख्या वाढवता येईल. अशा पद्धतीने शिक्षण मंडळाचा कारभार केला तर मला वाटते आपण बदनामीपेक्षा चांगले शिक्षण देऊ शकतो. शिक्षण मंडळातील लोक प्रामाणिकपणे प्रयत्न करतात. परंतू त्यांच्या प्रामाणिकपणाला आजपर्यंत गेल्या काही वर्षांमध्ये बदनामीशिवाय काहीच मिळत नाही. ही बदनामी टाळायची असेलतर ही बदनामी फक्त राजकीय पक्षांचीच होते असे नाहीतर ती तुमची आमचीसुद्धा होते. ही प्रशासकीय बाब आहे. जो कोणी ठेकेदार असेल तो आम्हाला पत्र देत नाही. तुम्हाला पत्र देतो. शंभर टक्के ही जबाबदारी शासकीय अधिका-यांची आहे. शिक्षण प्रशासनाचे काम सुधारावे एवढीच मी विनंती करतो. त्यांनी दिलेल्या मागण्या अतिशय योग्य आहेत. विद्यार्थ्यांचे भविष्य अतिशय चांगले प्रकारे घडविणा-या आहेत, त्या मान्य कराल एवढीच अपेक्षा व्यक्त करतो व थांबतो.

**मा.भारती फरांदे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज सर्व नगरसेवकांनी खूप तळमळीने हा विषय मांडला आहे की, आमची महानगरपालिकेच्या शाळेतली मुले चांगली शिकली गेली पाहिजेत. कारण ते या देशाचे उद्याचे आधारस्तंभ आहेत. आपण महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांना ज्याप्रमाणे चौथा आयोग, पाचवा आयोग त्याप्रमाणे पगार देतो, तसेच प्रायव्हेट शाळांसाठी सुद्धा देत असतो. पण प्रायव्हेट शाळांची गुणवत्ता व आपल्या शाळांची गुणवत्ता याची तुलना करा. आपल्या शिक्षकांना रिटायरमेंटनंतर सुद्धा काही कमी नसते. पण आपल्या शाळा व प्रायव्हेट शाळांमधील रेशियो बघा. आपण महापालिकेच्या शाळेत व्हिजिट करा. चौथी, तिसरीतील मुलाला धडा नीट वाचता येत नाही. प्रायव्हेट बालवाड्यांमधली मुले एबीसीडी पटापट सांगतात. आपल्या मुलांना वाचता येते का. मग असे का होते याचा विचार झाला पाहिजे.

त्याचप्रमाणे ज्या शाळांमध्ये सातवीपर्यंत शाळांचे वर्ग आहेत, ते आठवीपर्यंत करावेत. आठवीपर्यंत वर्ग आहेत ते दहावीपर्यंत करावेत. निदान मुलांना दहावीचे सर्टिफिकेट मिळाले तर ती ईलिजिबल आहे याचे तरी आपल्याला समाधान मिळेल. ज्युनिअर कॉलेज केलेतर ते अतिउत्तम आहे. सातवी पर्यंत असलेल्या शाळा दहावीपर्यंत करायचा प्रयत्न करा. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या शाळांतील मुलांना स्कॉलरशिप परिक्षेला बसवा. एलिमेंटरी परिक्षेला बसवायला पाहिजे. सर्वांना कंपल्सरी केले पाहिजे. आणि कंपल्सरी करुन त्याचा शंभर टक्के निकाल लागला पाहिजे. आपला रिझल्ट किती आला आहे ते आपल्याला कळणार आहे. तिथे कोणी पार्सिलिटी करणार नाही. अमक्या शाळेचा हा, तमक्या शाळेचा तो, त्यामुळे रिझल्ट किती टक्के लागतो यावर अवलंबून आहे. चांगला रिझल्ट लागलातर आपल्या शाळेची गुणवत्ता वाढेल. ही जी पटसंख्या कमी होत चालली आहे, ती पुढे वाढत जाईल. त्याचप्रमाणे सुसज्ज संगणक व्यवस्था व सुसज्ज लॅबोरेटरी, करायला पाहिजे. आत्ता युग कसे आहे. घोकंपट्टी करण्यापेक्षा मुलांनी स्वतः प्रयोग केलातर त्यांच्या जास्त लक्षात राहते. त्याचप्रमाणे योगा कसा शिकविला जाईल. दररोज २० मिनिटे, १५ मिनिटे योगा कसा केला जाईल यासाठी एक योग प्रशिक्षक नेमा. एज्युकेशननुसार बुद्धिमत्ता सुद्धा वाढेल व प्रकृतिस्वास्थ्य सुद्धा लाभेल. यातून आपल्या देशाचे उद्याचे आधारस्तंभ घडतील. त्याप्रमाणे त्यात ॲड करावे ही विनंती.

**मा.बाबासाहेब धुमाळ-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मला आयुक्त साहेबांना हे विचारायचे आहे की, महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे बजेट मांडलेले आहे. ते मा.महापालिका सभेकडे मान्यतेसाठी पाठवले आहे. ख-या अर्थाने बजेट डिसेंबरमध्येच व्हायला पाहिजे होते ही सत्य परिस्थिती आहे का एवढे मला सांगा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५६ अन्वये, शिक्षण मंडळाचे बजेट दिनांक ३१ डिसेंबर पूर्वी मंजूर करणे बंधनकारक असते. त्याप्रमाणे बजेट पास झाले असतेतर आज चर्चेला विषयच मिळाला नसता. मा.आयुक्त साहेब, हे का घडले हे आम्हाला कळू द्या अशी अपेक्षा व्यक्त करतो. मी व मा.सुलभाताई ऊबाळे आम्ही मघाशी आपल्याला पत्र दिले आहे. त्यात श्रीमती आशा ऊबाळे, प्रशासन अधिकारी,शिक्षण मंडळ यांच्याबद्दल तक्रार केली आहे. मी सभागृहात या तक्रारींबद्दल अनेक वेळा बोललो आहे आणि आपल्यालाही सांगितले आहे. त्यांनी कोणकोणत्या चूका केल्या, जवळजवळ सात/आठ संगीन चूका त्यांनी केल्या आहेत. त्याबद्दल आपल्याला लिहिलेले आहे. त्यावर आपण ग्रीव्हन्स रिपोर्ट घेतला. इंगळे साहेबांनी रिपोर्ट दिला. आपण त्या चुकांचा त्यावेळी विचार केला असता तर. मी सांगितले होते बदली करा. आपण सांगितले होते बदली करु पण बदली झाली नाही. दूर्दैवाने गव्हर्नमेंटने सांगितले, बदली करा तरीसुद्धा आपण बदली केली नाही. हे आपले दूर्दैव आहे. मी गेले चार वर्षे याबद्दल भांडतोय. आत्तापर्यंत मी जेव्हा जेव्हा इथे आलो

तेव्हा तेव्हा मी शिक्षण मंडळावर बोललो आहे. कारण तिथे एवढा भ्रष्टाचार आहे की तो आयुष्यात संपणार नाही. आता सुलाभाताई बोलल्या, बहिरवाडे बोलले. सगळ्यांनी सांगितले की, ही संस्था वेगळी आहे. आयुक्त साहेबांना काही बंधन आहे का. ही वेगळी संस्था तुम्ही अति.आयुक्त, मा.तानाजी शिंदे यांना दिली आहे. मी मुद्दाम तुम्हाला त्यावेळी सांगितले होते की, वेगळे दिलेतर त्यावर तुमचा काही अधिकार राहणार नाही. कारण त्यांनी तसे केलेले आहे. मी गेल्या वेळी बोललो होतो की, बॉम्बे डाईंगचे कापड, दर रेमण्डचा. बील रेमण्डचे आणि तिथे लिहिले आहे तिरुपती टेक्सटाईल्स. तिरुपती टेक्सटाईल्स तिथे आलेच कसे. रेमण्डचा कपडा नाही, फक्त बील रेमण्डचे. हा केवढा मोठा भ्रष्टाचार आहे. याची चौकशी करा म्हणून सांगितले होते. मी हायकोर्टात केस केली. अजूनही तानाजी शिंदे साहेबांनी त्याला उत्तर दिलेले नाही. कोर्ट सुद्धा कसे मॅनेज होते. मग १२५ नगरसेवकांना कोण विचारतोय. केस दाखल करुन दोन वर्षे झाली आहेत. कोर्टाने सुद्धा उत्तर दिलेले नाही. मी आयुक्त साहेबांना पत्र दिले. त्यांनी मला रेफरन्स दिला. हेच पत्र मी तिथे साक्ष म्हणून दिले आहे. असे असतानासुद्धा त्याला उत्तर दिलेले नाही हे आमचे दूर्दैव आहे. आत्ताच सुलभाताई म्हणाल्या की, एवढे ठेकेदार आहेत. ठेकेदारालाच सगळे देऊन टाका. कशाला दर वर्षी शिक्षण मंडळाचे बजेट करताय. त्याला फिक्स द्या. टाइम बाऊण्ड द्या की हे तुझे मटेरीयल आहे. हे तू सप्लाय करायचे आहे. हे कशासाठी करायचे आहे. मग आमचा इथे बसण्याचा अर्थच काय. शिक्षण मंडळ वेगळे, बांधकाम वेगळे. सगळे वेगळे. कोणीकोणाची मक्तेदारी दिली आहे का. त्यात सही आहे. माजी आयुक्त होते. परदेशी साहेब, त्यांना सुद्धा वेगळे ठेवले होते. ते सुद्धा म्हणाले होते, माझी चुकून सही घेतली आहे. बरोबर आहे, एवढ्या हजारो फाईली असतात. त्यातून त्यांची चुकून सही झाली असेल. त्यांनी जो उल्लेख केला होता तो अजूनही काढलेला नाही. तिरुपती टेक्सटाईल कुठून आले. त्यांनी बॉम्बे डाईंगचा, रेमण्डचा कपडाच दिला नाही. मुंबईमधल्या दुस-या कंपनीकडून दिलेला हा कपडा आहे. त्याचे उत्तर सुद्धा देऊ शकत नाही हे दूर्दैव आहे. बजेटबाबतीत सांगायचे झालेतर कुठेही व्यवस्थितपणा नाही. फक्त आकडेमोड आहे. लाश वही है, खाली कफन बदली किया है। त्यात फक्त आकडेमोड केलेली आहे.

मा.आयुक्त साहेब, एलबीटीबाबतीत उत्पन्नवाढ असलीतरी त्याचे उत्पन्न काही दिवसांनी कमी होणार आहे. आज सकाळ पेपरमध्ये बातमी आहे. आपल्या शहरातील छोटे-मोठे ८,००० उद्योग यातून वगळले गेलेले आहेत. असे अनेक उद्योग यातून जाणार आहेत. मग आपल्याला एलबीटी कशी मिळणार. असे असताना सुद्धा त्याठिकाणी पाच/पाच कोटी वाढवताय. तुम्ही विचार करा. शाळेत आपली मुले कमी होत आहेत. काही उर्दू शाळा बंद झाल्या आहेत. हिंदी शाळा बंद झाल्या आहेत. मा.पठाणताईंना माहित असेल. आज एकूण किती मुले आहेत तो आकडा का दिलेला नाही. आपण एका मुलावर रु.१,८४०/- खर्च करतो आहोत. या मुलांवर एवढा खर्च करतो आहोत हे करण्यापेक्षा ठेकेदाराला देण्यापेक्षा मुलाच्या आई-वडीलांना रु.१,८००/- द्या असे सांगितले

होते. ते सुद्धा कोणी ऐकले नाही. अठराशे रुपयाता त्याला दोन चांगले ड्रेस मिळाले असते. आमच्या वेळी शाळेकडून दोनच कपडे यायचे. आज किती कपडे वाटतो आहोत. आत्ता ४/५ ड्रेसेस वाटतोय. आता टाय आला आहे, त्याचे सुद्धा टेंडर काढा. दप्तरात घोळ, वहीत घोळ, कापडात घोळ सगळ्यात घोळ, साहेब, काय चालले आहे. यावर तुमचा कुठेतरी वचक बसला पाहिजे. गेल्या वर्षापेक्षा एकूण सुधारीत बजेटमध्ये र.रु.४,४२,००,०००/- ची वाढ केली आहे. गेल्या वर्षी अंदाजे रु.८,००,००,०००/- ची वाढ केली आहे. प्रत्येक वेळी वाढ करताय. मुले कमी होत आहेत. त्याप्रमाणात ड्रेस कमी होत आहेत. तरीसुद्धा त्या ठेकेदाराला २ वर्षाचे टेंडर दिले. मग बाकी लोकांना का देत नाही. एक नियम करत असालतर बाकी वस्तूंचे सुद्धा टेंडर गावडे साहेबांनाच काढायला सांगा. याचे सुद्धा २ वर्षाचे टेंडर काढा. खर्च कमी होणार असेलतर त्यांचे कमी रेटने टेंडर काढा. सगळीच टेंडर दोन वर्षांसाठी काढा. मग तेरी भी चूप, मेरी भी चूप। विद्यार्थ्यांना कुठेही काही दिलेले नाही. कळालेले नाही. असे असताना शाळा बंद झालेल्या आहेत. त्याचा कुठे उल्लेख केलेला नाही. ज्यांच्यासाठी आपण पैसे सँक्शन करणार आहोत. ज्यांच्यासाठी आपण पैसे वापरणार आहोत. तो आकडा कुठेही दिलेला नाही. अंदाज अंदाज म्हणजे तरी किती अंदाज. जसे कॉन्ट्रॅक्टरला अंदाज द्यायचा, २५ टक्के बिलो रेटने घ्यायचे व परत एक्स्ट्रा वाढवून द्यायचे असेच शिक्षण मंडळात चालले आहे. हे बंद झाले पाहिजे. १० वर्षापूर्वी या नगरपालिकेत जकात बंद झाली तेव्हा याच वर्कर लोकांनी महापालिकेच्या इमारतीबाहेर आंदोलन केले होते. बँक ऑफ बडोदात ओव्हरड्राफ्ट दिल्यानंतर कर्मचा-यांना पगार दिला होता.

सन २०१४-१५ मध्ये शाळांचे भाडे शून्य दाखवले आहे. तरतूद एक लाख रुपये असताना सुद्धा आपण त्याठिकाणी अजून रु.५,९६,००,०००/- इतकी वाढ केली. भाडेवाढ झाली का. एक लाख भाडे असेल तर १० टक्के वाढवले म्हणजे १०,००० वाढले. तुम्ही रु.५,९६,०००/- घेणार म्हणजे आपण अजून दुस-या इमारती भाडेपट्ट्याने घेणार आहोत का. आपले शिक्षक कुठे बाहेर गेलेत का, की, आम्ही तुम्हाला ड्रेस देऊ, मोजे देऊ सगळे देऊ तुम्ही आमच्या शाळेत या. तरच भाडे वाढेल. ही सुद्धा कोटींची वाढ आहे. दरमहा रु.३१ लाख भाडेवाढ आहे. या वर्षी सुद्धा रु.१,५०,०००/- ची वाढ दिली गेलेली आहे. वास्तविक शाळा ही भूमि आणि जिंदगी विभागाच्या अखत्यारीत असते. शाळेचे रंगकामाचे काम स्थापत्य विभागाचे असते. शाळेच्या रंगकामासाठी अजून दीड कोटी वाढवले आहेत. म्हणजे भ्रष्टाचारच आहे. दुसरे काय. इतर सुधारणा देखभाल यासाठी रु.२ कोटी. इतर सुधारणा म्हणजे काय. म्हणजे काय-काय करणार आहेत. शाळेची कौल बदलणार, शाळेची स्लॅब बदलणार, का शाळेच्या भिंती बदलणार आहेत. कड्याकोयंडे बदलणार आहेत का. काय-काय बदलणार आहेत. त्याचे काहीच दिसत नाही. फक्त अंधार. एकदा सँक्शन झाले की, भ्रष्टाचार करायला सगळे मोकळे झाले. आता रजिस्टर्ड फॉर्म भरणे, रजिस्टर छपाई, मग तरतूद शून्य कशी. आपल्याकडे शिल्लक आहे का याचा उल्लेख केलेला नाही. किती

रजिस्टर शिल्लक आहेत. कुठेही रजिस्टर ठेवलेले नाही. स्टॉक चेकींग केलेले नाही. वर्षावर्षाचे स्टॉक चेकींग नाही. आपण त्यांच्याकडून स्टॉकचेकींग मागवले आहे का. मग हे छपाईचे कसे काय केले आहे. आम्हाला छापायला पैसे नाहीत. रजिस्ट्रेशनला पैसे नाहीत, रजिस्टरला पैसे नाहीत, मग वेगळे पैसे मागणार. ही तरतूद करणे गरजेचे आहे. ती तरतूद तुम्ही केलेली नाही. नकाशा तक्ते याचा कुठेही उल्लेख नाही. मग एवढा खर्च कशासाठी करायचा. त्या मुलाला भारताचा नकाशा तरी कळाला पाहिजे. भिंतीवर नकाशा टांगतो आहोत का. आपल्याकडे फक्त फोटो लावले आहेत ते पहिले चेअरमन, दुसरे चेअरमन यांचे.

स्कॉलरशीपसाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. त्यासाठी १० लाखांची तरतूद करा अशी माझी इच्छा आहे. मुलांना सांगितले की स्कॉलरशीप मिळणार असेल तर ते अभ्यास करतील. कुठेतरी मुलामुलांमध्ये स्पर्धा लागली पाहिजे. आत्ता फरांदे मॅडम यांनी सांगितले की, तिसरीच्या मुलांना काही अभ्यास येत नाही. पाच/दहा लाख शिल्लक ठेवा. तर ही मुले अभ्यास करतील. प्रगति पुस्तक याचा कुठेही उल्लेख नाही. आई-वडीलांना मुलाची प्रगती कळाली पाहिजे. आई-वडीलांची सही घेत नाहीत. प्रगती पुस्तक दिलेतर आई-वडीलांनाही कळेल की माझा मुलगा शाळेत जातो आहे का नाही. प्रायव्हेट शाळेत असते त्याप्रमाणे प्रगती पुस्तकात आईवडीलांची सही घ्यावी एवढेतरी करावे. दरवर्षीप्रमाणे गणवेशासाठी अंदाजे तरतूद दिली आहे. त्यात कुठेही विद्यार्थी संख्या दिलेली नाही. त्यात शाळा गणवेश एवढे, पी.टी. गणवेश एवढे याचा कुठेही उल्लेख नाही. निदान सप्लायरने किती सप्लाय केला, कोणत्या प्रकारचा सप्लाय केला, आणि कधी केला याचाही अंदाजपत्रकात उल्लेख पाहिजे. ठेकेदार काय करतो. शाळेत जातो, तिथे सही घेतो. आणि मॅनेज करतो. एका मॅडमने मला पत्र दिले होते की, एक कॉन्ट्रॅक्टर थेरगावातील शाळेत गेला. तिथे एक महिला होती. तिने सांगितले की, आम्हाला सप्लाय मिळाला नाही. ठेकेदार माझी सही मागत होता. त्याने सांगितले की, उपआयुक्तांनी सांगितले आहे सही करुन घ्या म्हणून. ही कुठली पद्धत आहे. त्या मॅडमना तुम्ही फोन करुन सांगताय की तू सही कर. त्या मॅडमला तो ठेकेदार म्हणाला की, तुम्ही सही करा नाहीतर ड्रेस मिळणार नाही. मी फोन लावून देतो तुम्ही फोन वर बोला. आम्ही तीन नगरसेवक त्याचे साक्षीदार होतो. मॅडम म्हणाल्या मी फोन लावणार नाही. आयुक्तांचा फोन असेलतर मी बोलेन. ती बोलली नाही. तीने सही केली नाही. ही वस्तुस्थिती आहे. किती ड्रेस दिले, कोणी कोणाला दिले, कधी दिले याचा उल्लेख करणे काळाची गरज आहे. ड्रेस दिलेत का नाही, मिळाले का नाही याची चौकशी पालकांकडे करा. जशी आम्ही त्या शाळेत चौकशी केली तशी तुम्ही शिंदे साहेब, शाळेत जाऊन चौकशी करा. पालकांना विचारा की, तुम्हाला ड्रेस कधी मिळाले, दप्तर कधी मिळाले. हे सगळं विचारा. ते सांगतील. ड्रेस मिळतोय तर हे लोक काय म्हणतील, मिळतोय तर घ्या. याची चौकशी करावी.

एक स्काऊट गाईडचा गणवेश म्हणून मुलांना वापरायला देतो. आपण त्यासाठी रु.५ कोटींची तरतूद करतोय. त्याची सरासरी किती गणवेश देतो ते महिन्याचे दिलेले नाही. याची चौकशी झालेली नाही. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी मघाशी सांगितले. विद्यार्थी गणवेश खर्च वेगळा, बालवाडी गणवेश खर्च वेगळा, बँड पथक गणवेश वेगळा असेल तर याचे बारकाईने अवलोकन केलेतर लक्षात येईल की सन २०१४-१५ पर्यंत बालवाडी गणवेश विद्यार्थी तरतूद शून्य होती. पण सन २०१५-१६ मध्ये त्यासाठी ४० लाख तरतूद केली तर मग आपण वेगळी तरतूद कशासाठी करताय. शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय केलेली नाही. मुलांना बाटल्या दिल्या गेलेल्या आहेत. बाटल्यांमुळे मारामारी झालीतर लफडे व्हायचे. त्यापेक्षा शाळांमध्ये ॲक्वागार्ड बसविण्यात यावेत. प्रत्येक शाळेत घंटा लावलेली नाही. पितळी घंटा दिल्या आहेत. त्या चोरीला गेल्या आहेत. त्या वाजवायला कोणी नाही. घंटा नाहीत आणि त्यामधील लोलक सुद्धा नाही. माझे मत आहे की, त्याठिकाणी लोखंडी रॉड दिला, किंवा पाटा दिलातरी ते वाजवू शकतात. घंटा वाजवण्याऐवजी हे करा. सकस आहारासाठी रु.३ कोटी तरतूद मागितली आहे. फक्त रु.५० लाख आहेत. यात काय प्रकार झाला आहे की, आपण काही महिला मंडळांना टेंडर देतोय. काहींना देत नाही. ठेकेदारीने देतोय. त्याठिकाणी रु.५० लाखांपर्यंत खर्च होऊ शकतो. हा खर्च मर्यादित ठेवावा. बालवाडी - शाळांना ग्रंथालय, कार्यशिक्षक एकत्र करुन त्यांना कार्यान्वित करण्यात यावे. काही महिला बालवाडी चालवतात. बालवाडींना ग्रंथालय नाही. बालवाडींना ग्रंथालय, शालेय शिक्षक ग्रंथालय एकत्र करुन खर्च करावा. त्यांच्या सिटस् प्रमाणे वर्गाप्रमाणे ग्रंथालय असावे. शिवाजी महाराजांची पुस्तके, ज्ञानेश्वर माऊलींचे पुस्तक त्यांना बालवाडीपासून वाचता यावे असे मोफत ग्रंथालय द्यावे अशी माझी मागणी आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही मनात आकस ठेवू नका. तुम्ही मला जास्त मदत केली आहे. मी ज्या ज्या वेळी सूचना केली त्याचे तुम्ही अवलोकन केले आहे. फक्त परवाचा डिसिजन घ्यायला तुम्ही वेळ लावला आहे. आम्ही कितीही सांगितले, काही केलेतरी बजेट तर पास होणारच आहे. आम्ही आमचे काम केले आहे. मा.महापौर साहेब, मला बोलायला संधी दिल्याबद्दल आपले धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मा.नारायण बहिरवाडे यांनी सगळे पॉईंट कव्हर केले आहेत. महापालिकेच्या शाळेत कशाप्रकारची मुले येतात. दोन तीन वेळा फेल झालेली, ज्यांना प्रायव्हेट शाळेत कुठेही ॲडमिशन मिळत नाही. स्लम एरियातले, ज्यांच्यावर शिक्षणाचे संस्कार नाहीत अशी मुले महापालिकेच्या शाळेत येतात. त्यांना शिक्षण देणे किती कठिण आहे हेही शाळेत गेल्यावर तुम्हाला माहिती पडेल. महापालिकेच्या शाळेत पालकसभेला मुलांचे पालक येतच नाहीत. प्रायव्हेट शाळांमध्ये दर ३ महिन्यांतून एकदा पेरेंटस् मिटींग असते. मुलगा शाळेत काय करतो हे त्यांना माहित पडत नाही. अशा परिस्थितीत शिक्षक

या मुलांना शिक्षण देतात. म्हणून मी शिक्षकांना ब्लेम करणार नाही. पण चूक कुठे आहे. मला असे सांगण्यात येते की, प्रायव्हेट शाळा प्रत्येक अर्धा किलोमीटरच्या एरियात पाहिजे. पण प्राधिकरणामध्ये अर्ध्या किलोमीटरमध्ये आठ शाळांना परवानगी दिलेली आहे. तुम्ही अशा परवानग्या देत गेलातर आपल्या शाळा बंद पडणार. परवानगी का देतो. दोन शाळांमध्ये किमान अर्धा किलोमीटरचे तरी अंतर पाहिजे. शिक्षण विभागात, मंत्रालयात पैसे दिलेतर परवानगी मिळते. एवढ्या शाळांना परवानगी देणे गरजेचे आहे का. हे कुठेतरी बंद करा. शिक्षण मंडळाची परवानगी असल्याशिवाय कुठेही नवीन शाळा उघडता येत नाही. विद्यार्थी गळती कशामुळे होते आहे हे आपण शोधून काढायला पाहिजे. माझी महापौर मॅडमना विनंती आहे की,एक कमिटी अपॉईंट करा. त्या कमिटीत प्रशासन,आयुक्त, नगरसेवक व काही एज्युकेशन फिल्डमधील एक्सपर्ट माणसे अपॉईंट करा. त्यांना सांगा. टाईम बॉऊंड ठेवा की, दोन महिन्यांत रिपोर्ट ठेवायला पाहिजे. त्या रिझल्टनुसार आपण डेव्हलपमेंट करायला पाहिजे. सर्व सुविधा देतोय पण आजकाल शो वर्ल्ड आहे. आमच्य भागात सिटी प्राईड म्हणून शाळा सुरु झाली. तेव्हा पहिल्याच वर्षी ॲडमिशनसाठी लोक पन्नास हजार द्यायला तयार आहेत. मी त्या शाळेत गेलोतर तिथे ॲट्रॅक्टिव्ह बिल्डींग आहे. क्लासरुममध्ये म्युरल्स, छोट्या मुलांसाठी छोटे-छोटे फायबरचे टेबल्स, सगळी सजावट केलेली आहे. इतके ॲट्रॅकटीव्ह केले होती की, पालकांनी हे बघितल्यानंतर त्यांना वाटलेच पाहिजे की, आपल्या मुलाला इथेच ॲडमिशन घेतले पाहिजे. आपल्या महापालिकेच्या शाळांमध्ये मुलांना बसायला नीट डेस्क नाहीत, आपल्याकडे स्वच्छता नाही, लाईट नाही. मुलांना ड्रेस नाहीत. या सुविधांपासून मुले वंचित आहेत. काही ठिकाणी तर मुलांना खाली बसवतात. टॉयलेट बरोबर नाहीत. दररोज साफसफाई केली जात नाही. अशा परिस्थितीत कोणते पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवतील. गळती थांबवायची असेलतर शाळेची बिल्डींग चांगली असायला पाहिजे. ॲट्रॅक्टीव्ह क्लासरुमस् असल्या पाहिजेत त्यांना चांगल्या प्रकारे रिसेप्शन द्यायला पाहिजे. डेस्क पाहिजेत. टॉयलेटचे क्लिनिंग रोज व्हायला पाहिजे. हे सगळे केल्याशिवाय मुले आपल्याकडे येणार नाहीत.

मी बजेटबद्दल जास्त बोलणार नाही. माझ्या वॉर्डात १९८६ मध्ये निगडीत महापालिकेच्या दोन शाळा होत्या. दोन शाळांची मिळून २५०० मुले होती. आज या दोन शाळांमध्ये दीडशे-दीडशे मुले आहेत. इतकी मुले कमी झाली आहेत. आज एकूण ४०,००० मुलांना डिव्हाईड केलेतर सरासरी एका शाळेसाठी ३११ मुले अशी एका शाळेची विद्यार्थीसंख्या होईल. ४०,००० मुलांना १०८० शिक्षक असे डिव्हाईड केलेतर एक शिक्षक फक्त ३० मुलांना शिक्षण देतो. प्रायव्हेट शाळेत एक शिक्षक ६० मुलांना शिक्षण देतो. ही सगळी परिस्थिती सुधारली पाहिजे. मी बजेटबद्दल काही बोलणार नाही. मा.आयुक्त साहेब, तुम्ही रु.१८ कोटी कमी केले आहेत. आपल्याकडे येणारा मुलगा हा गरीब घरातला आहे. त्याला मदतीचा हात द्यायला पाहिजे. हे सुद्धा वेळेवर द्यायला पाहिजे.

बजेट आले की पुण्यामध्ये आयुक्तांच्या नावावर सगळी टेंडर्स निघतात. तुमच्याकडे टोटल कंट्रोल आहे. तुम्ही वारंवार इन्स्ट्रक्शन्स दिल्याशिवाय शिक्षण मंडळ सुधारणार नाही. मुलांना गणवेश, वह्यापुस्तके, दप्तर सगळे साहित्य द्या. पण ऑर्डर त्वरित द्या. जून महिन्यामध्ये मुलांना सर्व शालेय साहित्य मिळायला पाहिजे. मग टेंडर जुन्या रेटमध्ये द्या. तुम्ही या वर्षी रेकॉर्ड करा. जूनमध्ये मुलांना सगळे साहित्य द्या. मराठी भाषा वाढायला पाहिजे. मराठी शाळांची संख्या वाढवायला पाहिजे. त्या चांगल्या प्रकारे कशा चालतील ते पहा.

शिक्षकांना दुसरी कामे देऊ नका. शिकवणे हे शिक्षकांचे काम आहे. आपले शिक्षक काय काम करतात. पोलिओ ड्युटी, इलेक्शन ड्युटी शिक्षकांना अनेक कामे दिलेली असतात. संत तुकाराम नगरला रहायला असलेल्या शिक्षकाला सर्वेसाठी प्राधिकरणात पाठवणार. तो काम कसे करणार. हे शिक्षकांचे काम नाही. तुम्ही आऊटसोर्सिंग करा. शिक्षकांना स्टॅटॅस्टीक्स करण्यासाठी सहा महिन्यांतून एकदा बाहेर पाठवता. हे सर्व बंद करा. शिक्षक मुलांना शिक्षण देण्यासाठी आहेत. तुम्ही रु.५ कोटी कमी केले आहे. स्टॅट्युटरी एक्सपान्शन हे तुम्हाला द्यायला पाहिजे. बजेटमध्ये एक्सेस अमाऊंट अलॉट केली आहे. स्टॅट्युटरी एक्सपान्शन कमी करता येणार नाही. तसेच मानधन शिपाई यांच्यासाठी ४७ लाख कट केलेले आहेत. याचा अर्थ तुम्ही शिपाई देणार आहात का. शाळेसाठी सफाई वर्ग मानधनावर रु.१ कोटी ते कमी केले आहेत. मग हे तुम्ही देणार आहात का. मग ही तरतूद बजेटमधून कशी काय कमी केलीत. पेन्शन, ग्रॅच्युईटी कमी केलेली आहे. ई-लर्निंग सगळे बंद केले आहे. ते कशाला कमी करताय. ते पाहिजे. जास्तीत जास्त खर्च ई-लर्निंगसाठी केला पाहिजे. सकस आहार याबद्दल माझे मत वेगळे आहे. जास्तीत जास्त गरीब मुलांना सकस आहार द्या. इस्कॉन संस्थेकडून चांगल्या दर्जाचा सकस आहार दिला जात होता. फक्त त्यांच्याकडून कमिशन मिळत नव्हते. ते ऑटोमॅटीक मशीनने हेल्दी मिल तयार करतात. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले पाहिजेत. ते सुद्धा कमी केलेले आहेत. बालवाडीतील मुलांना सुद्धा गणवेश, स्वेटर इ. मिळाले पाहिजे. यातील तरतूद का कमी केली आहे. यातील तरतूद कमी करु नका. मुलांना वॉटर बॉटल द्यायला काही हरकत नाही. सर्व शिक्षा अभियान - या अभियानाअंतर्गत सरकारकडून कोट्यावधी रुपयांची अनुदाने येतात. त्याचा समावेश बजेटमध्ये झालेला नाही. यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होतो. याबाबतीत मला त्या विभागात काम करणा-या एकाने सांगितले की, डुप्लिकेट व्हाऊचर्स दाखवून, बोगस प्रोग्राम सेमिनार घेतला असे दाखवून बोगस कागदपत्रे तयार केली जातात. असा करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. यात महापालिकेकडून कोणतेच इन्स्पेक्शन केले गेलेले नाही. कुठलीतरी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन आहे. ज्यावेळी सरकार आपल्याला सर्व शिक्षा अभियानासाठी करोडो रुपये पाठवते, त्यावेळी आयुक्त म्हणून त्याकडे आपण लक्ष द्यावे. मला एक व्यक्तीकडून असे समजले आहे की, सर्व शिक्षा

अभियानाअंतर्गत काम करणा-या एकाने गेल्या ४/५ वर्षांमध्ये स्वतःचा पेट्रोल पम्प काढला आहे. मा.आयुक्त साहेब, सर्व शिक्षा अभियानात तुम्ही लक्ष द्या एवढे सांगून थांबतो, धन्यवाद!

**मा.शुभांगी बो-हाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दहा महिने झाले आमच्या भागातील शाळेत मुख्याध्यापक नाहीत. तिथेच उर्दू शाळा आहे तिथे मंजूर पदे सात आहेत. वर्ष संपत आले आहे. त्यातून फक्त दोन शिक्षक आहेत. पाच शिक्षक नाहीत. काल आयुक्त साहेबांनी शिक्षण मंडळाला व्हिजिट दिली. आम्हाला कल्पना नव्हती. पेपरमध्ये बातमी आली आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही व्हिजिट व्यवस्थित दिली नाही. आठ दिवस झाले. मागील बाजूला कंपाऊंडचे काम चालू आहे. मग कंपाऊंडचे काम चालू नाही म्हणून अशी बातमी कशी लागली. महापालिकेच्या १३४ शाळा आहेत. दरवेळी निगडी ओटा स्किम व काळभोरनगर या दोनच शाळा गाजतात. असे का. बजेट होते पण रेडझोनचे कारण देऊन कंपाऊंडचे काम कॅन्सल झाले होते. प्रत्येक नगरसेवकाला वाटते की, आमच्या वॉर्डातली शाळा व्यवस्थित असावी. आमच्या भागात एकूण सहा शाळा आहेत. जवळजवळ पाऊणे चार हजार विद्यार्थी आहेत. आम्ही दोन्ही नगरसेवक जातीने तिथे व्यवस्थित लक्ष देतो. शिक्षकांची मागणी व्यवस्थित करतो. पेपरमध्ये उलटी पालटी बातमी देतात व प्रसिद्धी मिळवतात. दहा महिने झाले आमच्या शाळेवर शिक्षक नाहीत, मुख्याध्यापक नाहीत याचा विचार करा. या बातम्या पेपरमध्ये लावा. एवढेच बोलते व थांबते.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, काळेवाडीतील शाळेत किती भयानक परिस्थिती आहे ते आपल्याला माहित आहे. महापौर मॅडमना परिस्थिती माहित आहे. काळेवाडीतील शाळेत स्वच्छता अजिबात नाही. शाळेत किती वास येतो. महापौरांनी स्वतः पाहिले आहे. तिथे बालवाडी केंद्र, विरंगुळा केंद्र चालू असते. त्या विरंगुळा केंद्रातच आम्ही नगरसेवकांनी क्षेत्रिय सभा घेतली होती त्यावेळी विषय झाला होता. अजून सुद्धा खिडक्या दुरुस्ती झालेली नाही. टेंडर निघते त्याचे काय होते ते आम्हाला कळत नाही. बरेचसे विद्यार्थी व्हरांड्यात बसतात. कारण शाळेत जागाच नाही. काळेवाडीतील शाळेचा पट चांगला आहे. शाळेची अवस्था खूप दयनीय आहे. मुलांसाठी बाथरुमची व्यवस्था नाही. आत्ताच मा.सिमा सावळे ताईंनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याचा नळ व बाथरुममधील अंतर किती आहे. त्यापेक्षा कमी अंतर शाळेचा वर्ग व बाथरुममध्ये आहे. आमच्या भागातील महापालिकेच्या शाळेत स्वच्छता अजिबात नाही. वास येत असतो. वॉचमन पाहिला तर शाळेच्या टोटल तीन इमारती आहेत. एक इमारत थोडी लांब आहे. तो वॉचमन दुस-या शाळेकडे कधीच जात नाही. कधी जाताना दिसलेला नाही. वॉचमन वाढवून देण्याची सुद्धा बरेचदा मागणी केली. तरीसुद्धा अजूनही वॉचमन वाढवून दिलेला नाही. माध्यमिक शाळेबाबतीत अजूनही एक विषय बोलायचा आहे. मुख्याध्यापक रिटायर्ड होतात.

प्रभारी मुख्याध्यापकांची जागा भरतो. ती किती वर्षांसाठी भरतो. जास्तीत जास्त तीन महिन्यांनी त्यांना कायम नियुक्तीपत्र दिले पाहिजे. परंतू दोन अडीच वर्षे झाली. प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून श्रीमती एस.डी.पाटील झाल्या आणि प्रभारी म्हणूनच त्यांची रिटायरमेंट झाली. असे व्हायला नाही पाहिजे. त्यांचा प्रस्ताव दोन वर्षांनी तयार केला आहे. त्यांची नियक्ती कायमस्वरुपी करण्यासाठी दोन वर्षे एवढा लेट का तयार केला. अकराव्या महिन्यात प्रस्ताव तयार केली आहे. अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. ऊबाळे मॅडमना सांगितले की त्यांना डोईफोड साहेबांचे नाव सांगायचे. डोईफोडे साहेबांना विचारले की त्यांनी ऊबाळे मॅडमचे नाव सांगायचे. नगरसेवकांनाच अशी उत्तरे मिळत होती तर त्या मुख्याध्यापकांचे काय. मागे पेपरमध्ये आले होते, मुख्याध्यापकांचा राजिनामा असा प्रकार वाचला होता,त्याचे काय झाले. मुख्याध्यापक नियमित नसेल प्रभारी असेलतर तो व्यवस्थित काम करु शकणार नाही. काम कसे चांगले होणार. त्यांची नियुक्ती नियमित कायमस्वरुपी करुन त्यांना ऑर्डर देण्यात यावी. प्रत्येक वर्षी शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी करत नाहीत ती का करत नाहीत, ती झालीच पाहिजे. त्याला उशीर का होतो आहे. आपले अधिकारी काम का करत नाहीत हे आपण विचारायला पाहिजे. मघाशी कुमार साहेबांनी सांगितले होते की, शिक्षकांना दोष देण्यात अर्थ नाही. मला सुद्धा तसेच वाटते. शिक्षकांच्या सुद्धा काही अडचणी आहेत. त्यांना आपण प्रभारी नियुक्त करतो. ते कसे चांगले काम करणार. मुलांचे पालक मिटींगला येत नाहीत. त्या-त्या भागातला नगरसेवक शाळेवर अध्यक्ष असतो. नगरसेवक सुद्धा त्या मिटींगला उपस्थित असतात. त्यावेळी फक्त १० ते १५ जणांची उपस्थिती असते. असे होता कामा नये. आम्ही सर्व नगरसेवक २६ जानेवारीला महापालिकेच्या शाळेत झेंडा फडकवायला गेलो होतो. त्यावेळी एकाही मुलाच्या पायात बूट नव्हते. मला ते पाहून वाईट वाटले की, प्रजासत्ताक दिन असूनही आपली सगळी मुले बिनबुटाची, बिनसॉक्सची होती. ही गरीब घरातली मुले आहेत. त्यांना ड्रेसपासून सगळे दिले पाहिजे.

आपला पट वाढवण्यासाठी आपण भरपूर प्रयत्न केले पाहिजेत. आजदेखील काळेवाडीमध्ये इंग्रजी माध्यमाच्या १५ शाळा आहेत. एक मराठी माध्यमाची एम.एम.शाळा आहे. एम.एम.शाळा माझ्या वॉर्डात आहे. या शाळांमध्ये ऍडमिशन मिळावे म्हणून लिस्टमध्ये नाव आले नाही की पालक आमच्याकडे येऊन अक्षरशः रडतात,असे का. पालिकेच्या शाळेतील मुलगा ७वी पास होऊन इतर प्रायव्हेट शाळेत ऍडमिशनसाठी प्रयत्न करतो तेव्हा पालिकेच्या शाळेतील मुलगा म्हणून त्यांना प्रवेश नाकारला जातो. का तर या मुलांना काही येतच नाही. आपण महापालिकेच्या शाळेतील शिक्षकांना भरपूर पगार देतो. मग असे मुख्याध्यापक देखील नेमले पाहिजेत. त्यांनी त्या शिक्षकांकडून व्यवस्थित काम करुन घेतले पाहिजे. मुले हुशार झालीच पाहिजेत. मा.आयुक्त साहेब, आपण अल्पसंख्याक शाळांना परवानगी देतो. परवानगी देताना किती किलोमीटर अंतरावर परवानगी देतो. काळेवाडीमध्ये दोन इंग्रजी माध्यमाच्या अल्पसंख्यांकांच्या शाळा आहेत. आपण

याचे देखील स्पष्टीकरण द्यावे. काळेवाडीतील मुलांना या शाळेत प्रवेश मिळत नाही. आमच्या भागातील पालक प्रत्येक वर्षी ॲडमिशनसाठी त्यांच्याकडे जातात. तेव्हा ते म्हणतात, आमची पहिली मुले आधी यांचा ५० टक्के कोटा भरायचा. मग इतर मुलांना ॲडमिशन देऊ. मग आमच्या विद्यार्थ्यांनी कुठे जायचे. जर चुकीचे काम झाले असेल, आपण अर्धा किलोमीटरपेक्षा कमी किलोमीटरमध्ये परवानगी दिली असेलतर त्या शाळांची परवानगी मंत्रालयाकडून कॅन्सल करण्यात यावी. तसेच मला हे देखील सांगायचे आहे की, आपल्या महापालिकेच्या ज्या काही शाळा आहेत, त्यांचा आम्हाला अभिमान वाटतो. थेरगाव मधील महापालिकेची शाळा खूप सुंदर आहे. तिथे सुद्धा ॲडमिशनसाठी आमच्याकडे विद्यार्थी येतात. तिथे ॲडमिशन फूल झाली होती. मी आठवीच्या ॲडमिशनसाठी फोन केला होता. मला हे ऐकून खूप चांगले वाटले की, पालिकेच्या शाळेत देखील ॲडमिशन फुल झाली आहे. थेरगावच्या शाळेची बिल्डींग, तिथले स्ट्रक्चर खूप चांगल्या प्रकारे केले आहे. तशा पद्धतीने आपण इतर शाळांचे सुद्धा करावे. मा.आयुक्त साहेब, मला सांगायचे आहे की, प्रत्येक शाळेत एक इंग्रजी माध्यमाचा वर्ग चालू करावा. पालकांना प्रत्येकाला वाटते की, माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकला पाहिजे. प्रत्येक वर्षी एक एक वर्ष वाढत जाईल. ५० विद्यार्थ्यांची नर्सरीपासूनच एक तुकडी करावी. त्या पद्धतीने क्लासेस वाढवून इंग्रजी माध्यमाचा वर्ग चालू करावा. सेमीइंग्रजीचा वर्ग हे सुद्धा खूप चांगल्या प्रकारे करता येईल. एवढे बोलून थांबते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज आपल्या शिक्षण मंडळाच्या बजेटसंदर्भात विशेष सभा आयोजित केली आहे. त्याबद्दल धन्यवाद. मागील वर्षी मी बजेटचे पुस्तक फाडून गेलो होतो त्याबद्दल एक वर्षानंतर मी दिलगिरी व्यक्त करतो. त्याचे कारण या बजेटसंदर्भात आपल्याला मान्यता द्यायची आहे. ऊबाळे मॅडम यांची बदली झालेली आहे व नवीन अधिकारी आले आहेत. वास्तविक पाहता, तुमच्या पाठिमागे त्यांनी बसवायला पाहिजे होते. त्यांनी आपली ओळख सुद्धा करुन दिली नाही. त्यांनी आपली ओळख करुन द्यावी. आज बजेट मंजूर करत असताना परवा दिवशी आमची पार्टी मिटींग झाली. पार्टी मिटींगमध्ये मी पक्षनेत्या मा.मंगलाताई कदम यांचे अभिनंदन केले होते. पुन्हा आजही अभिनंदन करतो. कारण त्यांच्या प्रयत्नांमुळे ज्ञानप्रबोधिनी असेल, थरमॅक्स कंपनी असेल बाहेरचे लोक आपल्या शाळेत लक्ष घालून सुधारणा करायचा प्रयत्न करत आहेत असे झालेच पाहिजे. पार्टी मिटींगमध्ये विषयावर चर्चा चालू असताना शिक्षण मंडळाचे सभापती सुद्धा तिथे होते. मी त्यांना म्हणालो, आपण बजेटबद्दल बोलतोय हे मान्य आहे. बजेट वाढवून देऊ हे मान्य आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही कधी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची चौकशी केलीत का. शाळेतील शिक्षकांची कधी मिटींग घेतलीत का. शाळेत शिक्षक शिकवतात का. चौथी पाचवीतल्या मुलाला वाचता येत नसेल, लिहिता येत नसेलतर हे आमचे दुर्भाग्यच आहे. एवढा करोडो रुपये खर्च करायचा. आज आपण १५० कोटींच्या आसपास

चाललो आहोत. म्हणून त्यांनी पेंटींग, बांधकाम याच्यावरच त्यांचे लक्ष चालले आहे. उरली फक्त खरेदी व पैसे खर्च करणे. अशा विषयावर त्यांचे लक्ष चालले आहे. आपण काल प्रभागात शाळेत आला होता. आपण पाहिले. त्याठिकाणी सभापती काय म्हणाले, तुमच्या शाळेत व्हिजिट द्यायला येतो. मला फोन करुन ते तुम्हाला घेऊन शाळेवर आले. शाळेत आल्यावर वर्ग चेक करुन, शिक्षकांसमोर एखाद्या विद्यार्थ्याला उभे करुन पुस्तक वाचायला लावायचे होते. पण ते झाले नाही. त्यांनी आल्यानंतर काय दाखवले शाळेच्या भिंती, ग्राऊंड, काचा फुटलेल्या साहेब, शिक्षण मंडळाची कमिटी यासाठी आहे का. शिक्षण मंडळाचे काम काय आहे. शाळेतील विद्यार्थ्याचा दर्जा वाढला पाहिजे. शिक्षणाचा दर्जा वाढला पाहिजे. मी लहानपणापासून पहिले ते आठवीपर्यंत महापालिकेच्या शाळेत शिकलेलो आहे. मला त्या शाळेच्या छोट्या-मोठ्या सगळ्या गोष्टी चांगल्या माहित आहेत. मला अनुभव आहे. म्हणून मा.आयुक्त साहेब जीव तुटतो. त्या विद्यार्थ्यांना आपल्याला काय-काय देता येईल. झोपडपट्टीतील एक विद्यार्थी तुमच्यासारखा आयुक्त झालेला मला पहायचा आहे. मी गेले वीस वर्षांपासून हेच बोलतोय. आज प्रत्येक जण बजेटबद्दल, खर्चाबद्दल बोलणार. आज आपण शिक्षकांसाठी रु.६५ कोटी देतोय. आपण ते नंतर वाढवून देणार आहोत. त्याबद्दल दुमत नाही. परंतू दरवर्षी रु.७० कोटी शिक्षकांच्या पगारापोटी देतोय. आपण शिक्षकांच्या परीक्षा कधी घेतल्यात का. ज्या शाळेतील विद्यार्थी चांगल्या पद्धतीने वाचत असेलतर त्या शिक्षकाला बक्षिस द्या. बजेटमध्ये यासाठी तरतूद करा. अशा शिक्षकांना बक्षिस दिले पाहिजे. ज्या शिक्षकांचे विद्यार्थी वाचत नसतील त्यांना दंड आकारा. नियम करा. निश्चित त्यांना पाचवा आयोग, सातवा आयोग, दहावा वेतन आयोग देऊ त्याबद्दल दुमत नाही. परंतू विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारलाच पाहिजे.

सभागृहात शिक्षण मंडळाचे सदस्य बसले आहेत, ते ऐकत असतील. त्यांना सुद्धा माझी विनंती आहे की,तुम्ही फक्त खरेदीवर लक्ष घालू नका. शाळेवर जा. साहेब,तुम्ही झाडू खात्यातल्या लोकांची मिटींग घेतली होती. त्यावेळी सांगितले होते, ज्या कामाचा पगार मिळतो ते काम तुम्ही चोख करा. परिसर स्वच्छ राहिला पाहिजे. याबद्दल तुमचे अभिनंदन करतो. तसेच शिक्षकांची मिटींग बोलवा. एक वेळ शाळेला सुट्टी द्या. पण शिक्षकांची मिटींग घेऊन त्यांना जाहिर वॉर्निंग द्या. पोलिसांचा सत्कार केला तसा शिक्षकांचा सत्कार करा. जेणेकरुन त्यांना सुद्धा प्रोत्साहन मिळाले पाहिजे. मात्र चुकीच्या शिक्षकांना घरी बसवले पाहिजे. याठिकाणी आपण बजेटवर बोलत असताना आपण जी शिफारस केली आहे. त्या आपल्या शिफारशींना मान्यता देण्यासाठी आम्ही तयार आहोत. वाढीव बजेट आहे. त्यातील कमी केलेल्या काही गोष्टी ज्या ठिकाणी आरोग्यचे कर्मचारी आहेत. जे कित्येक वर्षे मानधनावर काम करतात. त्यांना काही पगार वाढवून देता येईल. आज विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. त्याचे कारण आपण उर्दू शाळा जास्त वाढवल्या आहेत. विद्यार्थी डिव्हाईड झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होण्याची शक्यता आहे. मा.आर.एस.कुमार साहेबांनी रिक्वेस्ट केली. झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना गणवेश अजून

वाढवून द्या. कारण कधीही रस्त्याने जाताना बघा. सुट्टीच्या दिवशी बघा. त्यांनी तोच शाळेचा कपडा घातलेला असतो. मधल्या काळात अतिक्रमणाची कारवाई चालू केल्यानंतर बिगारी, गवंडी लोकांना काम मिळत नाही. आपण मुलांना खिचडी देतो, त्यावर त्यांचे घर चालले आहे. म्हणून त्यांना कपडे वाढवा. पुण्यामध्ये जसे महापालिकेतल्या शाळेत मुलांना कपडे देतो, तसे अजून दोन कपडे द्या. यात लक्ष घाला. बालवाडी, अंगणवाड्यांतले जे विद्यार्थी आहेत. त्यांना सकस आहार देणार होतो. विषबाधा होऊ नये म्हणून पन्नास लाखांची तरतूद केली होती ती आपण कट केली आहे. मा.महापौर साहेब, पहिलीपासून सातवीपर्यंत विद्यार्थी खिचडी घेतात. त्यात बालवाडीचे देखील विद्यार्थी असतात. ते तोंड बघतात. तिथे तरतूद वाढवून द्या. या मुलांना सुद्धा खिचडी द्या. कसे का असेना या मुलांना खिचडी मिळाली पाहिजे. हे चुकीचे होणार नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे ब-याचशा शाळांमध्ये संगणक संच दिलेले आहेत. पण इंटरनेट सुविधा दिलेली नाही. त्यामुळे संगणक बंद आहेत. सगळीकडे हिच अवस्था आहे. नुसते संगणक संच देऊन करायचे काय. पहिले शिक्षण सुधारले पाहिजे. सीसीटिव्ही कॅमेरा – माझ्या भागात चार हजार विद्यार्थी आहेत. माध्यमिक शाळेचे काही विद्यार्थी आहेत. मी स्वतः शाळा सुटायच्या वेळी काठी घेऊन त्यांच्यामागे पळत असतो. शाळेवर लक्ष देण्यासाठी मी पोलिसांना देखील सांगितले आहे. काही बाहेरची मुले शाळेबाहेर थांबलेली असतात. ते शाळेतल्या मुलींची छेडछाड करतात. दुपारच्या सुट्टीत मुलींना बाहेर सोडत नाहीत. स्थानिक लेवलवर शाळेत जातो. तिथल्या अडीअडचणी पाहतो. मुलांवर चांगले संस्कार कसे घडतील यासाठी आम्ही सगळे मी स्वतः शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक असतील, विद्यार्थी असतील त्यांच्याबरोबर एकत्र बसून चर्चा करतो. मा.निता पाडाळे ताईंनी अतिशय चांगला विषय मांडला आहे. काही शिक्षक प्रभारी मुख्याध्यापक काम करत आहेत. काही शिक्षक तसेच रिटायर्ड झाले आहेत. काही रिटायर्ड व्हायला आले आहेत. यासंदर्भात आपण लक्ष घाला. शाळेत शिक्षक फार कमी आहेत. सर्वांनी राजिनामा देण्याचा प्रयत्न केला होता. माध्यमिक शाळा माझ्या भागात आहे. तिथे क्रिडा शिक्षक नाही. मी तिथे वेळोवेळी वादावादी केली. टेबल खुर्च्या पाडल्या आहेत. काही शिक्षकांनी सांगितले, खाडेंचा राडा. पण तो राडा नसून मी सिनिअर कॉर्पोरेटर आहे. माझा नाईलाज होता म्हणून मी वेळोवेळी सांगून देखील तिथे क्रिडा शिक्षक दिला गेला नाही. ऊबाळे मॅडम गेल्या ते बरे झाले. त्यांच्याबद्दल ब-याचशा तक्रारी होत्या. त्यांना सांगितले त्या ऐकतच नव्हत्या. आत्ता जे कोणी अधिकारी आले आहेत ते प्रभारी अधिकारी आहेत. माझ्या शाळेत क्रिडा शिक्षक नाही. शिक्षक कमी आहेत. हिंदी विषयाला शिक्षकच नाही. मी भांडल्यामुळे आत्ता शिक्षक घेण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल आपले धन्यवाद. ठेकेदाराने खरेदीबाबत कोर्टात केस दाखल केली आहे. कोर्ट केसमुळे खरेदी अडचणीत आहे. गोरगरीबांच्या मुलांना गणवेष, बूट, मोजे मिळाले नसल्यामुळे दि.२६ जानेवारी रोजी मुलांच्या पायात बूट नव्हते. आम्हाला लाख वाटते. पण ठेकेदाराची नाटके असतील. त्याला

शासन करायचे असेलतर तुम्ही करा. अन्यथा आम्हाला सांगा. अशा गोष्टींत तुम्ही ऍक्शन घ्या,चौकशी करा. भ्रष्टाचार होत असेलतर निश्चित चौकशी करा. मी मा.सिमाताई सावळे यांचे अभिनंदन करतो. त्यांनी मघाशी सांगितलेस खरेदीबाबतीत ठेकेदाराने कोर्टात केस केली असेलतर त्याच्यावर कारवाई करा, त्याला ब्लॅकलिस्टमध्ये टाका. कोर्टकेसबद्दल एवढेच म्हणेन की, ज्याचे जळते त्यालाच कळते. तेवढीच विनंती करतो.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर मी तुम्हाला विनंती करेन की, मा.दत्ता काका साने यांनी जे प्रश्न मांडले त्याचा नंतर खुलासा करावा. मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले की, प्रायव्हेट शाळांमध्ये एका बालवाडीत ३० विद्यार्थी बसतात. आमच्या भागात एकच बालवाडीत आहे त्यात एका वेळेला ६० विद्यार्थी बसतात. खाऊ येतो ३० विद्यार्थ्यांचा. श्रीमती वर्षा बोराडे नावाची महिला दरवर्षी अर्ज करतेय. तिच्याकडे एका वर्गात ५० विद्यार्थी बसतात. म्हणजे एकूण ११० विद्यार्थी बालवाडीत बसतात. शाळेची पटसंख्या ११०० ते १२०० इतकी आहे. खरेतर मी आपले धन्यवाद मानते कारण आपल्या काळात चांगली महत्वाची कामे झाली आहेत. शाळेची खूप मोठी बिल्डींग उभी राहते आहे. ही अडचण दूर झाली आहे. पण माझी आपल्याला विनंती राहील की, या बिल्डींगमध्ये आमची शाळा लवकरच शिफ्ट होईल. आमच्या एरियात कुठेही माध्यमिक शाळा नाही. माध्यमिक शाळेत आठवी नंतरचे वर्ग सुरु करावेत. कारण आमच्या शाळेला प्रतिसाद खूप चांगला आहे. शाळेत शिक्षक कमी पडत आहेत. प्रामुख्याने पाहिलेच आहे की, क्रिडा क्षेत्रात पिंपरी चिंचवडच्या आमच्या महापालिकेच्या मुलींच्या शाळेने पहिला क्रमांक मिळवला आहे. तिथे कोणतीही सुविधा नाही. मुलांना खेळायला मैदान नाही. तरीसुद्धा शाळेतले विद्यार्थी चांगले शिकत आहेत. तुम्ही यात स्वतः लक्ष घालावे अशी आमची मागणी राहील, आठवीपासूनचे वर्ग चालू करावेत. माझ्या भागात कॅपेझिन नावाची कंपनी आहे. या कंपनीने आमच्या शाळेला १० संगणक संच दिले व आपल्या महापालिकेचे ०२ संगणक संच असे मिळून एकूण १२ संच शाळेमध्ये उपलब्ध आहेत. आमच्या शाळेत ई-लर्निंग चालू करायला काहीच हरकत नाही. आमची शाळासुद्धा प्राधान्याने यामध्ये घेण्यात यावी अशी विनंती करते. महिला शिक्षिका डिलिव्हरीसाठी सहा महिने मेडिकल रजेवर जातात. एक शिक्षक दोन वर्ग कसे ऍडजेस्ट करणार. त्यांच्या जागेवर एक शिक्षक किंवा शिक्षिका दिले पाहिजे. श्रीमती वर्षा बोराटे नावाची जी महिला आहे. तिच्या विषयाबाबतीत मा.महापौर साहेब आपणही लक्ष घालावे ही विनंती आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर १९९२ साली मी जेव्हा प्रथम या सभागृहात पदार्पण केले, तेव्हा नुकतीच कॉलेजची परिक्षा देऊन मी नगरसेवक

झालो होते. त्यावेळी सभागृहामध्ये सिनिअर लोकांना बोलताना पाहून मला सुद्धा वाटायचे की, आपण सुद्धा असे भाषण करायला शिकून आपले विचार मांडावेत. भाषण कसे करायचे ते मला सांगा मी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले थांब, शिक्षण मंडळाचे बजेट येऊ दे. तेव्हा आपल्याला पूर्ण वेळ बोलायची संधी असते. माझा सांगायचा मुद्दा असा आहे की, मघाशी मा.नारायण बहिरवाडे शिक्षण मंडळाच्या बजेटबद्दल बोलल्यानंतर सगळेच आपआपल्या पद्धतीने चांगले बोलले. काहीच मुद्दे बोलण्यासारखे होते. मी सुद्धा सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. कारण मा.नारायण बहिरवाडे यांनी अतिशय सविस्तरपणे मुद्दे मांडले आहेत. मा.सिमाताई सावळे यांनी चांगला मुद्दा मांडला आहे. सगळ्यांनी त्यांचे मुद्दे मांडले आहेत. मुद्दा असा आहे, खरेतर शिक्षण हा सात संस्कारांचा भाग आहे. आपल्याला आपल्या कर्मात काही भर टाकायची असेलतर सात प्रकारची दाने सांगितली आहेत. नेत्र दान असेल, देह दान असेल, अन्न दान असेल, या सात दानांपैकी कायमस्वरुपी सातत्याने देण्यात येणारे एकच दान आहे ते म्हणजे ज्ञान दान. आणि त्याचे कौन्सिलींग या शिक्षण मंडळात जेवढे आहेत त्यांच्यावर होणे फार गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्रात अनेक तज्ञ मंडळी कार्यरत आहेत. हे जे शिक्षण मंडळाच्या माध्यमातून चालले आहे, खरेतर शासनाने शिक्षणाची कॉप पद्धत कशासाठी काढली होती. काही रिटायर्ड माजी मुख्याध्यापक असतील, शिक्षण तज्ञ असतील, काही राजकीय व्यक्ती असतील यांचा समन्वय साधून ही शिक्षण संस्था कशी प्रगल्भ होईल, सुसंस्कारीत मुले कशी तयार होतील हा त्या मागचा हेतू होता. परंतू आपण पाहतोय. सगळे जे बोलले तेच मी पण बोलायचे असे करुन मला सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही. आपल्याला आयुष्यात संधी मिळाल्यानंतर त्या कामाचे समाधान निश्चित असायला पाहिजे. किमान रात्री घरी गेल्यानंतर झोपतरी आली पाहिजे. शिक्षण मंडळातील सर्व लोकांची एकदा बैठक घ्या की, हे खरेच रात्री झोपत असतील का. मानसिकदृष्ट्या सक्षम नाही. सर्वात महत्वाचे पंचवीस-पंचवीस वर्षे एकाच ठिकाणी राहिल्यामुळे इतके जबरदस्त मूढ झाले आहेत की सभागृहातल्या कोणाच्या भाषण करण्याचा त्यांच्यावर कसलाही असर होणार नाही, हे मी माझ्या पंचवीस वर्षांच्या अनुभवावरुन सांगतोय. आणि म्हणून या सगळ्या परिस्थितीचे भान ठेवून मी नाट्यशास्त्राशी संबंधित असल्यामुळे सांगतो. नाटक करणे म्हणजे कलावंताची ती ॲक्टींग झाली. पण नाट्य हे शास्त्र आहे. कर्नाटक राज्यात ७ वर्षांपूर्वी अंमलात आणलेले, गोवा राज्यात २ वर्षांपूर्वी आलेले, हे शास्त्र युरोपमध्ये ५० वर्षांपूर्वी आले आहे. हे कलासंस्कार आणि शिक्षण कशा पद्धतीने असावेत याबद्दल महाराष्ट्रातील टॉपमोस्ट चार तज्ञांबरोबर माझी बैठक झाली होती. मी त्यांना सांगितले होते की, तुम्ही आमच्या महापालिकेच्या शाळेतली मुले दत्तक घ्या. ही अविरतपणे ३२ ते ४० वर्षे काम करणारी माणसे आहेत. महापालिकेतील माझे काही शिक्षक मित्र आहेत. मी त्यांना विचारले होते, तुमचा दर्जा इतका का घसरतो. ते म्हणाले, इतकी गुन्हेगार स्वरुपाची मुले इथे वर्गात येतात. आम्हाला जायला सुद्धा भिती वाटते. म्हणजे यांची मानसिकता किती कमकुवत आहे. एखादा बालगुन्हेगार असेल, एखादा

झोपडपट्टीतला मुलगा असेल. माझ्या भागातील महापालिकेच्या शाळेत शंभर टक्के झोपडपट्टीतील मुले आहेत. या सगळ्या परिस्थितीचे भान ठेवून ही माणसे तयार झालेली असतात. यांचा पगार सगळे व्यवस्थित. तीन/चार ठेकेदार तर दत्तकच घेतले आहेत. रस्त्यावरुन रोज येता-जाता सर्व नगरसेवकांनी यांच्या कानाखाली जाळ काढला पाहिजे तेव्हा हे सुधारतील. नक्षलवाद वाढायला हेच कारण आहे. जेव्हा अत्याचार टोकाचा होतो, जेव्हाच माणसाच्या भावना चिघळतात तेव्हाच मनात अतिरेकी भावना येते. याठिकाणी तुम्ही एक मिशन घ्या. त्यात मी स्वतः काम करायला तयार आहे. याठिकाणी बालगुन्हेगार, दोन-दोन मर्डर केलेल्या लहान मुलांचा पूर्ण माणूस म्हणून परिपक्त करण्याची यंत्रणा डेव्हलप करायचे काम पुण्यामध्ये काही माणसे करतात. मुलांना फूटपाथवरुन उचलून आणतात. ती जर माणसे परिपक्व होऊन पुन्हा माणूस होऊन माणसात येतात. मग सर्व सुविधा उपलब्ध असताना हे आपण का करु शकत नाही याचे आत्मचिंतन करा. काम करत असताना असे काहीतरी करा. आपण देशाची नवी पिढी घडवतोय. नवीन संस्कार करतोय. काहीही द्या. यांची मनोवृत्ती नसेल, संस्कारक्षम मन नसेल तर तुम्ही कसलीही सुविधा द्या. दोन ड्रेस द्या, चार ड्रेस द्या. अन्य गोष्टी द्या. यातून दोन-तीन ठेकेदारांचे आणखी भले होईल. त्यासाठी मी काम करायला तयार आहे. मी आज सर्वांच्या साक्षीने सांगतो. तुम्ही त्याप्रमाणे केल्यानंतर भविष्यात पुढील अनेक पिढ्या तुमचे नाव घेतल्याशिवाय राहणार नाहीत. काहीतरी क्रांतीकारी करा. तेच तेच. हे बजेट मंजूर होईल. प्रोसिडींग सगळे होईल. समाधान फक्त याचेच वाटेल की, मी माझ्या मनातली खदखद बोलून दाखवली. कारण वर्षभर पुन्हा शिक्षण मंडळावर बोलायला मिळणार नाही. शिक्षण मंडळावर बोलणे म्हणजे भाषणाचा सराव करण्यासारखे आहे. पूर्वी पीसीएमटी होते, आता शिक्षण मंडळ आहे. म्हणजे शिक्षण मंडळावर भाषण करता आले नाही तर तो पीसीएमटीवर भाषण करायचा. आम्ही आत्तापर्यंत असेच करत आलो आहोत. तीच-तीच माणसे आहेत. या वर्गातून त्या वर्गात शिक्षकांच्या बदल्या यातच सगळे मश्गुल आहेत. मा.नारायण बहिरवाडे यांनी सुचवलेले पत्र गांभिर्याने घेतले आहे. कशाला बजेट वाढवता. या लोकांना मस्ती आली आहे, माज आला आहे. खाऊन खाऊन किती खाणार आहेत. एक कोटीत २० टक्के,२२ टक्के खातात. मग दर्जा कसा येणार. मी हे अतिशय जबाबदारीने बोलतोय. या सगळ्या परिस्थितीचे भान ठेवा. शब्द हे शस्त्र आहेत. एक लक्षात ठेवा, गेलेला शब्द हा सत्य आहे. काहीतरी नवीन पिढीला डोळ्यासमोर ठेवून नवीन काहीतरी माणसे अशी आहेत त्यांना जवळ घ्या. ज्याला त्या क्षेत्राची काही अक्कल नाही, संबंध नाही, त्याला त्या क्षेत्राचे प्रमुख पद देतात. तो गाढव काय करतो, तो चार चांगली माणसे गोळा करतो आणि नाव म्हणतो, माझे नाव. मलासुद्धा नाट्यक्षेत्रातले फार कळत नाही. पण या क्षेत्रातील ही तज्ञ माणसे आहेत. त्यांचे ऐका, माझे ऐकू नका. त्यांचा उपयोग करुन घ्या. आमटे यांच्यासारखा माणूस आणा. त्याचे शिक्षकांसमोर एक व्याख्यान ठेवा. दर रविवारी कार्यशाळा घेत जा. ज्ञानप्रबोधिनीसारखी शाळा अनेक शाळा आजही तेथे वर्षातून दोन महिने शिक्षकांची कार्यशाळा

घेतात. कारण का तर त्यांना शिक्षकांना पुन्हा पॉलिश करायचे असते. वाटले तर एखादे वेळेस ड्रेसचे टेंडर काढा. या सर्व परिस्थितीचे भान ठेवावे लागते. गेंडासुद्धा शरमेने मान खाली घालेल. इतकी यांची जाड कातडी झाली आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही आमचे ऐकून घेता. लिहून घेता म्हणून काही गोष्टी भाषणातून सांगायचे धाडस होते. या सर्व परिस्थितीचे भाग ठेवून काम निश्चित करा. कार्यशाळा, त्याचा अभ्यासक्रम, त्याची दिशा आणि शिक्षकांना कौन्सिलिंग ही सगळी जबाबदारी मी येथे घ्यायला तयार आहे. याचा गांभिर्याने विचार करा. ही भाषणे प्रोसिडींगमध्ये राहतील. तो आमच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण असेल. यानंतर २०१७ मध्ये काय होईल ते होईल तो भाग वेगळा आहे. कुणाच्या नशिबात पुन्हा भाषण करायला मिळेल ते ही आत्ता सांगता येणार नाही. या सगळ्या प्रश्नांचे सांगण्याचे कारण हेच की शिक्षण मंडळ दिशाहिन होत चालले आहे. हे सर्व सरळ करायची क्षमता आपल्यात आहे, ताकद आपल्यात आहे.धन्यवाद!

**मा.शांताराम भालेकर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज आपण इथे शिक्षण मंडळाच्या बजेटच्या संदर्भात चर्चा करत असताना मा.आयुक्त साहेब, तुम्ही माझ्या शाळेला व्हिजिट दिली आहे. शाळा तुम्हाला खूप आवडली आहे. पक्षनेत्या आमच्या शाळेला छान म्हणतात. छान करण्यासाठी कार्यकर्ता म्हणून योग्य पद्धतीने काम केले म्हणून हे घडले आहे. तुम्ही ते पाहिले आहे. तुम्ही एकदा माझ्या शाळेत आलात आणि भाषण केले. तुम्ही ग्रामिण भागातून आलात. तुम्ही त्या विद्यार्थ्यांना स्फुर्ती देण्याचे काम केले. तुम्ही सांगितले की, तुम्ही ग्रामिण भागातून आलेले असून मारुती मंदीराच्या शाळेत शिकलो आहे. तुम्हाला वाटलेही नसेल की तुम्ही भविष्यात इतके मोठे कमिशनर व्हाल. आमचे मित्र मा.भाऊसाहेब भोईर आहेत. आम्हाला शिक्षण क्षेत्रात काम करायची आवड आहे. त्यांनी सांगितले तसे त्या कमिटीत मला सुद्धा घ्या. मा.आयुक्त साहेब, तुम्ही काम करत असताना खरोखर शैक्षणिक, जे फार मोठे दान ज्ञान दान हे सर्वांत श्रेष्ठ दान आहे. तुम्ही सुद्धा कुठल्यातरी गुरुमुळेच घडलेले आहात. आता तुम्ही सगळ्यांचे गुरु आहात. तुमच्या हातात प्रशासन आहे. तुमच्या हातात नियोजन आहे. तुम्ही सगळ्यांचे बाप आहात. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना त्याबाबतीत बोललो आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना प्रशासन तुमच्या ताब्यात आहे. त्याचा शब्दशः अर्थ घ्या. मा.आयुक्त साहेब, मी तुम्हाला विनंती करतो. खरेतर अनेकांनी सांगितले की, टॉयलेट असेल आणि शाळेत जाताना जर वास आला, मनच प्रसन्न नसेल तर तो विद्यार्थी भविष्यात कसा घडणार? तिथे एखादा रखवालदार असतो त्याला शाळेला कुलूप सुद्धा लावता येत नाही. मी सातत्याने तळमळीने हेच सांगत असतो. बाकी इतर गोष्टी असू द्या. पण शाळेत स्वच्छता असू द्या, रखवालदार असू द्या. इथे चांगले लोक ठेवा. चांगले काम करा. सर्वात महत्वाचे म्हणजे शाळांमध्ये आधी सीसीटीव्ही

बसवा. हे फार महत्वाचे आहे. शाळांमध्ये जे गैरप्रकार घडतात, त्यावर कुठेतरी अंकुश बसेल. आपोआपच विद्यार्थी कोणत्याही पद्धतीने चूक करणार नाही. शाळेत त्याचे पहिले नियोजन करा. जसे आपण सी.एस.आर.च्या माध्यमातून डेव्हलपमेंट करु शकतो. तसे इतर नगरसेवकांना बरोबर घेऊन गायडन्स देऊन याठिकाणी करा. आजचा विद्यार्थी हा भविष्यातील भारताचा सुजाण नागरीक आहे. भविष्यकाळात आपल्यासारख्यांनी काम केलेतर निश्चित याठिकाणी त्याचा फायदा होणार आहे. मी शाळेच्या बाबतीत सातत्याने प्रयत्न केले आहेत. मघाशी मा.प्रशांत शितोळे यांनी देखील सांगितले आहे. मला शाळा या विषयात आवड आहे. आम्हाला सुद्धा कायमस्वरुपी प्रोत्साहन मिळाले पाहिजे. स्फुर्ती राहीली पाहिजे. आम्ही साध्या-साध्या गोष्टी सांगतो. त्यांच्याकडे सुद्धा लक्ष द्यावे. मुख्याध्यापकांना दर्जा पाहिजे. मुख्याध्यापकांच्या बदलीचा विषय चालला आहे. माझ्याकडे क्वालिटीचे मुख्याध्यापक द्या तरच क्वालिटी टिकून राहील. आम्ही सहकार्य करायचे मदत करायचे काम करु. याठिकाणी मा.महापौर साहेब, तुम्ही मला बोलायला खूप उशीरा संधी दिलीत. मला सिनिअर लोकांच्या आधी बोलायला द्यायला पाहिजे होते. याठिकाणी मी माझे दोन शब्द संपवतो, धन्यवाद!

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर मा.महापौर साहेब याठिकाणी सिनिअर मंडळी बोलल्यानंतर बोलण्यासारखे काहीच शिल्लक राहीलेले नाही. सगळेच म्हणतात, शिक्षण मंडळाच्या बजेटवरील चर्चा कधी संपेल. खरेतर आता बोलण्यासारखे काहीच राहीलेले नाही. कारण चर्चा खूप झाली आहे. तेच तेच मुद्दे रिपीट होत आहेत आणि प्रत्येकाला बोलायचा आनंद मिळतो. मा.भाऊसाहेब भोईर मघाशी म्हणाले की, वर्षभर बोलल्यानंतर पण शिक्षण मंडळाच्या बजेटवर बोलायचे. बजेटच्या विषयावर सगळेच बोलतात. परंतू मला आयुक्त साहेबांना हेच सांगायचे आहे की, शिक्षण मंडळाने वर्षभरात १३४ शाळांमध्ये काय केले,काय प्रकाश पाडला हे आज सगळ्यांनी दोन्ही कानांनी ऐकले आहे. नुसतेच बजेटवर पाच पाच सहा सहा तास बोलतो. परंतू शाळेचा विकास व विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या शिक्षणाचा दर्जा यावर मात्र प्रशासन झिरो परसेंट आहे. आपल्याकडे माध्यमिकच्या चांगल्या शाळा आहेत. त्याठिकाणी पदनिर्मिती करुन चांगला भक्कम माणूस ठेवलातर माध्यमिक शाळा सुधारतील. त्याठिकाणी मघाशी पाडाळेताईंनी सांगितल्याप्रमाणे तीन/चार वर्षांपूर्वी वसलेली शाळा दत्तक घेतलीतरी काही फरक पडायचा नाही. महत्वाचा मुद्दा हा आहे की, जेव्हा मी मा.क्रिडा समितीचा सभापती होतो त्यावेळी मी आयुक्त साहेबांबरोबर भांडण केले. जे क्रिडा शिक्षक आहेत. जे मतदानासाठी कायम स्वरुपी तहसिलदार कार्यालयाकडे काम करत होते. यातून महापालिकेला काही पैसे मिळत नाहीत. चोवीस तास क्रिडाचे जेवढे ३९ शिक्षक आहेत, ते गेली ५ वर्षे तहसीलदाराचे मतदानाचे काम करतात. क्रिडा विभागाचे झिरो टक्के काम करतात. हा माझा सर्वे

आहे. असे केलेतर महानगरपालिकेचे काय होईल असे निदर्शनास येते आहे. आत्ता मा.तानाजी खाडे म्हणाले. ज्या मुलांकडे मिळेल ते अन्न खाऊन खेळ खेळायची ताकद आहे. त्या मुलांकडे शिकवायला क्रिडा शिक्षक नसेलतर त्या मुलांनी काय आदर्श घ्यायचा. विद्यार्थ्यांना शिक्षणात टार्गेट प्राप्त करायचे असेलतर त्यांना खेळ व व्यायाम या दोन्ही गोष्टींचे मार्गदर्शन मिळाल्याशिवाय हा मुलगा ८० टक्क्यांच्यावर जाऊ शकत नाही. खरेतर प्राथमिक शाळेत क्रिडा शिक्षकाची गरज आहे. आपण काय केले. माध्यमिकला वर्ग केले. माध्यमिकची मुले सुदृढ मुले असतात. ती ज्ञानाने मोठी असतात. प्राथमिक शाळेतील जी मुले आहेत, पहिली ते सातवीपर्यंत महापालिकेचे जे विद्यार्थी-विद्यार्थीनी शिकतात, त्यांना ख-या अर्थाने गरज आहे. मी बजेटमध्ये वाचले, संगीत शिक्षकांना मानधनावर द्या. १३४ शाळांमध्ये संगीत शिक्षक आहेत का हे मला सांगता येणार नाही. परंतू क्रिडा शिक्षक व संगीत शिक्षक शाळेवर असतील तर ख-या अर्थाने गरीब, मागासवर्गीय कुटूंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळेलच पण त्याचबरोबर त्यांची खेळातली प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही हे माझ्यासारखा सांगू शकतो. या सभागृहात आल्यानंतर चार वर्षे मी आरक्षणासाठी भांडतोय. शिक्षण मंडळ झोपलेय, आणि टाऊन प्लॅनिंगसुद्धा झोपलेय. माझी शाळा आहे शेवंताबाई जगताप प्राथमिक शाळा. या शाळेत ६५० मुले शिकतात. १९९४ चे आरक्षण आहे. या शाळेत दोन वर्गांतली मुले एका वर्गात बसतात. शिक्षण मंडळाने इथे लक्ष दिले नाही. तिथे मुलांना बसायला जागा नाही. जागा असून देखील नवीन इमारत बांधली जात नाही. नगररचना विभागाने कार्यवाही करुन आरक्षणे ताब्यात घेतली पाहिजेत. तिथे प्रशासनाला इंटरेस्ट नाही. शिक्षण मंडळाला इंटरेस्ट नाही. कुणाला इंटरेस्ट नाही. मग त्या मुलांनी कसे शिकायचे? वेळेची मर्यादा लक्षात ठेवून मी एवढेच सांगू इच्छितो की, ज्या-ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली खंत व्यक्त केली आहे, त्याची अंमलबजावणी केलीतर निश्चितच या महापालिकेतील ४०,००० विद्यार्थी-विद्यार्थीनींचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. आज जशी विशेष सभा बोलवलीत, तशीच विशेष महासभा शिक्षण या विषयावर लावा. या सभेत आपण चर्चा करावी. असे केलेतर प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. मी इथे माझा अनुभव सांगतो. नगरसेवकाने जर वॉर्डात असलेल्या एखाद्या खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गरीबातील गरीब विद्यार्थ्याला प्रवेश देण्यासाठी पत्र दिलेतर, महापौर मॅडम यांना देखील असाच अनुभव आला आहे. त्यांच्या शब्दाला देखील दाद दिली जात नाही. मग आमच्यासारख्यांचे काय. म्हणून यासाठी प्रशासनाने लगाम लावायची गरज आहे. आमची चार वर्षे निघून गेली आहेत. उरलेल्या एक वर्षामध्ये गरीबातील गरीब मुलाला ॲडमिशन देताना शिक्षण मंडळाने सहकार्य केले पाहिजे. परंतू ऊबाळे ताईंनी हे काम कधी केले नाही. फक्त आरोप करायचे काम केले. नगरसेवकांना कुठेतरी किंमत आहे, मान्यता आहे. त्यांची प्रतिष्ठा आहे. शिक्षण मंडळाने याचेदेखील भान ठेवावे. मात्र त्याच पद्धतीची वागणूक शिक्षण मंडळाकडून मिळत नाही. त्याठिकाणी नगरसेवक आक्रमण करतो व त्या

नगरसेवक किंवा नगरसेविकेवर ताशेरे ओढले जातात. असे करु नये. प्रशासनाने नगरसेवकांना एक दर्जा द्यावा, मान्यता द्यावी. एवढे बोलून थांबतो. जयहिंद जयमहाराष्ट्र!

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज २०१६-१७ चे शिक्षण मंडळाचे बजेट मांडत असताना विशेष करुन मी बोलू इच्छितो की, महापालिकेच्या शाळांतील पटसंख्या दिवसेंदिवस घटते आहे. आणि बजेट मात्र तेच वाढते आहे. सन्मा.महापौर साहेब, हा प्रकार मला कळालेला नाही. दुसरा विषय म्हणजे आपल्या शाळेत पटसंख्या वाढावी या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे. हे पोषक वातावरण निर्माण करण्याकरिता शिक्षण मंडळाला स्थापत्य आणि आरोग्य यांची गरज असते. स्थापत्य हा रंगरंगोटी काम, सिव्हिल काम दुरुस्ती काम करत असतो. आरोग्य विभाग स्वच्छतेबाबतीत पाहत असतो. विशेष म्हणजे आत्ता मा.तानाजी खाडे म्हणाले की, आम्ही शाळेत जातो, तिथे तास-तास थांबतो. मुलांची त्यांच्या गुणवत्तेबाबत व्यवस्थितरित्या चौकशी करतो. हा विषय नगरसेवकांच्या अंतर्गत का आला असावा. आम्हाला वॉर्ड बघावा लागतो, गटर फुटल्यापासून सगळे बघावे लागते. त्यांना काही नाही. तेवढेच आहे. यांचे किती कोटींचे बजेट खर्चीक आहे. गुणवत्तेसाठी काहीतरी केले पाहिजे. मला असे म्हणायचे आहे की, मी आरोग्याबाबतीत जास्त बोलणार आहे. माझ्याकडे डाटा आहे. त्यानुसार अ प्रभागात आरोग्य कर्मचा-यांची संख्या २५० आहे. १६ प्राथमिक व ३ माध्यमिक शाळांमध्ये ११९ टॉयलेट व २३९ मुता-या आहेत. सफाईसाठी फक्त २६ कर्मचारी आहेत. याचे अजून सेपरेशन करुन सांगायचे झाले तर, वसंतदादा पाटील शाळा, आकुर्डी, पुणे येथे खोल्यांची संख्या ६, टॉयलेटची संख्या ४ मुता-यांची संख्या ४ असून साफसफाईसाठी एकच कर्मचारी आहे. दुसरे उदाहरण म्हणजे श्रीमती लिलाबाई खिंवसरा प्राथ.शाळा, मोहननगर, पुणे येथे शाळेत २२ खोल्या, ४ टॉयलेट आहेत, ८ मुता-या आहेत व कर्मचारी एकच आहे. हा कुठला हिसाब आहे. पटसंख्येच्या प्रमाणात कर्मचारी देताय का टॉयलेटच्या संख्येच्या प्रमाणात कर्मचारी देताय. इथे शाळेतील खोल्यांच्या संख्येच्या प्रमाणात पटसंख्या नाही. म्हणून इथे स्वच्छता कशी राहणार. कशी येणार. त्यामुळे शाळेत स्वच्छता चांगली राहण्याकरीता कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेप्रमाणे वाढवली पाहिजे. काही ठिकाणी पटसंख्येच्या प्रमाणात खोल्यांची संख्या नाही. टॉयलेटची संख्या वाढली पाहिजे. कितीही संख्या असू दे. एक कर्मचारी काय करणार. दोन शिफ्टमध्ये २२ खोल्या साफ करणार का, ४ टॉयलेट व ८ मुता-या स्वच्छ करणार. सोमवारी शाळेत आल्यावर सगळे बेंचेस धुळीने भरलेले असतात. शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांचे कपडे खराब होतात. हा विषय महत्वाचा आहे. आरोग्य खात्याला सांगून शाळेत सफाई कर्मचारी वाढवा. शाळांची पटसंख्या वाढण्यासाठी बालवाडीपासून आपण जास्त लक्ष द्यायला पाहिजे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आता नर्सरीपासून मुले घेतात. चांगल्या प्रकारे वातावरण निर्मिती करुन चांगले शिक्षण देतात. इंग्रजी माध्यमाकडे जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. आणि पालकांची मानसिकता तशीच आहे.

मागेल तेवढे डोनेशन सुद्धा देतात. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे जास्त आहे. त्यामुळे महापालिकेच्या शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी बालवाडी किंवा नर्सरी पासून चांगली सुरुवात केली पाहिजे. दुसरा विषय म्हणजे सभागृह शिक्षण मंडळाच्या बजेटला मंजूरी देणार आहे आपण एप्रिलमध्येच गणवेशासाठी मुलांची मेजरमेंट घ्यायला लावा. त्या मुलांचे मेजरमेंट कधी घेणार, कधी शिवायला देणार व त्या मुलांना कधी कपडे मिळणार. हे कुठेतरी चुकते आहे. दरवर्षी १० टक्के गळती होते. त्या मुलांचे कपडे पुढील वर्षी वापरात येतील. त्यामुळे बजेटला मंजूरी देताना क्विक ॲक्शन घेतली पाहिजे. एप्रिलची परिक्षा संपल्यानंतर मुलांची मापे घेणे गरजेचे आहे. कपडे शिवताना गुणवत्तेनुसार शिवले पाहिजेत. मुलांचे कपडे कुठे लूज असतात. मा.सिमा सावळे ताईंनी सांगितले तसा प्रकार मुलांच्या ड्रेसच्या बाबतीत झाला नाही पाहिजे. ई-लर्निंगच्या माध्यमातून स्टँडींग समितीने अडीच कोटी सुचवले आहेत. आपले एक कोटी इतके बजेट आहे. या माध्यमातून सर्व शाळेत जात असताना आपण याकडे चांगल्या पद्धतीने लक्ष दिले पाहिजे. शासन दरबारी दप्तराचे ओझे कमी करायचे चालले आहे. सर्वांना टॅब देण्याचे माध्यम खरोखर उपयोगी ठरणार आहे. या विषयाचा विचार करणे गरजेचे आहे. गुणवत्ता वाढीसाठी आपण खाजगीकरणाच्या माध्यमातून बजाज कंपनी असेल, थरमॅक्स या कंपन्यांकडून शाळा दत्तक घेण्यासाठी प्रयत्न करायची जास्त गरज आहे. आपल्याकडे शिक्षणाचा बोजवारा वाजला आहे. मराठी माध्यम असो, इंग्रजी माध्यम असो, शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी जास्त प्रयत्न करावेत एवढेच मी बोलतो.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रामुख्याने पहिल्यांदा उपसूचना असेल. शिक्षण मंडळाचे अधिकारी म्हणून तुमच्यावर खूप जबाबदारी आहे. आमच्या सदस्यांच्या खूप अपेक्षा आहेत. मा.बाबासाहेब धुमाळ असतील, मा.आर.एस.कुमार असतील, मा.रामदास बोकड असतील, मा.सुरेश म्हेत्रे असतील, मा.भाऊसाहेब भोईर असतील, सर्व नगरसेवकांची या विषयाबाबतीतली तळमळ लक्षात घ्या. मी गेली चार वर्षे तेच-तेच बोलतोय. मी तर पंचवीस वेळा हेच बोललो आहे. म्हणजे मला कंटाळा आला नाही पाहिजे. चार वर्षांपासून त्याच-त्याच गोष्टी बोलूनसुद्धा तेच-तेच होणार असेलतर बोलण्यात सुद्धा काही मजा वाटत नाही. ही तळमळ पण लक्षात घ्या. आम्हाला मा.महापालिका सभेमध्ये बरेच महत्वाचे विषय असतात. काही आर्थिक, काही सामाजिक विषय असतात. माझा वैयक्तिक विषय असेल, सामाजिक विषय असेल चिंचवडमध्ये काहीतरी नवीन घडणार आहे आणि त्यातून समाजाला फायदा होणार आहे. हा तो विषय आहे. एवढी मोठी तरतूद करुन ठेवली आहे. ठेवली पाहिजे. ही तरतूद ठेवत असताना जर सातवीतील सरकारी शाळेतील मुलाला इंग्रजी येत नसेलतर ती तरतूद काय कामाची नाही प्रत्यक्ष जाऊन पाहणी करा. आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आमची टिम ब-याच झोपडपट्टीतल्या मुलांची, माझ्या वॉर्डातल्या मुलांची शाळेत जाऊन पाहणी करत होतो. बोल

इंग्रजी बोल, एबीसीडी येते का बोल असे विचारले तर सातवीतल्या विद्यार्थ्यांना काहीच येत नव्हते. एकतर शासनाचा नियम आहे की, आठवीपर्यंत मुलांना पास करा. त्यानंतर ही अवस्था. या सगळ्याच गोष्टी आपण लक्षात घ्याव्यात. मा.आयुक्त साहेब, मी मागे सुद्धा बोललो होतो की, खरोखरच आपल्याला यंत्रणा सुधारावयची असेलतर खूप कडक निर्णय घेतले पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे महापालिकेच्या शाळा या गरीबांसाठी आहेत हे पहिले डोक्यातून काढले पाहिजे. शहरातील सगळे रहिवासी टॅक्स भरतात. आणि त्या टॅक्समधून शाळा चालतात. ही शाळा सर्वांसाठी आहे. आपण सुविधा द्यायला कुठेतरी कमी पडतोय म्हणून चांगले लोक इथे यायला तयार होत नाहीत. महापालिकेत एवढे अधिकारी, कर्मचारी आहेत, आम्ही नगरसेवक आहोत. आमच्या मुलांसाठी कंपल्सरी कायदा करा, पुढच्या जी.बी.ला ठराव घ्या की, यांची मुले सरकारी शाळेत शिकली पाहिजेत. जोपर्यंत आमची मुले सरकारी शाळेत शिकायला जात नाहीत. तोपर्यंत तिथे बदल कसा होणार. शिक्षक इथे शिकवतात पण त्यांची मुले शिकायला चांगल्या शाळेत. ते काय शिकवणार. शिक्षकांना तर नेहमी ड्युट्याच लागलेल्या असतात. तुम्ही सुद्धा यात लक्ष घालून शासनालासुद्धा पत्र पाठवले पाहिजे की, आमचे शिक्षक इलेक्शन ड्युटी करु शकणार नाहीत. तुम्ही दुस-या लोकांना पाठवा. शिक्षकांना किती जबाबदारी देणार. शिक्षिका दहा बिल्डांग चढल्या, उतरल्या, मग त्यांची शिकवायची मानसिकता कशी राहील. ही मानसिकता बदला नाहीतर काय उपयोग आहे. माझे म्हणणे लक्षात घ्या. सर्व प्रतिष्ठित लोक असतील त्यांना कायदा करा. त्यांची मुले सरकारी शाळेत येऊ द्या मग बघा शाळेत फरक पडेल. वर्गात हिच परिस्थिती आहे. एक वर्गात दोन तुकड्या. काही ठिकाणी तीन तुकड्या. आमचा बोलण्याचा एकच उद्देश आहे की, लोक शिकलेतर भारत पुढे जाईल. आपल्या पिंपरी चिंचवडचे नाव होईल. आपण एवढा खर्च करतोय. या गोष्टी तळमळीने लक्षात घ्या. शिक्षण हा महत्वाचा विषय आहे. तुम्ही यात जास्त लक्ष घालावे अशी माझी अपेक्षा आहे. बरेच मान्यवर इथे चांगले बोलले आहेत. इथे दरवर्षीचे रिपीट झाले नाही पाहिजे. पावसाळा झाल्यावर रेनकोट, उन्हाळ्यात स्वेटर, हे कुठेतरी बदलून टाका. आम्हाला तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. तुम्ही नेहमी आमचे म्हणणे ऐकता. नवीन अधिकारी आले आहेत. साहेब, तुम्ही तुमची जबाबदारी घ्या. आयुक्तांवर कामाचा भरपूर लोड आहे. आणि त्यातून कशा पद्धतीने शिक्षण मंडळात एका वर्षात सुधारणा करता येतील, काय कडक निर्णय घेता येतील ते पहा. आमचे ऐकू सुद्धा नका. पण चांगेल असेल तर नक्की ऐका. आमचे सहकार्य तुम्हाला नक्कीच मिळेल. या वर्षी तरी तुमच्या माध्यमातून संधी मिळू द्या. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दर वर्षीप्रमाणे शिक्षण मंडळाचे बजेट मंजूरीसाठी आले आहे. मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वर्षी सभागृहात एक वेळ बोलायची संधी आम्हा नगरसेवकांना मिळत असते. सर्वांनी अतिशय

पोटतिडकीने आपले म्हणणे मांडले आहे. मुळात आपल्या पिंपरी चिंचवड शहरात ज्या पटीने लोकसंख्या वाढली आहे, त्या पटीत विद्यार्थी संख्या वाढली नाही. या मागील कारण काय. पूर्वी व आत्ता आजच्या तारखेला आपण विचार केलातर अनेक खाजगी संस्था पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात सुरु झाल्या आहेत. पालकांची मानसिकता अशी असते की, माझा मुलगा किंवा मुलगी चांगल्या शाळेत जावेत. त्यांना इंग्रजी माध्यमाचे चांगले शिक्षण मिळावे. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असे म्हणतो. पालकांचा महापालिकेच्या शाळांकडे पाहायचा दृष्टिकोण बदलला आहे. पूर्वी फक्त महापालिकेच्या शाळा होत्या. म्हणून सर्व स्तरांतील लोक त्याच शाळांमधून शिक्षण घेत होते. अनेक मोठ-मोठी मंडळी महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेऊन मोठी झाली आहेत. परंतू आज या मंडळींची मुले खाजगी शाळेत शिकायला जातात. कारण आपल्या शाळांकडे पाहायचा दृष्टिकोण बदलला आहे. हा बदललेला दृष्टिकोण ख-या अर्थाने बदलायचा असेलतर आपल्याला प्रामाणिकपणे काम करायची गरज आहे. शासनाच्या व महापालिकेच्या खूप योजना असतात. आमची अपेक्षा असते असे व्हावे. परंतू प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यांची अंमलबजावणी होणे, त्यांची इच्छाशक्ती ख-या अर्थाने वाढवण्यासाठी व विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना प्रयत्न करायला लावणे ही काळाची गरज आहे. होते काय, महापालिकेच्या शाळेत पूर्वीचीच शिक्षण पद्धत वापरतोय. परंतू काळ बदलला आहे. या बदललेल्या काळात आपल्या मुलांना कॉम्प्यूटरचे शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यांना ई-लर्निंगसारखे नवीन तंत्रज्ञान देणे गरजेचे आहे. या सगळ्या सुविधा आपल्या महापालिकेच्या शाळेत दिल्या पाहिजेत. दूर्दैवाने अजूनही हे मोठ्या प्रमाणावर करत नाही. मघाशी मा.प्रशांत शितोळे यांनी उल्लेख केला होता की, गेले ७/८ वर्षांपासून आपल्या शाळेचे काम सुपरव्हिजनचे काम त्यांच्याकडे द्यायचे ठरवले होते. ते आपण द्यायला बरेच कोटी रुपये खर्च केले तरी प्रत्यक्षात रिझल्ट मिळाला नाही. असा रिझल्ट काढायचा असेलतर समाजात अनेक लोक आहेत. त्यांना खरेच वाटते की विद्यार्थी घडले पाहिजेत. त्यांना शिक्षण मंडळातच घेतले पाहिजे असे नाही. तुम्ही अनेक खाजगी शाळांमध्ये, आत्ता सिटीप्राईड शाळेचा उल्लेख केला, तिथे व्हिजिट केली तर तिथे ऍडमिशनसाठी लाईन लावून असल्याचे दिसते. वाट्टेल तेवढे पैसे देण्याची लोकांची तयारी असते. तिथे नेमके काय दिले जाते व आपल्याकडे दिले जात नाही. कमिटी अपॉईंट करा. त्यांनी शाळेत व्हिजिट केली पाहिजे. शाळेत जाऊन नेमके काय केले जाते. कशा पद्धतीने शिक्षण दिले जाते. मी माहिती घेतली तर तिथल्या शिक्षकांचा पगार आपल्या शिक्षकांपेक्षा खूप कमी असतो. तरीसुद्धा आपल्याकडे पाहिजे तेवढे शिक्षण आपल्या मुलांना देत नाहीत. आपण इन्फ्रास्ट्रक्चर चांगले देण्याचा प्रयत्न करतो. तरीदेखील ते अधिक चांगले होऊ शकते. कोणत्याही शाळेत जा त्याठिकाणी जो टॉयलेटचा वास येतो, की कोणीही तिथे फिरकू शकत नाही. खरेतर आम्हाला या छोट्या-छोट्या गोष्टींवर बोलायची वेळच आली नाही पाहिजे. आणि ज्या पद्धतीने आम्हाला इथे बोलायची वेळ येते. दूर्दैवाने यात प्रशासन, शिक्षण मंडळ कुठेतरी कमी पडते. प्रशासनाने बजेट कमी दिले तर सदस्य बदनाम

होतात. त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. सर्वांना साहित्य वेळेवर मिळायला पाहिजे. तुमच्या या प्रशासकीय पातळीवरील दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांना वेळेवर सगळ्या वस्तू मिळत नाहीत. कोणीतरी ठेकेदाराचा उल्लेख केला. त्याने आख्खे शिक्षण मंडळ वेठीस धरले आहे. बजेटमध्ये वकीलाच्या फी साठी १५ लाख रुपये तरतूद ठेवली आहे. एवढे १५ लाख कशासाठी लागतात. तिथे ठेकेदारांचे जे उद्योग होतात, त्याच्यासाठी हे १५ लाख खर्च करावे लागतात, हे कुठेतरी थांबले पाहिजे. अशा लोकांना ब्लॅकलिस्ट केले पाहिजे. तुम्ही त्यांना संधी दिली नाही पाहिजे. प्रशासक म्हणून तुम्ही कमी पडता. सदस्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. सदस्य विनाकारण बदनाम होतो. अनेक लोकांच्या शिक्षण संस्था आहेत. महापालिकेच्या अनेक इमारती खाजगी शिक्षण संस्थांना दिलेल्या आहेत. अतिशय चांगल्या पद्धतीने तिथे मुलांना शिक्षण दिले जाते. त्या शिक्षण संस्था मोठ्या झालेल्या आहेत. ते नेमके काय करतात त्याची तपासणी करायची गरज आहे. आपण स्वतः व काही तज्ञमंडळी बरोबर घ्या. या शाळांना व्हिजिट करा. नेमके महापालिकेच्या शाळेत काय करता येईल याचा विचार केला पाहिजे. शिक्षकांना अतिरिक्त भार दिला जातो. त्यांना ते काम देऊ नका. त्यांना अपग्रेड करायला वेळ द्या. त्यांची कार्यशाळा घ्या. बदलत्या काळाप्रमाणे त्यांना सुद्धा अपग्रेड करायची गरज आहे. दूर्दैवाने हे होत नाही. आज सगळ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा. सगळ्यांना वाटते, आमच्या मुलाला इंग्रजी कळावे, त्याने इंग्रजीत बोलावे. ही काळाची गरज आहे. म्हणून फार कमी शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. म्हणून आपल्या शाळेत नर्सरीपासून बालवाडीपासून इंग्रजीचे शिक्षण दिले पाहिजे. हे द्यायचे असेलतर आपल्या शिक्षकांना चांगले इंग्रजी आले पाहिजे. त्याचे ट्रेनिंग त्यांना द्या. जोपर्यंत आपले मूलाला अशा पद्धतीने बालवाडीपासून इंग्रजी बोलत आले, लिहिता आले, वाचता आले तर निश्चितपणे इतर लोक सुद्धा विचार करतील की महापालिका शाळेत आपल्या मुलाला सुद्धा टाकले पाहिजे. येत्या काळात यावर अंमलबजावणी करावी. आमची तुमच्याकडून खूप अपेक्षा आहे. तुम्ही आमच्याशी अतिशय चांगले संबंध ठेवता, चांगले बोलता म्हणून साहेब, आम्ही तुमच्यापुढे सहज सगळ्या गोष्टी बोलतो, अपेक्षा व्यक्त करतो. तुमच्या काळात महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या शाळा अधिक चांगल्या कशा होतील, पटसंख्या कशी वाढेल यासाठी आगामी काळात प्रयत्न करावेत ही अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

**मा.वसंत (नाना) लोंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रथम महापौर साहेब, मी आपले मनापासून धन्यवाद करतो. कारण गेले साडेतीन तास चर्चा केली. मी गेले २० वर्षांचा अनुभव सांगतो की, बजेट पास होते. सगळे काही होते. शाळेबाहेर विद्यार्थ्यांसाठी सरकार सुद्धा काम करते आहे. तुमचे काम समाधानकारक आहे. मी आनंदी आहे की, माझ्या रेडझोनमध्ये तुम्ही ख-या अर्थाने चांगले काम केले आहे. मी स्पष्ट बोलायला नाही पाहिजे. शाळेचा व झोनचा काय फरक आहे का. गेले चार वर्षांपासून बालवाडीतली मुले जिल्हा परिषदेच्या

शाळेत येतात. माझ्या वॉर्डात बालवाडीच नाही. माझा वॉर्ड रेडझोनमध्ये येत असल्यामुळे तिथे शाळेचे आरक्षण नाही. माझ्या वॉर्डात शाळा नाही, खेळाचे मैदान नाही, स्विमिंग टँक नाही, गार्डन नाही, हॉस्पिटल नाही काहीच नाही. बालवाडीत जायला भोसरी गावात दोन/चार किलोमीटर वर जावे लागते. रेडझोनमुळे ४ कि.मी. अंतरापर्यंत विकास कामे झाली नाहीत. सांगण्याचे तात्पर्य हेच की, मी देखील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकलो होतो. भोसरी इथे सातवीपर्यंत शाळा होती. पुढे दापोडीला चार वर्षे पायी गेलो. चावडीत शाळा भरायची. मी चावडीत शाळा शिकलेला माणूस आहे. कधी कधी वाटते. त्यावेळी मॅट्रीकला ७ विषय कम्पल्सरी होते. त्यात तीन भाषाच असतील. मराठी,हिंदी,संस्कृत व इंग्रजी. आम्हाला इंग्रजी विषयाचा गंधच नव्हता म्हणून इंग्रजी विषय घेतला नाही. मी मॅट्रीक पास झालो. परंतू आयटीआयला गेलो तिथे ख-या अर्थाने इंग्रजीची गरज भासली. एनफ्रान्स कंपनीत रुजू झालो. तिथे रडार तयार होत होते. सोन्याचांदीचा मुलामा दिला जायचा. तिथले मॅनेजिंग डायरेक्टर अमेरीकन होते. तेव्हा इंग्रजी बोलता येत नव्हते पण काय बोलत आहेत ते कळत होते. दूर्दैवाने त्यावेळी परिस्थिती बिकट होती. पण शिक्षणाचा दर्जा चांगला होता. आज परिस्थिती अशी आहे की, मुलेच शिक्षकांना रागवायला लागली आहेत. जनगणनेचे काम शिक्षकांकडून करुन घेतात. पल्सपोलीयोचे काम करुन घेतोय. म्हशी मोजा, गायी मोजा, कुत्री मोजा, मांजरी मोजा, त्यांच्याकडून काय-काय मोजून घेताय. हे कुठेतरी थांबले पाहिजे. ब-यापैकी परिस्थिती असल्यामुळे पालकसुद्धा मुलांकडे लक्ष देत नाहीत. मुलांना परिक्षाच नाही त्यामुळे त्यांनाही काळजी नाही. ही मुले आपोआप पास होतात. मुलांमध्ये स्पर्धा झाली पाहिजे. म्हणजे शिक्षणाचा दर्जा आपोआप वाढतो. या विषयावर ख-या अर्थाने शिक्षणासाठी खर्च हा झालाच पाहिजे. माझे मत आहे की, महापालिकेच्या बजेटच्या ३० टक्के खर्च शिक्षणावर केला पाहिजे. शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. १२५ कोटी लोकसंख्येचा हा देश,शेती प्रधान देश. शेतक-यांची मुले शिकली पाहिजेत. परदेशात गेली पाहीजेत. त्यांनी छोटे-मोठे व्यवसाय केले पाहिजेत. तरच ख-या अर्थाने देश प्रगती करेल. शिक्षण क्षेत्रात कुठे कमी पडू नका. अजूनही बजेट वाढवा. शिक्षणावर खर्च करा. ज्या शहरात शिक्षणावर जास्त खर्च होईल, ते शहर निश्चितच चांगले होईल. गेली वीस वर्षे मी हेच ऐकतोय भ्रष्टाचार,भ्रष्टाचार,भ्रष्टाचार. मग उघड करा. पकडून द्या. पुणे महापालिकेत हे उघड केले होते, अटक झाली होती. दुसरे सांगायचे म्हणजे प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरा कंपल्सरी बसवाच. शिक्षकांवर कंट्रोल झाला पाहिजे. बजेट वाढवलेच पाहिजे. परंतू तिथे शिक्षक काय करतात. विद्यार्थी काय करतात. पालक काय करतात. गावगुंड शाळेत जाऊन काय करतात. हे सगळे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. शिक्षण मंडळाचे बजेट मंजूर करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी जास्त वेळ बोलणार नाही. माझ्या दोन सूचना आहेत की, दोन वर्षांपूर्वी मी ज्या सूचना केल्या होत्या त्याच परत सांगते. बालवाडीतल्या विद्यार्थ्यांना खाऊ द्या. मी स्वतः बोलले होते. तुम्ही तुमचे मिनिटस् काढा. सदस्य एवढे पोटतिडकीने बोलत आहेत. मला दुसरी सूचना करायची आहे की, आत्ता शिक्षणाबद्दल बरीचशी चर्चा झाली आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता घसरलेली आहे. मा.आयुक्त साहेब, असा एक कायदा आहे तो बघा. जे पालक त्यांच्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत अशा पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कायद्याचा वापर तुम्ही करा. आज निम्म्या पेक्षा जास्त मुले आईवडीलांच्या भांडणामुळे, वडील दारू पितात म्हणून भांडण होऊन आई माहेरी गेली आहे यामुळे बरीचशी मुले शाळेत येत नाहीत. हे दोघांनाही माहित आहे की, आपला मुलगा शाळेत गेला नाहीतरी तो पास होणार आहे. महानगरपालिकेच्या शाळेत मुलांना गणवेश, दप्तर, वह्या, पुस्तके सगळे मोफत मिळते. त्याला उपस्थितीची गरज नाही. हजेरीची गरज नाही. या वातावरणाचा परिणाम त्या विद्यार्थ्यांवर होतो. मुलाची काही चूक नसते. या एक दोन महिन्यांत आपण अशा काही पालकांवर कारवाई करा. तरच मुले शाळेत यायला लागतील. आणि शिक्षकांच्या सुट्या तुम्ही मोजल्यात. माझी तिसरी विनंती आहे की, शिक्षकांना इतर कामे देतो. जनगणनेचे काम असो, निवडणूकीचे काम असो ते आधी बंद करा. आम्ही कितीही ओरडलो तरी ही कामे बंद होत नाहीत. ही कामे बंद केल्यानंतरच आपली गुणवत्ता वाढू शकेल. महापालिकेच्या प्रत्येक शाळेत किमान एकतरी इंग्रजी माध्यमाचा वर्ग पहिलीपासून सुरु करा. म्हणजे आपली गुणवत्ता वाढेल. चांगल्या सूचना आलेल्या आहेत. मी सर्व सदस्यांचे अभिनंदन करते की, सदस्य फार पोटतिडकीने बोलले आहेत. या सूचनांची किमान दोन-तीन महिने अंमलबजावणी केलीतरी या विद्यार्थ्यांचा रिझल्ट खूप चांगला लागेल. धन्यवाद!

**मा.शमिम पठाण**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज खरेतर अनेक जण मनापासून चांगले बोलले. स्वतः अनुभव घेऊन बोलल्यामुळे, उत्स्फूर्तपणे बोलल्यामुळे सर्वांचेच ऐकण्यासारखे होते. शिक्षण मंडळाचे बजेटचा विषय आहे म्हणून तेचतेच काहीतरी बोलायचे हे खरेतर चुकीचेच आहे. दर वर्षी तेच-तेच बोलायचे म्हणून या वर्षी बोलायची इच्छा नव्हती. मागील सभेचे मिनिटस् पाहिलेतर आणि वाचून दाखवले तर यावर्षीही तेच. परिणाम काही होत नाही. जसे शाळांमध्ये मुख्याध्यापक प्रभारी आहेत. तसे शिक्षण मंडळाचे अधिकारी पण एवढ्याच वर्षासाठी प्रभारी झाले आहेत. तरीपण मला या वेळी विशेष सांगावेसे वाटते आहे की, या वर्षी शिक्षण मंडळाचे जे अध्यक्ष व उपाध्यक्ष झाले आहेत ते सर्व जीव लावून, मन लावून काम करत आहेत. ते मंडळात कधीतरी जात असतीलही पण आत्तातरी ते शाळांना भेटी देत आहेत हेही नसे थोडके. कारण शिक्षण म्हटलेकी तिथे शिक्षक हा महत्वाचा घटक आहे. जर शिक्षकांनी हे काम

मनापासून केले तर कारण भौतिक सुविधा आहेत. कुठेतरी भौतिक सुविधा कमी असतीलही परंतू त्यांचे प्रमाण जुजबी आहे. त्याचा पाढा ब-याच जणांनी वाचलाही आहे. परंतू सर्व भौतिक सुविधा असून सुद्धा मी आत्ताच सांगितले की, शिक्षकांची शाळेमध्ये शिकविण्याची मानसिकता अत्यंत कमी आहे. मी स्वतः शिक्षक म्हणून ३५ वर्षे काम केल्यामुळे मला निरीक्षणातून असे दिसते आहे. यापूर्वी फत्तेचंद जैन विद्यालय ही पंचक्रोशीत एकच माध्यमिक शाळा होती. एक खडकीत होती. खूप दूरदूर शाळा होत्या १९२७ पासून चालू असलेली ही शाळा आहे. सगळ्या ग्रामीण भागातील अनेक शेतक-यांची मुले अनवाणी पायाने येणारे. हे सगळे शेतकरी आज जरी लँडलॉर्ड, गुंठामंत्री जरी म्हणत असलो तरी ही मागची पिढी त्यांचे वडील पावसात भिजत शाळेत येत असत. सायकल पंक्चर झालीतर ती उचलून घेऊन यायचे. आणि भिजलेले शर्ट खिडकीत वाळत टाकायचे. बनियन सुद्धा नसायचा. अशा परिस्थितीत ही मुले काट्याकुट्यातून शाळेत येत होती. त्यावेळी त्यांना शिकवणारे अनेक चांगले शिक्षक त्याकाळात होते. दहावीला शिक्षकांमध्ये स्पर्धा असायची की माझ्या घरी किती मुले अभ्यासासाठी येत आहेत. कुणाच्या घरी किती जास्त मुले येत आहेत. असे कौतुक करणे योग्य नाही. परंतू अशा प्रकारची आपुलकी महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांमध्ये कमी आहे. पाटी टाकणे हा एकमेव प्रकार या शिक्षकांच्या कामामध्ये आहे. मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळावर बोलण्यात काही अर्थ नाही. मला तशा काही पॉवर्स नाहीत की, शिक्षकांची तयारी होते का नाही हे जाऊन पहावे. हे काम शिक्षण अधिका-यांचे आहे. साहेब, हे काम तुमचे आहे. शिक्षक तयारीनिशी वर्गात गेलातर काय टाप आहे मुलांची दुस-या दिवशी शाळेत न येण्याची. मुलांना शाळेची ओढ लागली पाहिजे. अभ्यासाची ओढ लागली पाहिजे. हेच काम शिक्षकांचे आहे. त्यांच्याकडून ते जर होत नसेलतर आणि गुराख्यासारखे फक्त हाकण्याचे काम ते करत असतीलतर आपण कितीही सुविधा द्या. खर्चात कितीही कोटींची उड्डाण घेवो. ई-लर्नींग स्कूल सुरु करो. तरी त्यात काही फरक पडणार नाही. आमच्या शिक्षक भगिनी, शिक्षक बांधव यांना मी या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी हात जोडून विनंती करेन की, त्यांच्यामध्ये तुमच्याबद्दल आपुलकी, जवळीक निर्माण करा. शिक्षणाबद्दल आपुलकी, प्रेम निर्माण करा. आणि मगच आपण जे खूप मोठेमोठे बोलतोय हे सगळे पूर्ण होईल.

काही त्रुटी आहेत. आपण नाही म्हणत नाही. परंतू अशा जिवंत हाडामासाच्या मुलांना शिक्षकांनी घडवायचे आहे हे ठरवूनच त्यांनी शिक्षकी पेशा स्विकारलेला आहे. तसे त्यांनी पूर्ण करावे. मी शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेबद्दल बोलतोय. एक करा की, यांनी दर महिन्याला एकतरी सांस्कृतिक कार्यक्रम घेतला पाहिजे. या एक्सट्रा करीक्युलर ॲक्टीव्हीटीजमुळे मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. पालकांनासुद्धा त्यांच्या मुलांमधील लपलेले गुण पाहून आनंद होतो की, त्याठिकाणी माझ्या मुलाला वाव मिळाला आहे. मा.भाऊसाहेब भोईर यांच्या शाळेत झोपडपट्टीतली मुले आहेत. काम करणा-या, धुणी-भांडी करणा-या त्यांच्या आया खूप

नीटनेटकेपणाने आवरुन, नटून-थटून शाळेत जातात. माझा मुलगा आज स्टेजवर येणार आहे. आज त्याचा कार्यक्रम आहे. त्याच्या पालकांना आपल्या शाळेबद्दल आवड कधी निर्माण होईल. तर महिन्याला एखादा कार्यक्रम घेतला पाहिजे. तुमच्या लहानपणी चौथीतल्या एखाद्या मुलाला वक्तृत्व स्पर्धेचे अध्यक्ष केलेतर त्याला कळत नाही आपण अध्यक्ष होतात. तो बोलल्यानंतर तो सुद्धा इतर मुलांबरोबर टाळ्या वाजवायला लागतो. ही गोष्ट ते आयुष्यभर लक्षात ठेवतात. त्यांचे हे संस्कारक्षम वय आहे. म्हणून शिक्षकांनी हे करायचे आहे. मुलाला घडवण्यासाठी हे संस्कार करायचे आहे. चांगले संस्कार करायचे आहेत. म्हणून त्यांनी जादा वेळ द्यावा. शिक्षकांना तसा पगार भरपूर मिळतो. त्यातील थोडे पैसे खर्च केलेतर. आपण म्हणतो ही गरीबांची मुले असतात. त्यांच्यासाठी थोडे तरी पैसे खर्च करा. आपापल्या वर्गातील मुलांसाठी पन्नास, शंभर, किंवा दोनशे रुपये खर्च केलेतरी हि मुले खूप खुष होतील. त्यांना प्रेम लावा, आपुलकी लावा. आत्ता मा.निता पाडाळे ताईंनी सांगितले, ब-याच जणांनी सांगितले की, ठेकेदाराच्या अरेरावीपणामुळे, त्याच्या आडमुठेपणामुळे आपण या मुलांना वर्ष-वर्षभर या सुविधा देऊ शकत नाही. एका विद्यार्थ्याला एका गणवेशासाठी रु.१२५०/- इतके देतो. असे विद्यार्थ्यांना आपण दोन ड्रेस देतो. त्याऐवजी मुलांच्या आईच्या नावे चेक देण्यात यावा. आई नसेलतर दुस-या कोणाच्या नावे चेक द्यावा. त्या ठेकेदाराला कोर्टात जाऊ द्या. त्याला कोर्टात लढत बसू द्या. चेक द्यायला तरी हरकत नाही. आत्ता मा.सिमाताई सावळे यांनी सांगितले. असा चेक दिलातर तुम्हीही अडचणीत येणार नाही आणि कोणीच अडचणीत येणार नाही. कोणी कोणाला काही दुषणे द्यायचे कामच नाही. जुनच्या सुरुवातीला तुम्ही चेक देऊन टाका. आधी ८ दिवस द्या म्हणजे ही मुले आपोआप शाळेत येतील. एकाच नमुन्याचे कपडे आणावेत म्हणून तुम्ही कपड्याचा नमुना ठेवा.

मी तुम्हाला ड्युटीबद्दल बोलते होते. शिक्षण मंडळाच्या प्रशासनाच्या कारभाराबद्दल बोलायचे आहे. मुख्याध्यापक रिटायर्ड होतात तेव्हा शिक्षकांना प्रमोशन मिळते. आपल्याकडे एक असे शिक्षक आहेत की ज्यांचा निवृत्तीचा दिवस व मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती याचा दिवस एकच आहे. असे बरेच वेळा घडले आहे. निवृत्तीच्या दिवशी अर्धातास आधी नियुक्तीचे पत्र मिळते. आणि लगेचच तो निवृत्त होतो. असा हा प्रशासनाचा अजब-गजब कारभार आहे. आपण प्राथमिक शिक्षणाबद्दल बोललो आहे. बजेट मंजूर होईल न होईल. आपण रु.२८ कोटी देतोय म्हणजे खूप देत नाही. याबद्दल मला परत तेच-तेच बोलायचे नाही. परंतू एक महत्वाचे आहे, आपण माध्यमिक शिक्षणाकडे दूर्लक्ष करतोय. किती वर्षे झाली, माध्यमिक शिक्षण मंडळाला अधिकारीच नाही. आपण एक अधिकारी नेमू शकत नाही. तुम्ही बाहेरून बोलवू नका. पण आपल्यातीलच एका अधिका-याकडे पूर्ण कारभार द्या. एवढा हा महत्वाचा विषय आहे. एवढा महत्वाचा हा विभाग आहे. आणि तिथे अधिकारीच नाही. सुपरवायजर दहा-अकरा वर्षापासून आहेत. पण ते फिरते आहेत. नॉर्मस् प्रमाणे तुम्ही सुपरवायजर नेमा. त्यापेक्षा हे वा-यावर सोडलेले क्रिडा शिक्षक,

संगीत शिक्षक ते बरे. ते ३७/३९ आहेत. त्यांनी स्विमिंग टँकवर तिकीट फाडायचे काम भले करु देत. ते पन्नास-साठ हजार पगार घेतात. परंतू त्यांनी त्यांची-त्यांची सेवाज्येष्ठता ठरवली. आपल्याकडे सुपरवायजर कोण तेही ठरवले आहे. ते स्विमिंग टँकवर तिकीट फाडायचे काम करतात किंवा निवडणुकीचे काम करतात. परंतू त्यांनी सेवाज्येष्ठतेप्रमाणे प्रमोशन करुन घेतले आहे. सगळे मंजूर करुन घेतले आहे. परंतू त्यांची सुद्धा मानसिकता नाही की, त्यांनी तुमच्याकडे स्वतः यावे आणि सांगावे की, आम्हाला या गोष्टीचा कंटाळा आला आहे. आम्ही शिक्षक आहोत आणि आम्हाला आमचे काम करु द्या. असे मला वाटत नाही तुमच्याकडे कोणी आले असेल. इथे फुंदे साहेब असतील, ऑर्डर देऊन वर्ष होत आले आहे. तुम्ही माहिती द्या व परत मागवून घ्या असे झालेले नाही. आपले प्रशासनसुद्धा ढिम्म झाले आहे. त्यांनीसुद्धा त्याबद्दल तुम्हाला माहिती दिली नसेल. माहिती देऊन कागद टाकून मोकळे झाले असतील पण त्याचा पाठपुरावा कोणी केलेला नाही. हे ३७ शिक्षक इथे आलेतर शिक्षक कशाला लागतात. महापालिकेच्या संपूर्ण प्राथमिक शाळेचा देखील विचार करा. तिथे विद्यार्थी कमी झाले आहेत. विद्यार्थी संख्येप्रमाणे शिक्षक ठेवा. जिथे आवश्यकता आहे तिथे शिक्षक द्यावेत. शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिका-यांनी हे काम करायला पाहिजे. जिथे शिक्षकांची आवश्यकता आहे, तिथे त्याप्रमाणात शिक्षक दिले पाहिजेत. हे काही होत नाही. इथे बसून नुसतेच काय करतात ते पण कळत नाही. आणि नुसतेच शिक्षकांनी इथे यावे. इथे येऊन अहवाल द्यावा. सुपरवायजरने इथे येऊन अहवाल द्यावा. आपल्या अधिका-यांकडे गाड्या असतात. या मुख्याध्यापकांकडे गाड्या पण नसतात. मुलाला घेऊन येतात, नव-याला घेऊन येतात नाहीतर बसने येतात. यात शिक्षण मंडळाने करण्यासारखे मुळीच काही नाही. जे काही केले पाहिजे ते आपल्या प्रशासनाने केले पाहिजे. त्यांच्यावर वचक बसवणारा अधिकारी पाहिजे. शिक्षण मंडळामध्ये वीस/वीस वर्षे काम केलेले लोक तिथेच आहेत. हे नवीन अधिकारी इथे येऊन काय करणार आहेत. त्यांनी पण इथे येऊन आपली थोडीशी धमक दाखवली पाहिजे. मी हजारो वेळा सांगितले आहे. आपल्याकडे येऊनही सांगितले आहे की, या शिक्षकांना पदाप्रमाणे योग्य ते काम द्या. आपल्यालाही खर्च परवडणार नाही. आपण यात कशा प्रकारे बसवू शकतो ते पहा. हे शिक्षक दिलेतर विद्यार्थ्यांना सुद्धा न्याय मिळेल. आत्ता सदस्यांनी सांगितले आहे. तरी मी पुन्हा तुम्हाला सांगते की, आपल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये भरमसाठ विद्यार्थी येत आहेत. जिथे सेमी इंग्रजी केले आहे, तिथे सुद्धा ऍडमिशन फूल होत आहेत. मराठीबरोबर सेमी इंग्रजी म्हणजे गणित, शास्त्र हे विषय इंग्रजीमधून व बाकी विषय मराठीतून असतात असे करा. अशाप्रकारे आपल्या शाळेतील विद्यार्थी वाढतील. बहुतेक प्रत्येक झोपडपट्टीत आपले एक समाजमंदीर आहे किंवा एखादी खोली आहे. तिथे जिल्हा परिषदेच्या अंगणवाड्या चालतात. नुसते मुलांना बोलवणे, त्यांना खाऊ देणे एवढेच काम आहे. आपल्याकडून बालवाडीचा खर्च होत नसेलतर त्या शिक्षकांना काम द्या. त्या अंगणवाड्या महापालिकेच्या शाळांना जोडा. आपल्या शाळेत मुले आपोआप येतील. महापालिकेच्या शाळेत बालवाड्यांतले विद्यार्थी येत नाहीत

तर मग आपण झोपडीत जाऊ यात. आपण झोपडपट्टीत जाऊन बालवाड्या सुरु करा. तिथे मुलांना खेळणी द्या. मुले आपोआप वाढतील. खरेतर मी बोलणार नव्हते. पण हे अंदाजपत्रकाचे व खरेतर शिक्षण मंडळाचे शेवटचे वर्ष आहे. म्हणून मला थोडेसे बोलावेसे वाटले म्हणून मी बोलले.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, शिक्षण मंडळाच्या बजेटवरील चर्चा असेल, पीएमपीएलवरील चर्चा असेल सर्व सदस्यांना बोलावेसे वाटते. आत्मियतेने बोलावे म्हणून या दृष्टीने सगळे सहकारी बोलतात असे मला याप्रसंगी वाटते. शिक्षण मंडळाबद्दल विविध प्रकारच्या बातम्या जेव्हा पेपरमध्ये येतात. त्यावेळी फक्त शिक्षण मंडळाचे सदस्य भ्रष्टाचार, भ्रष्टाचार. किंवा अन्य काही लोकांनी भाषणे केली असतील त्यात असा उल्लेख आला आहे. आस्थापनेवरील खर्च शिक्षण मंडळाकडे आहे. हा खर्च सोडला तर किती खर्च करतो. खरेतर हे बजेट सादर करताना काही गोष्टींचे वेगळे पेज करा. आम्ही फक्त त्यावर चर्चा करु. कारण बाकी फाफट पसारा टाकतो. त्यात काही अर्थ असतो का. एवढी त्यावरची चर्चा, यातून काय निष्पन्न होते. काहीच नाही. मला वाटते, शिक्षण मंडळाच्या सदस्यांपेक्षा जे लोक पगारी काम करतात, ते जास्त जबाबदार आहेत. त्यांनी जबाबदारीने वागले तर बाकी गोष्टींत काही कारण होण्याचे किंवा कोणी-कोणाला बोलण्याचे काही कारण नाही. मा.आयुक्त साहेब, तुम्ही मला सांगा. चाळीस हजार, पंचेचाळीस हजार विद्यार्थी संख्या असताना एकदम दहा हजारांनी कमी होते. याचा अर्थ काय होतो. शिक्षण मंडळाच्या सदस्याने प्रत्येक ठिकाणी जाऊन विद्यार्थी गोळा करायचे का. मी शिक्षकांनाही नाव ठेवणार नाही. कारण त्यांच्याही मानसिकतेमध्ये बदल घडावा असे आपण काय करतो. हा पहिला प्रश्न आहे. कारण शिक्षकांशी चर्चा करायला गेलो की शिक्षक म्हणतात की, आम्ही काही कुठल्या गोष्टी करायला गेलो की पालक धावून येतात व पोलिस स्टेशनला कंम्प्लेण्ट करतात. अभ्यास का केला नाही. हे का केले नाही असे शिक्षकांनी मुलाला विचारले किंवा शिक्षकी पेशाप्रमाणे एखादा शिक्षक जोरात बोलला तरी तो घरी जाऊन सांगतो मला मारले. या गोष्टींमुळे सुद्धा शिक्षकांमध्ये उदासिनता असू शकते. हे मी मागील बजेटच्या वेळी देखील बोलले होते. त्यांच्या काही मिटींग असतात. त्यांच्या परिवर्तनासाठी काही उपक्रम राबवितो.त्यावेळी शिक्षकांनी हा मुद्दा सांगितला होता. मी त्यांना स्पष्ट सांगितले होते की, पूर्वी एक म्हण होती, छडी वाजे छमछम, विद्या येई घमघम. आता त्यांना कुठे काही आहे का. छडीच नाही. प्रत्येक शिक्षकाने काय छडी घेऊन मारले पाहिजे,बोलले पाहिजे अशातला भाग नाही. पण मग त्या शिक्षकांनी मुलांना बोलायचे नाही, मारायचे नाही. मग त्या विद्यार्थ्यांना धाक कसा राहणार. कारण त्यांना हे माहित आहे की, कॉर्पोरेशनच्या शाळेतून एल.सी निघत नाही. ज्याला कुठे प्रवेश मिळत नाही, तो महापालिकेच्या शाळेत येतो. त्यामुळे हा सर्व प्रश्न निर्माण होतो. यावर उत्तम उपाय काढला पाहिजे. जेव्हा सगळे सभागृहात असतात, तेव्हा तुम्ही कोणी पुढाकार घेतला पाहिजे असे मला

वाटते. नवीन आलेल्या साहेबांचा सत्कार व्हायला पाहिजे होता. आमच्याकडून नजरचुकीने सत्कार करायचा राहून गेला. ते समोर येऊन बसले असतेतर सदस्यांना त्यांचा चेहरा दिसला असता. की कोण आहेत. त्यांच्याकडे जिल्हापरिषदेचा एक चार्ज आहे. आपण अजून एक प्रभारी चार्ज त्यांच्या डोक्यावर ठेवला आहे. बहुतेक त्यांनी बघितल्यावर त्यांच्या मनाचा थरकाप उडाला असेल की इतके सदस्य शिक्षण मंडळाच्या बजेटवर बोलत आहेत म्हणजे हे शिक्षण मंडळ नेमके काय असेल. शिक्षण मंडळाचा दहा कलमी कार्यक्रम राबवा. पहिल्यांदा शिकवताना अ,आ,इ,ई पासून सुरुवात करतो. त्या मुलांचे अक्षर सुधारा. आपल्या मुलांमध्ये अक्षर सुधार आहे का. आज तुम्ही बघितले, बजाज, ऊर्सूला या शाळांतील मुलांच्या वह्यांतील चूक काढू शकत नाही. दिसताना वरपासून खालपर्यंत एलकेजीपासून मुलांच्या हातात खोडरबर घेऊ देत नाहीत. मुलांना शाळेत खोडरबर आणायची परवानगी नाही. मुले मागत नाहीत. शार्पनर नाही, खोडरबर नाही. जर चुकलेतर त्याला आयुष्यात कळाले पाहिजे माझे काय चुकते आहे. त्याने त्याच्यावर डॅश मारायची व परत लिहायचे. म्हणजे त्याला कळते,आपले काय चुकले आहे. अक्षर सुधारसाठी मी हे सांगितले. काल आमच्या पार्टी मिटींगमध्ये मा.तानाजी खाडे म्हणाले, ताई, पाचवीतल्या एखाद्या मुलाला पुस्तक वाचायला द्या. त्या विद्यार्थ्याला पुस्तक वाचता येणार नाही. आम्ही म्हणतो, सर्वसामान्य गरीब कुटूंबातील मुले येतात. मुलांना सगळे दिले पाहिजे. काही दिले नाहीतरी पूर्वी वडाच्या झाडाखाली शाळा भरत होती. तुम्ही बाकी सदस्यांना देखील विचारा. एक ड्रेस तीन-तीन वर्षे घातला असेल. आपण मुलांना सगळे पुरवतो. दरवर्षी ड्रेस, स्वेटर देतो. मला वाटत नाही की, सर्वसामान्य कुटूंबातील मुलांचे पालक त्यांना दरवर्षी स्वेटर खरेदी करतात. या गोष्टीला माझा विरोध नाही. मुलांना दिलेच पाहिजे. मुलांना बूट देतो, सॉक्स देतो, दप्तर देतो. परंतू त्याचे आऊटपुट काय निघते. शिक्षकांची मानसिकता अशी आहे, यांना काहीतरी दिले की हे शाळेत येणार आहेत. म्हणून त्यांना दोन टप्प्यांत द्या. शाळा सुरु झाल्यानंतर द्या. दिवाळीनंतर द्या. त्यांची हजेरी पटसंख्या तशी असावी म्हणून असे शाळेतील शिक्षकांचे म्हणणे आहे. पण मा.आयुक्त साहेब, हे योग्य नाही. वाचन सुधारण्यासाठी आधी पहिले अक्षर सुधारा. वाचन सुधारल्यानंतर आपोआप अभ्यासात सुधार होईल. मुलाला लिहिता येत असेल, वाचता येत असेलतर तो नक्की अभ्यास करायला लागेल. शाळा सुधारायची म्हटलीतर नेमके काय करायचे. संत तुकाराम नगरला जुन्या काढलेल्या बेंचेसचे गोडाऊन होते. तिथे आग लागली. शहरात कित्येक प्रायव्हेट शाळा आहेत. त्या शाळांतले बेंचेस बघितले तरीसुद्धा त्यांच्याकडे आपल्यासारखे चांगले बेंचेस नाहीत. ते म्हणतात, महापालिकेने शाळेतील भंगार म्हणून टाकलेले बेंचेस आम्हाला द्या. ते बघतात, समोर आपले बेंचेस पडलेले आहेत ते आम्हाला द्या. आम्ही खालचा सांगाडा वापरु, त्याला वर टॉप टाकू, खाली पेंटींग करुन घेऊ. पण आपल्याकडे अशी मानसिकता आहे का. आपले विद्यार्थी खाली बसतात. प्रत्येक शाळेत वेगवेगळे शिक्षक आहेत. यात कुणीतरी दुरुस्ती केली पाहिजे. काही शाळांतली पटसंख्या कमी होते आहे.

आपण विद्यार्थ्यांसाठी बसपास देतो. महापालिकेच्या शाळेत ही शिकणारी मुले आहेत. जवळच्या शाळेत जर पटसंख्या कमी असेलतर त्यांना बस वाहतूकीसाठी परवानगी द्या. म्हणजे तुमचा एका शिक्षकावर असलेला लोड कमी होईल. असाही तुम्ही एका शिक्षकाला चाळीस ते पन्नास हजार पगार देता. शिक्षक वाढल्यानंतर ती लाएबिलिटी परत वाढणार. त्यापेक्षा ज्या शाळेत पटसंख्या कमी आहे, त्या शाळेत गेले पाहिजे. तिथून सुटल्यानंतर त्यांच्या पॉईंटवर परत आणून सोडले पाहिजे. बस व्यवस्था करा. कोणतीही प्रायव्हेट शाळा अशी नाही तिथे बस व्यवस्था नाही. आपली तशी मानसिकता आहे का. नाही मग शिक्षक काय करणार. आज दहा विद्यार्थी येणार, उद्या पाच येणार नंतर दोनच येणार. शिक्षक त्या दोनच विद्यार्थ्यांना शिकवणार आहेत का. मग गुणवत्ता कशी वाढेल. वाढू शकत नाही. मागील वर्षी आम्ही प्रायोगिक तत्वावर उपक्रम राबविला. मॉडर्न शाळेला, ज्ञानप्रबोधिनी शाळेला बोलवले. त्यांना सांगितले, हा प्रोजेक्ट पुढे राबवायचा होता. ज्ञानप्रबोधिनी यांना सांगितले, तुम्ही तुमच्या दिशेने या १० शाळा घ्या. मॉडर्न शाळेला सांगितले, तुम्ही पुढे या १० शाळा घ्या. ज्ञानप्रबोधिनी यांनी १० शाळा दत्तक घेतल्या. त्यांनी आपल्या शिक्षकांचे ट्रेनींग घेतले. सगळे शिक्षक अजिबातच नीट शिकविणार नाहीत असे होऊ शकत नाही. कारण बीएड,डीएड शिक्षक आहेत. त्यामुळे त्यांनी शिक्षकांची गुणवत्ता केली आहे. त्यांचे म्हणणे होते, आम्ही बोटावर मोजक्या शिक्षकांची बदली करा असे सांगितले तर तुम्ही बदली करुन दिली पाहिजे. कमीत-कमी या दहा शाळा या दीड/दोन वर्षात सुधारणार आहेत. त्यानंतर त्यांनी असा निर्णय घेतला की, मनपा शाळेतील प्रत्येक वर्गातील दोन-दोन विद्यार्थी ज्ञानप्रबोधिनी शाळेत या जून पासून फुकट शिकणार आहेत. हा त्यांचा मागील आठवड्यातला निर्णय आहे. आपल्या महापालिकेच्या शाळेतील प्रत्येक वर्गातील दोन-दोन विद्यार्थी त्यांच्या शाळेत शिकायला घेणार आहेत. काळेवाडीतली एम.एम. शाळा आहे. त्या लोकांना बोलवा. आमच्या शाळेतील किंवा आजूबाजूच्या शाळांवर लक्ष ठेवण्यासाठी तुम्हाला आम्हाला काय मदत करता येईल. अशा समाजिक संस्था एकत्र आल्यातर शंभर टक्के नक्कीच आपल्या शाळांची गुणवत्ता वाढू शकते. चार पाच नगरसेवकांनी सांगितले, सिटी प्राईड शाळा तिथे असणारे डोनेशन, तिथे असणारी फी. सिटी प्राईड शाळेच्या मॅडमसुद्धा तुमच्याकडे येऊन गेल्या. आपली मानसिकता काही सोडायची झाली का. काही झाली नाही. मी स्पष्टपणे सांगते. मागे पत्रकार बसलेले आहेत त्यांना सांगते. त्यांनी सरळ-सरळ प्रस्ताव लिहीला होता की, आमच्या शाळेत ५० टक्के महापालिकेचे विद्यार्थी शिकतील, ५० टक्के आमचे विद्यार्थी शिकतील. पण आपण कुठे त्यांना मदत केली का, करु शकलो नाही. कारण आपली आपली मानसिकता बदलायची तयारी नाही. ऍडमिशन फक्त एलकेजीमध्येच होते, नंतर होत नाही. दरवर्षी आपले शंभर गरीब विद्यार्थी शिकले असते. शंभर विद्यार्थ्यांचे पन्नास हजाराप्रमाणे डोनेशन करा, त्यांची फी किती आहे, ऍडीशन करा. किती कोटींमध्ये झाले. शंभर विद्यार्थ्यांची आपली वर्षाची फी किती कमी झाली असती. शिवाय इमारतीचे भाडे. आपण जो खर्च करतो तो सुद्धा आपल्याला करायची गरज नाही.

ते इमारतीचे भाडे सुद्धा द्यायला तयार आहेत. ते नाही म्हणत नाहीत. परंतू शंभर गरीब विद्यार्थी सिटीप्राईडला शिकले असते तर किती चांगले काम शहरात होणार आहे. पण आपण एक हात सुद्धा पुढे जायला तयार नाहीत. का तयार नाहीत हे तुम्हीच सांगा. हा प्रस्ताव असेलतर सगळे तुम्हाला सहकार्य करतील. तुम्ही ज्ञानप्रबोधिनीला, मॉडर्न शाळेला, सिटीप्राईड या शाळांना आपल्या शाळा दत्तक द्या. गुणवत्ता वाढली पाहीजे. आज आपण नुसतेच बोट दाखवायचे. टेंडर, ठेकेदार. काहीच नाही. ठेकेदार हायकोर्टात गेल्यामुळे मुलांना गेले वर्षभरात काहीच मिळाले नाही. आणि शिक्षण मंडळाच्या या गोष्टीवर आपण पुन्हा-पुन्हा तेच बोलत असतो. गुणवत्ता वाढ नाही. मुलांना काही येत नाही. शाळांचे टॉयलेट चांगले नाहीत. साहेब, फक्त एक कारभारी चांगला असावा लागतो. आज ऊर्सूला, बजाज या शाळांमध्ये जाऊन पहा. मुख्याध्यापिका बाहेर उभी राहिली असेलतर मुले मान खाली घालून जातात. आख्या रस्त्याभर कशी लाईन चालू असते ते बघा. आपण त्यांना शाळेत बोलवले पाहिजे. त्यांना आमंत्रण दिले पाहिजे. तुम्ही या, आमच्या इमारती आहेत. आमचे कोट्यावधींचे बजेट आहे. शिक्षकांसाठी कायदा करा. पिंपरी चिंचवड शहरात ज्या शाळांनी २० वर्षे काम केले आहे, नामांकीत शाळा आहेत. ही मुले त्या शाळांमध्ये शिकली गेली पाहीजेत. त्या लोकांसारखी शिकली पाहिजेत. तिथेसुद्धा बरेच लोक म्हणतात, नकोबाबा, नगरसेवक ओरडेल. मागील वर्षी थरमॅक्सच्या ऍग्रीमेंटच्या वेळी हाच प्रॉब्लेम झाला होता. एकदा सभागृहात कायदा आणा. त्यांना कुठेतरी असे भासवले जाते की, नगरसेवक डोक्यावर बसतील. आपल्या शाळा चांगल्या-चांगल्या संस्थांना द्या. अमृतामयी सारखी शाळा आहे. त्यांनी बिल्डींग फंड दहा हजार घेऊन शाळा बांधली आहे. आणि आपल्या परिसरात शाळा ओस पडल्या आहेत. ज्या संस्था पिंपरी चिंचवडमध्ये टॉपर आहेत, त्यांना आपल्या शाळा द्या. त्यांचा टॅक्स माफ करा. त्या शाळांना कंपल्सरी करा. तुम्ही चार तुकड्या चालवणार आहात तर चारमधल्या दोन तुकड्या आमच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना द्या. एखादा पालक किंवा महिला धुणी-भांडीवाली बाई म्हणते. मी नेहमी सांगते की, महिला बालकल्याणचा स्पोकन इंग्लिशचा विषय आहे त्याला शिक्षणाची अट ठेवू नका. जर त्या गरीब धुणी-भांडी करणा-या बाईला वाटले की, माझा मुलगा इंग्रिश मिडीयम शाळेत टाकला तर मला सुद्धा थोडतरी इंग्रजी आले पाहिजे. ख्रिश्चन लोक जन्मापासून इंग्रजी बोलत असतात. म्हणून त्यांना इंग्लिश येत असते. त्यांच्याकडे कामगार वर्ग असतो तो सुद्धा इंग्लिश बोलत असतो. आपण देखील प्रयत्न केला पाहिजे. आपण असा प्रयत्न करतोय का. आज बजेटचा दिवस आहे म्हणून सगळे बडबड-बडबड करणार. प्रत्यक्षात काही होते का. मागील वर्षी डोक्यावर बसलो म्हणून त्या दहा शाळांचे नीटनेटके झाले. दरवेळी आमच्यासारख्यांनी डोक्यावरच बसायला पाहिजे का. म्हणून जो प्रस्ताव केला गेला, त्या शिक्षकांचे ट्रेनींग झाले. त्या दिवशी एक मिटींग झाली होती, त्यावेळी आम्ही सांगितले होते, ज्ञानप्रबोधिनीमधील विद्यार्थी खूप प्रकारे शालेय खेळात पुढे आहेत. आमच्या दहा शाळांतील विद्यार्थीही त्या स्पोर्टस् मध्ये असले पाहिजेत. आमची मुले खूप हुशार होणार नाहीत. आमची मुले नव्वद, ऐंशी टक्यांपर्यंत जाणार

नाहीत. पण खेळाडू म्हणून आमची मुले नक्कीच तगडी असणार आहेत. आमची मुले पोलिस भरतीत भरती होऊ देत. टार्गेट ठेवा. आमची मुले पीएसआय होतील, मिलिटरीमध्ये भरती होतील. पण हे टार्गेट ठेवले गेले पाहिजे. नाहीतर काही होणार नाही. मागिल वेळी मुलांसाठी एक प्रस्ताव दिला होता की मुलींसाठी पाचवी ते दहावीपर्यंत एक शाळा आहे. ती शाळा त्यांना द्यायची होती. त्या शाळेत फक्त १५० मुली आहेत. त्यांना ती शाळा देऊन टाका. होस्टेल करा. दरवर्षी १५० मुली चांगल्या मार्गाने शिकून बाहेर पडलेतर केवढे मोठे काम होईल. आत्ता मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी सांगितले की, वडील दारू पितात, आई-वडीलांची भांडणे होतात. म्हणून ही मुले शाळेत येतच नाहीत. मग आपण ज्यावेळी बजेट करणार आहोत. बजेटमध्ये काटछाट करणार आहोत. त्यावेळी या उपाययोजना सुचल्या पाहिजेत. अशा मुली ज्या शिक्षणात हुशार आहेत, अशा दोनशे-तीनशे मुलींसाठी होस्टेल करायला पाहिजे. तिथे कॅमेरे बसवा. आमच्याकडून कॅमेरे बसवण्यासाठी पाच कोटी घ्या. काही प्रॉब्लेम नाही. प्रत्येक वर्गात कॅमेरा बसला पाहिजे. प्रत्येक शिक्षक काय करतो ते बघितले पाहिजे. आणि ते फुटेज बघण्यासाठी एक सेंटर करा, एक कंट्रोल रुम करा. कारण शिक्षक वर्गात आहे का हे सुद्धा आपल्याला त्यामुळे कळणार आहे. काय घटना घडली तर ते सुद्धा आपल्याला यात कळेल. प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. मुख्याध्यापक प्रत्येक वर्गाचे कंट्रोलिंग करतात. या सीसीटीव्ही कॅमेरातून मुख्याध्यापकांना गेटपासून वर्गातले ए टू झेड दिसते. अशा सुविधा दिल्यातर मग विद्यार्थी संख्या वाढेल. भाऊसाहेबांना सांगा, त्यांना पाच शाळा द्या. त्यांना वेळ मिळाला नाहीतरी ते पाच चांगली माणसे नक्की लावतील. त्याचे कंट्रोलिंग चांगले चालले आहे का हे ते बघतील. सीएसआरमध्ये अशा भरपूर योजना येतात. त्यांना शाळा द्या. त्यांचे सगळे तुम्ही बघा. खिचडीचे बघा. युनिफॉर्मचे बघा.

श्री.राहूल बजाज साहेब यांचे मी कौतुक करेन की, त्यांनी पिंपरी चिंचवडमधील तीनशे शाळांना आमंत्रित केले होते. त्यांनी स्पष्ट सांगितले, त्यात पहिल्यांदा महापालिकेच्या शाळांना जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर प्रायव्हेट शाळांमध्ये काही शाळांना रु.१० लाख, काही शाळांना रु.२० लाख रुपये, त्यांची माणसे त्यावर ठेवणार आहेत. आम्ही दिलेल्या पैशांचा विनियोग कसा करताय हे ते बघणार आहेत. या चौतीस शाळा काढा. शंभरच शाळा ठेवा. साहेबांना बोलवा, त्यांना सांगा, आम्ही तुम्हाला इमारत देतो, आमचे शिक्षक देतो, फक्त तुमची चार माणसे त्यावर नेमा व आमच्या दहा शाळांतील पाच शाळा जसे बजाज साहेब चालवतात, तशा इंग्लिश मिडीयमच्या शाळा चालवा. पिंपरी चिंचवड शहरात एरिया वाईज घ्या. जिथे झोपडपट्टी जास्तीत-जास्त आहे, तिथे घ्या. त्यांनी सिस्टर लोकांना सांगितले की, याची जबाबदारी आम्ही घेणार आहोत. त्यांच्याकडे मुख्याध्यापिका नसेलतरी बाकी नॉर्मल स्टाफ आहे. एक फादर असतात, एक नन असते. ते संपूर्ण शाळा कंट्रोल करतात. अँड्र्युजमधले सगळे शिक्षक

फादर नाहीत. बाकी सगळे शिक्षक पिंपरी चिंचवडमध्ये राहणारे आहेत. पण एक कारभारी आहे, त्याच्यावर सगळी शाळा कंट्रोल होते. मग हे काय अवघड आहे का. कितीही बोलले काही केलेतरी पुन्हा येरे माझ्या मागल्याच होणार. टॉयलेट क्लिनींग होत नाहीत. रु.२,०००/- पगार देणार तो बाथरुम कसे धुईल. घरातली कामवाली,धुणीभांडीवाली येते, ती टॉयलेट धुवत नाही. घरकामासाठी देखील रु.२५००/- घेतात. तरी ती काचेची भांडी धुवत नाही. टॉयलेट साफ करत नाही. मग हे कर्मचारी दोन हजारांमध्ये टॉयलेट कसे स्वच्छ ठेवतील. त्यात प्रथा काय आहे की, जो कर्मचारी कोर्टात गेलातर त्याला न्याय. जो तुमच्यावर विश्वास ठेवून बसला आहे, आमचे कॉर्पोरेशन आहे, आमचाही विचार करेल, त्याला न्याय नाही. आगाऊपणा केला तरच तुम्ही काहीतरी देणार आहात. असे कशासाठी. आम्ही तुमचेच बजेट मंजूर करणार आहोत. परंतू काही वाढीव गोष्टी सांगितल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेरासाठी पाच/दहा कोटी पाहिजे आहेत तेवढे घ्या. जिथे सगळे शिक्षक आहेत. वर्ग फूल आहेत, तिथे पहिल्यांदा कॅमेरा बसवावा. मी उपेक्षितपणे बोलत नाही. सेक्टर २२ मधील शाळेसाठी सुरक्षेची योजना ही झालीच पाहिजे. आज आप्पांच नाव का म्हणून निघाले. साहेब, तुम्ही ईडब्ल्यूएसची स्किम राबविली. आज ६,००० लोकसंख्या तिथे राहणार आहे. त्यांची दोन दोन मुले धरलीतरी किती मुले झालीत. ही मुले कुठल्या शाळेत जाणार. शाळेचे आरक्षण आहे. मी मागील दोन वर्षांपासून तुमच्या मागे आहे. राजन पाटील यांच्या मागे आहे. ईडब्ल्यूएस स्किमपाशी महापालिकेची शाळा झालीच पाहिजे. मग त्याचे पुढे काय झाले. काहीच झाले नाही. एखादी इमारत कमी करा परंतू त्या एफएसआयमध्ये शाळेचे बांधकाम चालू झाले पाहिजे. जशी प्रत्येक झोपडपट्टी आहे तिथे शाळा झाली पाहिजे. तसे या सीएसआरमध्ये कंपन्यांना दिले पाहिजे. आज एखादी नामांकित संस्था जसे पी.डी.पाटील संस्था यांना बोलवा. आमचे काही लोक म्हणतील. परंतू द्या, देऊन टाका. त्याशिवाय आपल्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही. एलबीटी बंद झाल्यामुळे आज आपण लाएबिलिटी वाढवू शकत नाही. हे सगळे चांगले सहकारी आहेत. ऐकणारे सहकारी आहेत. अशा वेळी तुम्ही चांगले चांगले प्रस्ताव आणा. आम्ही तुम्हाला करुन द्यायला तयार आहोत. फक्त पिंपरी चिंचवडमधली मुले चांगली शिकली पाहिजेत. आज सगळे तळमळीने बोलले आहेत. पूर्वी अक्षर सुधारसाठी शाळांमध्ये शिक्षक होते. अक्षर सुधारचे शिक्षकांना ट्रेनींग द्या. कोर्सेस द्या. प्राथमिक शाळांतील शिक्षकांना अक्षर सुधारसाठी ट्रेनींग कम्पल्सरी दिलेच पाहिजे. शिक्षकांना ट्रेनींग दिलेच पाहिजे. त्यांना स्पोकन इंग्लिशचे ट्रेनींग दिलेच पाहिजे. संगणकाचे ट्रेनींग दिलेच पाहिजे.

स्टँडींग हॉलमध्ये मुख्याध्यापकांची मिटींग लावली होती. त्यादिवशी ते मुख्याध्यापक सरळ झोपले होते. तुम्ही पण होता. ते काय म्हणाले, मला खूप डायबेटीस आहे. त्याचे प्रमाण खूप आहे. त्यामुळे मी बसलोतरी झोपतोच. ज्या शाळेतले मुख्याध्यापक असे असतील तर ती शाळा कशी चालणार. मग त्यांना सन्मानपूर्वक दुसरे काम द्या. शेवटी ते शिक्षक गुरुवर्य आहेत.

त्या शाळेत दुसरे शिक्षक असतील त्यांना दुसरे काहीतरी काम द्या. असे अनफिट शिक्षक/मुख्याध्यापक असतील तर काही उपयोग नाही. त्यांना दुसरे काम द्या. हे बदल केले गेले पाहिजेत. उपाययोजना केल्या पाहिजेत. आम्ही नुसतेच बोलणार, शिक्षण सदस्यांना काहीतरी बोलणार, शिक्षकांना काहीतरी म्हणणार काही उपयोग नाही. याच्यासाठी जे प्रमुख लोक आहेत, त्यांची मिटींग लावा. प्रत्येक पक्षातून घ्या. सगळ्या पक्षांचे एक-एक सदस्य घ्या. मिटींग लावा. डिक्लेअर करुन टाका. पुढील बदल करायचे असतील तर आपल्याला जूनच्या आतच बदल करावा लागेल. मार्चमध्ये एक मिटींग घ्या. एप्रिलमध्ये एक मिटींग घ्या. कंपन्यांना बोलवा. कंपन्यांना काही-काही शाळांच्या जबाबदा-या देऊन टाका. प्रत्येक पक्षाचे पदाधिकारी आहेत, तेवढ्या सगळ्यांना मिटींगला बोलवा. म्हणजे तिथे पारदर्शकता राहील. असे कुणाला वाटणार नाही की, यात उलटे-पालटे काहीतरी आहे. पारदर्शकतेने काम व्हावे. शिक्षण मंडळाच्या बाबतीत, शिक्षणाच्या बाबतीत कुठेही उलटसुलट नसावे. या दृष्टीकोणातून १५ दिवसांत मिनिटस् घ्या कोण काय बोलले ते पॉईंट आऊट करुन घ्या. मार्चमध्ये बजेट मिटींगच्या आधी मिटींग लावा. मार्चमध्ये पहिल्या १५ दिवसांत एक मिटींग लावा. शिक्षण मंडळासाठी यात बदल केलातर मला वाटत नाही, आपले शिक्षण क्षेत्र विद्येचे माहेरघर व्हायला अवघड होईल. मा.सुलभाताई ऊबाळे यांना पाच शाळांवर लक्ष ठेवायला दिल्या असत्या. त्या शंभर टक्के पाच शाळांवर लक्ष ठेवतील. मा.तानाजी खाडे यांना द्या. इतरांना द्या. काही वाईट व्हायचे काही कारण नाही. उघड बोलायचे झालेतर बोलता पण येईल. परंतू बजेटमध्ये आस्थापनेवरील खर्च बघता उरलेली रक्कम तशी बघीतली तर किरकोळ आहे. तुम्ही सांगितलेले मूळ अंदाजपत्रक आहे. यात आमचे म्हणणे आहे, साफसफाईवर वाढीव खर्च मागितला आहे. शिपाई लोकांना रु.२,०००/- देतो. त्यात वाढ करा. तुम्ही खुलासा करा. तुम्हाला शाळांसाठी खरेच सीसीटीव्ही कॅमेरे पाहिजे आहेत का. त्यासाठी आणखी तरतूद पाहिजे होती का. त्या साहेबांना विचारा. त्यांनी आधी सांगायला पाहिजे होते. त्यांनी या आधी अशा अशा ठिकाणी अशा पद्धतीने काम केले आहे की नाही. जर तुम्हाला पाहिजे असेल तर आम्ही आकडा टाकून उपसूचना देतो. जे सफाई कर्मचारी आहेत, त्यांना व्यवस्थित पगार देता येईल, त्यांची मानसिकता चांगली ठेवता येईल. जसे कुत्री पकडायला ठराविक कास्टची माणसे फासेपारधी व्यवस्थित कुत्री पकडून देऊ शकतात. तसा सफाई कर्मचा-यांबाबतीत निर्णय घ्यावा. जे लोक चांगल्या प्रकारे टॉयलेट साफसफाई करु शकतात, अशा लोकांना घ्या. कर्मचा-यांची संख्या वाढवा. त्यांना असे वाटता कामा नये, आम्ही साफसफाई कशी करायची. चांगले पाणी शाळांमध्ये दिले गेले पाहिजे. टाकी असली पाहिजे. जर त्यांना व्यवस्थित पगार दिला तर ते आपोआप चांगले काम करतील. २५ लाखांत काही होणार नाही. काही शाळांची तुम्हाला मंजूरी पाहिजे असेलतर तुम्ही खुलासा करावा. ज्या पद्धतीने उपसूचना देतो, सभागृह त्याला तयार होईल. त्या पद्धतीची उपसूचना आम्ही तुम्हाला देतो. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सर्वपक्षीय मिटींग घ्यावी. माध्यमिक विभागासाठी वेगळा मनुष्य द्या. एकाच्याच खांद्यावर ओझे

टाकू नका. त्या ओझ्यानेच त्याला सुधारणार नाही. आगामी निवडणुकीचे वर्ष आहे. प्रत्येकजण प्रत्येकाच्या शाळेची काळजी घेणार आहे. त्यामुळे माध्यमिकसाठी कोणी येते आहे का ते पहा. आपल्याकडे शासनाचे ॲडीशनल लोक आहेत, त्यांना एक विभाग देता येतो का ते बघा ही विनंती करुन थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - शिक्षणमंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१६-१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजुरीकामी सादर केले आहे. त्याच बरोबर विविध सुविधेसाठी सुमारे १८ कोटी ७५ लाख वाढीव तरतूद करणेबाबत सुचविलेले आहे. तरी मा.आयुक्त सो. यांनी सुचविलेल्या मूळ अंदाजपत्रक व वाढीव तरतूदीमधील शाळावार सफाईसेवक मानधनावरील कर्मचा-यांसाठीचे र.रु.६० लाख व शाळावार मानधनावरील शिपाई कर्मचारी यांच्यासाठी र.रु.४० लाख वाढीव तरतूदीसह सी.सी.कॅमेरा बसवण्यासाठी येणा-या खर्चासह धन्वंतरीसाठी १ कोटी देण्याकामीचे तरतूदीसह मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेत यावी.

**मा.आशा सूर्यवंशी-**मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसूचनेसह शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आल्याचे जाहीर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ८१४ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - १०/०२/२०१६ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१३३४/२०१५ दि.१०/१२/२०१५
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१४२०३ दि.१५/१२/२०१५
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८०९ दि.२५/१/२०१६

शिक्षण मंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१६-२०१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे .शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रकास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे कलम १५४) २ (अन्वये दिनांक १ जानेवारी पूर्वी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक

आहे. सन २०१५-२०१६ च्या ४ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ८ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कमा नमूद केलेल्या आहेत. शिक्षण मंडळ सभेने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांचेशी चर्चा करुन सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.११४,२६,९०,००० -/चे व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११५,२७,२४,००० -/मान्यतेकामी सादर केले असल्याने त्यास मान्यता देणेची मा.आयुक्तांची मागणी असली तरी शिक्षण मंडळाकडील सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये शिक्षण मंडळाने तयार केलेले सुधारित र.रू .१,१५,४९,९४,००० -/व मूळ र.रू .१,३३,९८,२४,००० -/मंजूर करणेस व त्या प्रमाणे सुधारित मध्ये ७२,१३,२४,००० -/व मूळ मध्ये ९०,३३,६९,००० -/मनपा हिस्सा अदा करणेस मान्यता देणेची मा.स्थायी समितीची मागणी असली तरी शिक्षणमंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१६-१७ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजुरीकामी सादर केले आहे. त्याच बरोबर विविध सुविधेसाठी सुमारे १८ कोटी ७५ लाख वाढीव तरतूद करणेबाबत सुचविलेले आहे. तरी मा.आयुक्त सो.यांनी सुचविलेल्या मूळ अंदाजपत्रक व वाढीव तरतूदीमधील शाळावार सफाईसेवक मानधनावरील कर्मचा-यांसाठीचे र.रु.६० लाख व शाळावार मानधनावरील शिपाई कर्मचारी यांच्यासाठी र.रु. ४० लाख वाढीव तरतूदीसह सी.सी.कॅमेरा बसवण्यासाठी येणा-या खर्चासह धन्वंतरीसाठी १ कोटी देण्याकामीचे तरतूदीसह मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - १०/०२/२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१८/
किवळे१५/२०१६ दिनांक ०१/०२/२०१६

विषयः-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या महत्तम पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याबाबत.

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ शासन निर्णय क्र.टिपीएस--१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि-१३ दि.१५/०७/२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाव्दारे शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस वाढीव हद्दीचे विकास योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

**निदेशः-** "पिंपरी-चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्या बाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरून कार्यान्वित करून शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये निर्देश देण्यात येत आहेत".

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाची छायाप्रत मा.महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यातील लाल पूररेषेच्या बाहेरील असलेले ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जांवर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मी सूचना मांडते की, विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ८१५
दिनांक - १०/०२/२०१६

विषय क्रमांक - २
विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१८/
किवळे१५/२०१६ दिनांक ०१/०२/२०१६

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०


अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** - सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/१०/कावि/३४/२०१६
दिनांक – ०४/०४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.